


# इ-अंक पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या लेखावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

* (स्क्रोल केल्यानंतर) सुरुवातीला अंकाचे मुखपृष्ठ दिसेल. त्यानंतर कव्हर २ आणि नंतर 'संवादा'चे पान दिसेल. त्यानंतर अंतरंगा'चे पान येईल.

* अंतरंगात अंकातील सर्व साहित्याची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी जो लेख तुम्ही वाचू इच्छिता त्या 'शीर्षका'ला क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या लेखावर जाऊन तो लेख वाचू शकाल.

* लेखाच्या शेवटी उजवीकडे समासात दिलेल्या चौकोनावर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या लेखाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.


* ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक !

दीपावली विशेषांक २०२०

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक, शके १९४२ । वर्ष २१ अंक २
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ ८०, पृष्ठे – ९६



विविध प्रकल्पांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाच्या साह्याने
प्रत्येक मुलापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोचवण्यासाठी

ज्ञान प्रबोधिनी, पुणे संचलित

# शैक्षणिक साधन केंद्र

## MOOL (Movement of Open Online Learning)

## मुक्त शिक्षणाची चळवळ

### मान्यवर सहयोगी संस्था

Ministry of Education
Government of India

TCS iON

eTechSchool

CSR

MAERSK

Prescient Technologies

SEAGATE

### दिक्षा

DIKSHA

- शिक्षण मंत्रालयाशी संलग्न
- अध्ययन- अध्यापनासाठी उत्तम शैक्षणिक साधने मिळवण्यासाठी राष्ट्रीय संगणकीय पटल
- दिक्षा ॲपसाठी १००० पेक्षा जास्त व्हिडिओ निर्मिती
- विज्ञान, गणित, भूगोल, संस्कृत याविषयांव्यतिरिक्त आता मराठी या विषयावरही काम सुरू





### ज्ञानवाहिनी

- स्पर्धा परीक्षा, भाषा शिक्षण, करिअर मार्गदर्शन
- वेगवेगळ्या प्रदेशातील शालेय विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शन



YouTube

www.jpearc.org

ERCJPP
15.5K subscribers

**'स्वयं विकास' करू इच्छिणाऱ्या लाडक्या, धडपडणाऱ्या प्रबोधकांनो,**

विविधांगी साहित्याने नटलेला 'छात्र प्रबोधन'चा हा एकोणतिसावा दिवाळी अंक तुमची दिवाळी आनंदी आणि समृद्ध करेल, असा विश्वास वाटतो. या अंकासोबतच **इंग्रजी दिवाळी अंक व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी 'सुबोध' दिवाळी अंकही** प्रकाशित केले आहेत. या छापील अंकासोबतच तीनही अंक स्वतंत्रपणे **'इ'-अंक** स्वरूपात तर एकत्रितपणे **'ऐपावा' (ऐका-पाहा-वाचा) या *ऑनलाइन* दिवाळी अंकाच्या** स्वरूपात अनेकांपर्यंत पोहोचणार आहेत. ग्रामीण, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी व अंध विद्यार्थ्यांसाठी फोनद्वारा मोफत **'बोलका दिवाळी अंक'**ही हजारो जणांपर्यंत पोहोचणार आहे. कोरोना संकटाचे संधीत रूपांतर करून, ही नवनवीन माध्यमे वापरत, नेहमीप्रमाणेच 'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकांमधील साहित्य खजिन्याने हजारो विद्यार्थ्यांची दिवाळी आनंदाची होईल, समृद्ध करणारी होईल, याचा आनंद वाटतो. (९६६७७१५७१६ या क्रमांकावर फोन करून, **दि. ५ नोव्हें. ते ५ डिसें.** या महिन्याभरात तुम्हीही बोलक्या दिवाळी अंकाचा आनंद लुटू शकता.)

गेले ८ महिने कोरोना साथीच्या संकटाने आपण सगळेच त्रस्त असणार, याची मला जाणीव आहे. तुमच्यापैकी अनेकांनी या काळात अनेक नवनवीन गोष्टी करून पाहिल्या असतील. तुमची शाळा *ऑनलाइन* सुरू झाली असली किंवा *ऑफलाइन* सुरू होणार असली, तरी अजूनही पुढचे ४-६ महिने आपल्या सर्वांवर पुष्कळ बंधने येणार आहेत. त्या स्थितीतही आपले शिक्षण चालू राहण्यासाठी तुम्हा सर्वांना 'स्वयं'शिक्षणाची कास धरावी लागेल. पाठ्यपुस्तके स्वत:च वाचून अभ्यास करणं, शंका-प्रश्न काढून त्यांचे शिक्षकांकडून, ताई-दादांकडून स्वत:च निराकरण करून घेणं, विविध अभ्यास कौशल्ये शिकून आत्मसात करणं, पुस्तकी अभ्यासाला दैनंदिन जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न करणं, शालेय विषयांव्यतिरिक्त इतर विषय स्वत:हून शिकण्याची धडपण करणं, प्रयोग करणं, विविध विषयांवरील प्रकल्प करणं, इ.द्वारे 'स्वयं'शिक्षणाची ही प्रक्रिया समृद्ध करता येईल. तसेच स्वत:हून विविध कामांचे अनुभवदेखील घ्यायला हवेत. छोट्या-मोठ्या व्यावसायिकांकडे, कार्यालयांमध्ये ८-१० दिवस 'कार्यानुभव' आवर्जून घ्यावा. खऱ्या आयुष्यातील आव्हानांची ओळख करून घ्यायला आणि स्वत:ला त्यासाठी सक्षम करायला, हे अनुभव नक्कीच प्रेरणादायी ठरतील.

त्याचबरोबर आजूबाजूच्या परिस्थितीचे भान व संवेदनशीलता असणंही महत्त्वाचं आहे. आपल्या अडचणींचा बाऊ करत बसण्यापेक्षा आपल्यापेक्षाही अधिक अडचणींच्या परिस्थितीत असलेल्या व्यक्तींची माहिती घेणं, त्यांच्या अडचणी समजून घेणं, त्यांना यथाशक्य मदत करणं, वृद्ध-निराधार-आजारी व्यक्तींची (आवश्यक ती काळजी घेऊन) सेवासुश्रुषा करणं, हेही करायला हवं. त्यातून समाजाचं होणारं दर्शन आपल्याला निश्चितपणे समृद्ध करणारं होईल. **'इतरांसाठी कोणतीही अपेक्षा न ठेवता धडपडण्यात मिळणारा आनंद अवर्णनीय असतो; तो तुम्ही अनुभवावा,'** असं आवाहन करतो.

'ही दिवाळी तुम्हाला **'स्वयं'विकासाचा प्रकाश देणारी होवो व इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची इच्छा व बळ वाढवणारी होवो,'** यासाठी भरभरून शुभेच्छा! 'छात्र प्रबोधन' तुमच्या या प्रवासामध्ये तुम्हाला सतत सोबत करेल, आग्रह धरेल, मदत करेल आणि दिशादर्शनही करेल!

भेटत राहू या विविध माध्यमांतून!!

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**
**संपादक**


Bharat Petroleum

# सिद्धी गॅस एजन्सी

**भारत गॅसचे पिंपरी परिसरासाठी वितरक**
**पत्ता : प्लॉट नं. एच्-पी-१, एच् ब्लॉक, एम.आय.डी.सी.,**
**पिंपरी, पुणे ४११०१८ दूरभाष : ०२०-२७४८५९६०**

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

सौर कार्तिक । शके १९४२
वर्ष २१ । अंक २
वार्षिक वर्गणी – ₹ २०० । मूल्य ₹ ८०

दीपावली विशेषांक २०२०

# अंतरंग

## कथा

७. सारेगम–डोरेमिफा – स्वाती राजे
* ९१. वाचा – अद्‌भुत साहसयात्रा – भारत सासणे
२३. माणुसकीचा गणवेश – डॉ. रामचंद्र देखणे
* २६. वाचा – मुघल शहजादा – निनाद बेडेकर
६३. समर्पण – डॉ. संजय ढोले
* ७२. ऐका –गारपीट – किशोर कदम
* ७२. पाहा – दिव्यांग खेळाडूचा संक्षिप्त जीवनप्रवास

## विशेष विभाग – कोरोनासह जगताना...

४३. कविता : चला उभारू आयुष्याला – प्रवीण दवणे
* ४३. ऐका – चला उभारू आयुष्याला कवितेचे रसग्रहण
४५. व्यक्तिविकसनपर : प्रवाही आणि प्रभावी वृत्ती – गुंजन कुलकर्णी
* ४७. ऐका – न्यू–नॉर्मल आणि मी! – स्वप्नीला सेठिया
४९. प्रासंगिक : कोरोना आणि आत्मनिर्भर भारत – अमोल फाळके
* ५३. पाहा – डॉ. धनंजय केळकर यांचे 'कोरोनासह जगताना' याबाबत मार्गदर्शन
५४. अनुभवपर : जागवू संवेदना – कु. मधुरा बापट
५६. प्रेरणादायी : कोरोना लॉकडाऊन काळात ज्ञान प्रबोधिनीचे मदतकार्य
* ५६. वाचा – वैशिष्ट्यपूर्ण मदतकार्याचे सविस्तर वृत्त – संकलन – मानसी बोडस

## ललित

१५. रवींद्रनाथांच्या कुमारकथा – स्वाती दाढे
* १८. वाचा : 'पावसाचा निबंध' – शैलजा देशमुख
* १९. ऐका : अंध संगणक तज्ज्ञ कृष्णकांत माने यांची मुलाखत
२९. मैत्रीत पडा – डॉ. आशुतोष जावडेकर
* ३२. ऐका : दुर्गमैत्री – प्र. के. घाणेकर
७३. सार–भात – विजय जोरी
* ७७. ऐका : गरम चहाची कथा – मल्हार अरणकल्ले
८२. उगवत्या सूर्याचा प्रदेश 'अरुणाचल' सायकल दौरा – तेजस कुलकर्णी

वाचा
छात्र प्रबोधन
दिवाळी अंक २०१९

अवश्य वाचा... पाहा... ऐका...
* हे लेख QR कोडला जोडले आहेत, ते स्मार्टफोनवर स्कॅन करा. त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR Code Scanner मोफत डाऊनलोड करा.

छात्र प्रबोधनच्या वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

statfield equipments

स्टॅटफील्ड इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड
* पावडर कोटिंग आणि लिक्विड पेंटिंगसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचे उत्पादक *

It is one of the leading ISO 9001 certified companies in the field of Powder Coating and Airless Spray Coating Equipment.

१०७३/१,२,३, मुठा रोड, पिरंगुट , पुणे ४१२११५, महाराष्ट्र ☎ ०२०–६६५७०१००, www.statfieldequipments.com

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
नीलिमा करमरकर,
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
अनादि ढवळे

**अक्षर जुळणी**
माधवी दाते, सुप्रिया कुलकर्णी

**मुद्रित शोधन**
रंजना दाते

**मुखपृष्ठ** – सचिन जोशी
**मांडणी/सजावट**
राहुल धामणे
**चित्रकार** – राहुल देशपांडे
चित्रांजली, गिरीश सहस्रबुद्धे
**शीर्षक लेखन** – संजय शिंदे
**अर्थ संकलन/व्यवस्थापन**
वेदा भागवत, श्रुती गोखले
सुलभा कुलकर्णी

**प्रचार व वितरण**
राहुल धायगुडे
उल्हास बुडुख
ज्योती पवार
अपर्णा घाटे
गावोगावचे
केंद्रप्रमुख
व कार्यकर्ते

## कविता

**१९. आमच्या पाऊसकथा** – आश्लेषा महाजन
**७९. जंगलाचं देणं** – किरण पुरंदरे
**७९. रानातली पोर** – संगीता बर्वे
✻ १४. ऐका–पाहा – विज्ञानगीत (हिंदी)
✻ ७९. वाचा – दिव्यांचा, उत्सव – प्रसाद कुलकर्णी
**९३. गीत – नव्या युगाचे...**(✻ ऐका – गीताची चाल)

## विज्ञान माहितीपर

**१३. प्रकाश–जीवनाचा अविभाज्य घटक** – प्रीतेश लोले
**३३. उचलली जीभ अन्...** – डॉ.कांचनगंगा गंधे
✻ ३५. वाचा : त्रयोदशगुणी विडा – डॉ. कांचनगंगा गंधे
✻ ७९. वाचा : शास्त्रज्ञ–मेघनाद साहा – नीलिमा करमरकर

## मासिकाविषयी...

**ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी**
**कृतिशीलता जोपासणारे मासिक!**
**प्रकाशन दिनांक :** राष्ट्रीय सौर १० कार्तिक शके १९४२,
(१ नोव्हेंबर २०२०)
**या अंकाची किंमत :** ₹ ८०/-
**वर्गणी : वार्षिक – ₹** २००, **द्वैवार्षिक – ₹** ४००,
**त्रैवार्षिक – ₹** ५५०, **दशवार्षिक – ₹** १७००
(घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा.)
**इ–अंक : वार्षिक वर्गणी – ₹** १००
**संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030.
☎ ०२०–२४२०७१७४/१७५
**वर्गणी भरण्यासाठी व प्रकाशने खरेदीसाठी**
**www.jpprakashane.org**
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org

## कृतिपर

**२१. रांगोळी रेखाटनामधील मूलभूत चिन्हे** – विश्वास सोनावणे
✻ २१. पाहा – कलात्मक रांगोळ्या
**२७. विज्ञान प्रयोग – दिशा बदलणारा बाण** – प्रीतेश लोले
✻ २७. पाहा – 'दाब' या तत्त्वावर आधारित विज्ञान प्रयोग
**५७. ओळख वारली चित्रशैलीची** – मनाली भांडारे-पटवर्धन
✻ ५७. पाहा – सुशोभने कशी कराल?
**९४. दिवाळी भेट – आकर्षक आकाशकंदील**
संकल्पना व रचना – रोहित कोकिळ



## याशिवाय

२०. सोडवा हे शब्दकोडं, हास्यलहरी
३७. ज्ञान प्रबोधिनी प्रकाशने पुस्तकसूची ७७. हाहाहा
८१. आजची ज्ञान प्रबोधिनी (✻पाहा –प्रबोधिनीची चित्रफीत)
९४. सफर दिवाळी विशेषांकाची – वैयक्तिक स्पर्धा

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

'समाज परिवर्तनासाठी स्वयंविकास' करण्यासाठी सर्वांना शुभेच्छा!
minilec®
**मिनिलेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**
विश्वसनीय यंत्रसामुग्री, संरक्षणासाठी लागणारे मॉनिटरिंग आणि प्रोटेक्शन कंट्रोल रीले अलार्म, अनाउन्सीएटर्स
Minilec is the leading Indian manufacturer of reliable electronic industrial products like Monitoring, control, protection Relays & alarm Annunciator, protecting Equipment & Machineries against abnormal Electrical system.
१०७३/१,२,३, मुठा रोड, पिरंगुट, ता. मुळशी, पुणे ४१२११५, महाराष्ट्र, ☎ ०२०–२२९२२३५४, www.minilecgroup.com

# ज्ञान प्रबोधिनी

**स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था! देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणारी गतिशील संघटना! प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ!**

**ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा पाया असलेली सात तत्त्वे म्हणजेच तत्त्वसप्तक**

विज्ञानाभिमुखता, उत्तमता, विकास, संघटना, जनी जनार्दन ऐसा भाव, हिंदू जीवनदृष्टी, **समाजसंस्थापना**

## ।। समाजसंस्थापना ।।

व्यक्तीच्या जीवनाचे सार्थक होण्यासाठी समाजात संस्कृती तयार व्हावी लागते. परंपरा टिकवून ठेवणे व संस्कृती तयार होताना कालोचित बदल घडविणे या दोन्ही प्रक्रिया आवश्यक असतात. या प्रक्रियांना विचाराचे अधिष्ठान देणे म्हणजे विचार प्रबोधन. ते रुजवून समाजाला कार्यप्रवृत्त करणे म्हणजे कार्य प्रबोधन. मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ नये म्हणून वारंवार कराव्या लागणाऱ्या या दोन्ही प्रकारच्या जागृतीला समाज संस्थापना म्हटले आहे.

## समाजसंस्थापनेचे काही पैलू व त्यांचे प्रबोधिनीतील आविष्कार

- **भौतिक समृद्धी व नीतिमंत श्रीमंती** – व्यक्ती जीवनाला भौतिक समृद्धीची जी आस असते, ती पूर्ण होण्यासाठी ज्ञान आणि विज्ञान या दोन्हीचा अवलंब करावा लागतो. आजच्या युगात आध्यात्मिक धारणा व विज्ञानाभिमुखता यांच्या पायावर आधारित विकास साधला तरच अखिल मानवजातीची टिकाऊ संस्कृती निर्माण होऊ शकेल. सर्वांच्या ठायी असलेले परमात्म तत्त्व पाहणे म्हणजे 'जनीजनार्दन ऐसाभाव' त्यासाठी आवश्यक आहे व सर्वांच्या उत्कर्षात खरी उत्तमता साठवली आहे.

  ※ यंत्रशाळा व अन्य रचनांमधून तंत्रशिक्षण आणि बांबू व औषधी वनस्पतींच्या ऊती संवर्धनाचे प्रशिक्षण देऊन स्व–बळावर उभे राहणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन, साखर कारखाना, धारक विभाग, फळप्रक्रिया असे उद्योग चालवणे, बुद्धिमत्ता–मापनासारखे हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोचलेले संशोधन–प्रकल्प राबवणे, 'शिवगंगा खोरे विकासयोजना' सारख्या ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या दीर्घकालीन योजनांना पाठबळ देणे अशी अनेक कामे प्रबोधिनीत होतात. विद्यार्थ्यांनी कंदिल–पणती इ. विक्री उपक्रमातील आधिक्याचा आर्थिक गरजूंसाठी वापर करण्याला प्रोत्साहन.

- **उपासनेसी लावावे जग** – नित्य आत्मपरीक्षण करत राहिल्यानेच व्यक्तीला इतरांच्या हिताचा विचार करून आपल्या कामात व कार्यपद्धतीत योग्य ते बदल करता येतात. इतरांच्या सामर्थ्याची जाणीव होते. आपल्या अहंकाराचे विसर्जन करता येते. हिंदू जीवनदृष्टीमध्ये अशा आत्मपरीक्षणासाठी उपासना सुचवली आहे.

  ※ व्यक्तिगत व सामूहिक साप्ताहिक नित्य उपासनेवर तसेच व्यक्तिविकासाचे संकल्प करायला सुचवणाऱ्या वार्षिक उपासनांवर चिंतन व अनुभवांचे आदानप्रदान होत असते. विद्यार्थी वयापासूनच उपासनेचा परिचय होतो.

- **उपास्यानाम अनियम** – परमेश्वरी शक्ती नानाविध रूपांमधून प्रकट होत असते, हे हिंदू जीवन दृष्टीत मानले आहे. सांस्कृतिक अर्थाने हिंदू म्हणजेच भारतीय. एकाच शक्तीच्या विविध आविष्कारांना भारतीय संस्कृतीत समान आदराचे स्थान आहे. समाजातील विविध प्रकारच्या मतांमध्ये व पंथांमध्ये साहचर्य व सौहार्द असावे, अशी भूमिका आहे.

  ※ यासाठी प्रबोधिनीत महापुरुष–महासतीपूजन, सर्वधर्मप्रार्थना, शबद–कीर्तन, विविध समाजगटांच्या चालीरीती व धर्मस्थळे पाहण्यासाठी अभ्यासदौरे, 'अवेस्ता' सारख्या धर्मग्रंथांवर संशोधन अशा विविध उपक्रमांची योजना होते. शालेय विद्यार्थ्यांनीही चर्च, गुरुद्वारे, मंदिरे यांना भेटी देऊन विविध उपासना पद्धती समजून घेण्याच्या योजना असतात.

- **कंटकांचे निर्दालन** – समाजातील विधायक प्रयत्नांच्या यशासाठी व सातत्यासाठी संघर्ष करावा लागतो. व्यक्ती व समाज–घटकांमधील दुष्प्रवृत्तींचा प्रतिकार केल्यानेच विधायक प्रयत्नांकडे समाजाची प्रवृत्ती टिकून राहते. त्यासाठी संघटना करावी लागते.

  ※ दारूबंदी, सती–प्रश्नावरील आंदोलन याद्वारे प्रबोधिनीने संघर्षाचीही भूमिका घेतली तर पंजाब–सद्भाव यात्रेद्वारे विधायकतेचा मार्ग दाखविला. शरीरबल व मनोबल वाढवण्याच्या योजना विद्यार्थ्यांसाठी दलांवर होतात, व्यक्तीकार्य व जोडीकार्यातून विविध अनोळखी ठिकाणचे अनुभव घेण्याला प्रोत्साहन दिले जाते.

तत्त्वसप्तक संकलितपणे वाचा

## संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्र

**शिक्षण। संशोधन। ग्रामविकसन। आरोग्य। नेतृत्व विकसन। स्त्रीशक्ती प्रबोधन। राष्ट्रीय एकात्मता। सामाजिक उद्योजकता**


**SANTOOL**

211/4, Navi Peth, Pune - 411 030,
www.santool.co.in

We specialize in providing manufacturing services where functional and process challenges are evident. We mainly cater to the customers needing high precision

We, are committed to achieving higher quaity standards in manufacture and Supply of egineeing items/ components/ equipment as per customers' drawings and specifications by employing appropriate technology, ensuring customers' satisfaction every time. in manufacturing of components, sub-assemblies / assemblies often involving special processes.

कथा

# सारेगम डोरेमिफा

– स्वाती राजे



एक होती राजकन्या. सुंदर, गोऱ्या रंगाची? अंऽ नाही! तशी नाही! नाजुकनाजुक अंगाची?

तशी पण नाही!

मग... मऊ सोनरी केसांची?

मुळीच नाही!

बरं मग, सरळ तरतरीत चाफेकळी नाकाची?

नाही... नाही... तशी तर नाहीच नाही.

राजकन्या सानेई! राजकन्याच; पण नकट्या नाकाची, गोबऱ्या गालाची, गब्बूसिंग नसली, तरी नाजुकबिजूक नसलेली आणि अगदी काळ्याकाळ्या दाट कुरळ्या केसांची; तिच्या आजीच्या भाषेत, बटांची कसली; जटांची!

तिची आजी म्हणायची, 'कुठला गं आला हा सावळा रंग हिला? आपल्याच घरी

**'एक होता राजपुत्र... एक होती राजकन्या... अन् शेवटी ते सुखाने नांदू लागले...'**
**गोष्ट तशी जुनीच – गेल्या हजारो वर्षांपासून ते आजतागायत जगाच्या पाठीवर कुठेही घडणारी!**
**आपल्या राज्याच्या सीमा वाढवण्यासाठी अनेक कटकारस्थाने रचणारी... 'हेरगिरी, मित्रद्रोह, द्वेष, युद्ध, संहार अन् काय-काय...'**
**पण मित्रांनो, या कथेत मात्र हा इतिहास, वर्तमान, भविष्य बदलण्याचा एक छानसा मंत्र राजकन्या-राजपुत्राला सापडलाय...**
**कोणता, तो तुम्हीच कथा वाचून शोधून काढा!**



वार्षिक देणगीदार – • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद • एक हितचिंतक, पुणे
• सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका

देवानं कसा हा हिरा दिला!'
सानेईची आत्या म्हणजे रूपद्वीपाची रूपवान राणी. ती नेहमी म्हणायची, ''माझी साजिरी म्हणजे पारिजातकाचं फूल. माझी गोजिरी म्हणजे जाईचं फूल. नाजूकसं, साजूकसं! आणि आमची सानेई म्हणजे... टपटपीत बटमोगरा!''

यथावकाश साजिरी-गोजिरीची लग्नं झाली.

'सानेईचं लग्न कधी होणार आणि कसं होणार,' याची काळजी लागली आईला आणि आजीला! सानेईच्या बाबांना ती होतीच; पण जराशी वेगळी. म्हणजे गोष्ट अशी की, मुलामुलींची लग्नं होत असत ती दोन राजांच्या मैत्रीसाठी; म्हणजे 'महासम्राट' होण्यासाठी सगळे राजे एकमेकांशी खूप भांडत.

मग जवळच्या एखाद्या राजाच्या मुलाशी लग्न झालं की, दोन राजे होत मित्र!

मग युद्ध करायची वेळ आली की, दोन सैन्यं होत एकत्र. आणि करत चढाई तिसऱ्या राजावर! असा 'चढाईखोर' जावई मिळवायला सगळ्या राजांची आपापसात चढाओढ! बरं, चढाया करून तरी ते निवांत होते का? कसलं काय! लढाईच्या भीतीने सगळे राजे चिंतेत आणि त्यांची प्रजा सतत काळजीत!

सानेईला याचं फार वाईट वाटे.

''यावर काही उपाय नाही का बाबा?'' सानेई विचारी.

राजा हसे. म्हणे, ''एकच उपाय! तू चांगल्या, सर्वात ताकदवान राजाच्या मुलाशी लग्न कर. म्हणजे तो होईल आपोआप माझा मित्र आणि आजूबाजूचे राजेही राहतील आपल्याला घाबरून.''

सानेईला याचा फार राग येई. मग ती निघायची राजवाड्याबाहेर फिरायला. एकटीच.

घोड्यावरून...?

अहं! तिच्या सायकलीवरून! तसं सानेईला घोड्यावर बसायला शिकवलं होतं बाबांनी. म्हणजे घोडेस्वारी, तलवारबाजी, नेमबाजी, गणित आणि शास्त्र! आपण *'मॉडर्न'* आहोत, हे दाखवायची पण चढाओढ होती नं, आजूबाजूच्या राज्यांत! मग आवडत नसतानाही सानेईला शिकायला लागल्या या सगळ्या विद्या!

चांगल्या, ताकदवान राज्याचा राजपुत्र नवरा म्हणून मिळण्यासाठी सानेईलाही युद्धशास्त्राचे घ्यावे लागले धडे. त्यातून सानेईसारखी राजकन्या! राजकन्येसारखी मुळीच न दिसणारी! आजीच्या भाषेत, 'रूप जरा डावंच, मग गुणांनी तरी बरी असावी!' म्हणून मग, या सगळ्या *'मॉडर्न'पणा* बरोबर तिला शिकावं लागायचं विणकाम, शिवणकाम, भरतकाम, स्वयंपाक्यांवर कशी नजर ठेवायची? नोकर, चाकर, दासींकडून कशी कामं करून घ्यायची? खास *हेल्दी मेनू*चं *कॅलरीज* मोजून *टाईमटेबल* कसं लावायचं? *'फॉरिन रिलेशन्स'* हाही तिच्या अभ्यासाचा भाग! म्हणजे परदेशाहून आलेल्या पाहुण्यांची कशी बडदास्त राखायची आणि कुण्या पाहुण्याच्या बायकोला कुठं *शॉपिंग*ला न्यायचं...

मग सानेईला यायच्या जांभया! आजी म्हणायची, ''कसलं लक्षण तुझं! राजकन्येनं कसं नटावं! थटावं! नाजूकसाजूक वावरावं!'' सानेईला तर यातलं काहीच आवडायचं नाही.

जरूर पाहा... ncsu.edu/midlink (माध्यमिक शाळेतील मुलांसाठी विज्ञानाचे मासिक)

वार्षिक देणगीदार – • श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर • श्री. राहुल भिडे, पुणे
• एक हितचिंतक, कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ, नाशिक

तिला आवडायचं गाणं. खूप खूप खूप... पण बाबांना ते कोण सांगणार? बाबांना तर पडली होती, त्यांच्या *'इमेज'ची* काळजी! *'इमेज'* म्हणजे लोक आपल्याबद्दल काय बोलतील, याचा विचार. सानेई ना सुंदर होती, ना नम्र, ना *स्मार्ट!* आई एकटी तिच्या बाजूची; पण कधीच फार न बोलणारी. पण तरीही, आईनं एक दिवस हळूच काढला विषय.

''सानेईला शिकायचंय गाणं!''

बाबा म्हणाले, ''*नथिंग डुइंग!* आता गरजेपुरतं झालंय शिकून! आता लग्नाचं पाहू!''

आणि मग त्यांनी रचलं. सानेईचं स्वयंवर!

म्हणजे... त्या जुन्या स्वयंवरांसारखं हातात माळ घेऊन राजकन्या येते हळूहळू चालत आणि आवडणाऱ्या राजपुत्राच्या गळ्यात घालते, माळ, लाजत लाजत... तसलं स्वयंवर नाही! सानेईचे बाबा होते ना *'मॉडर्न!'* म्हणून 'आधुनिक स्वयंवर!' त्यांनी *इ-मेल्स* केल्या. सगळ्या दूरच्या, जवळच्या मित्रराजांना. त्यांच्या राजपुत्रांच्या घेतल्या *अपॉईंटमेंट्स*. एकेका राजपुत्राचा *'टाइमस्लॉट'* ठरलेला! मग सानेई आणि राजपुत्र थोडा-थोडा वेळ करणार 'चॅट.' म्हणजे खऱ्या गप्पा मारणार. एकमेकांना समजून घेणार!

आजी म्हणाली, ''चांगले सुंदर कपडे घाल.''

आई म्हणाली, ''*मेकओव्हर* करून घेऊ.''

बाबा म्हणाले, ''विचारलं त्यांनी की काय आवडतं, तर 'बंदुकीनं नेमबाजी' सांगायचं किंवा 'आर्चरी!' आणि विचारलं की, मला कशी मदत करशील राज्य चालवायला, तर सांगायचं की, युद्धनौकेच्या *डिझाइनचा स्पेशल कोर्स* झालाय म्हणून!''

सानेईला या सगळ्याचा ऐकता-ऐकता एकदम कंटाळा आला. तिचे कान गरम-गरम झाले. तिला बोलावंसं वाटलं, सांगावंसं वाटलं, जोराने खूप ओरडून, 'मला यातलं काही काही-काही आवडत नाही! बंदूक आवडत नाही, लढाई आवडत नाही. खरंतर लग्नच आवडत नाही.'

तिला राग येता-येता यायला लागलं रडू. तिनं बोलायचा केला प्रयत्न; पण घशातून आवाज फुटेचना!

आजी म्हणाली, ''हा काय नवा प्रकार! देते हळद-दूध. सुटेल आवाज उद्यापर्यंत. लग्न म्हटलं की, *टेन्शन* येणारच.''

सकाळी उठली सानेई. आजीने तिला केशर, उटणं लावलं. दासींनी तिला सोनेरी झग्यानं सजवलं. आईने तिच्या केसांना कसंबसं पिनांत अडकवलं. चेहऱ्यावर केला *मेकअप*... आख्खा *मेकओव्हर!* काळी सानेई झाली गोरीपान!

आई म्हणाली, ''आरशात बघ... दिसत्येस कशी, आत्याच्या मुलींसारखी. फुलांसारखी छान, छान!''

सानेई आरशात डोकावली; पण आरशात तर कुणी दिसेचना! सानेईला काही कळेचना! सानेई घाबरली, आई घाबरली, आजी घाबरली... बाबांना निरोप गेला.

''सानेई हरवली... सानेई हरवली!''

बाबा आले म्हणाले, ''हरवली?' फक्त आरशातच हरवली ना? मग कशाला हवा गोंगाट! स्वयंवर ठरल्यावेळी होणारच! लागा सगळे तयारीला!' त्यांनी विचारलं

सानेईला, ''तुझा काय 'पण' आहे?'' सानेईनी विचार केला. पेन, कागद मागवलं त्यावर आपला 'पण' लिहिला. 'जो मला शोधून देईल, त्याच्याशीच माझं लग्न होईल!'

राजाने भराभरा 'इ-दवंडी' पिटली.

*'ऐका हो ऐका!*
*राजकन्या सानेई*
*आरशातून हरवली आहे.*
*तिला शोधून देणाऱ्या*
*राजपुत्राशी तिचं लग्न*
*लावण्यात येईल होऽऽ!'*

भराभरा इ-*मेल्स* आल्या. अनेक राजपुत्र आले दौडत, *हॉर्न* वाजवत, धूळ उडवत, *हेलिकॉप्टरनी* भिरभिरत, *पर्सनल जेट्सनी* उडत आले. स्वयंवर भरलं. सानेईनी कंटाळत राजपुत्रांकडे पाहिलं. प्रत्येक राजपुत्र तिला आपल्या अपेक्षा सांगू लागला.

सानेईला राग-राग-राग येत चालला. सगळ्यांना तिच्या लग्नाची घाई. तिला काय हवं, ते कोणी विचारलंच नाही! 'नकोच ते लग्न. नको राजपुत्र, नको असला राजवाडा! नकोच ते राज्य!' सानेई एकदम ताडकन उठली.

राजवाड्याबाहेर धावत सुटली. तिने राजवाड्याच्या भिंतीजवळची सायकल घेतली. *पॅडल* मारत ती जोरात निघली. दूर, दूर घरापासून दूर. सगळ्यांपासून दूर, लोकांपासून दूर आणि स्वत:पासून दूर! किती दूर... कुणास ठाऊक! ऊन चांगलं तापलं होतं. सायकल मारूनमारून तिला आला होता घाम आणि लागली होती खूप तहान!

आणि तेवढ्यात सायकल झाली पंक्चर; तशी ती एकदम थांबली. तिनं भवताली पाहिलं. ती किती आली दूर, याचं तिला राहिलंच नव्हतं भान!



अरे बापरे... हे काय! भवती काळ्या जहरी सुरवंटांचं काटेरी रान!

त्यांनी खाऊन टाकलेलं पान आणि पान!

सानेई शहारली. तिला आजीनं सांगितलेली गोष्ट आठवली...

'फार फार वर्षांपूर्वी दोन राज्यांच्या मधे होतं एक दाट जंगल. जंगलातून नदी झुळझुळ वाहायची. दोन्ही राज्यांना पाणी द्यायची. झाडं-पानं डोलायची. दोन्ही तीरांना छान शेती पिकायची... पण एकदा काही विपरीत झालं. रातोरात जंगल जळालं. जंगलभर माजलं काळ्या सुरवंटांचं रान. पान-पान फस्त करून ते पुढे-पुढे सरकत राहिलं. अनेक, अनेक केले उपाय. पण सुरवंटांना हटवायला कुणालाच जमलं नाही!'

आजी मग बसायची गप्प. तिच्या डोळ्यात दिसायचं

दुःख! आई पाहात राहायची दूर. तिच्या डोळ्यांतून पाणी झरायचं. कुणीच यापुढे काहीच नाही बोलायचं.

सानेईला सगळं आठवलं... भीतीनं मन भरून आलं. 'काय करावं? पुढे कुठे जावं?' सानेईनी मागे वळून पाहिलं. घर तर आता लांब राहिलं. झुळझुळ झऱ्याचा आवाज आला. सानेईनी जंगलात पाऊल टाकलं. झऱ्याच्या काठावर पोहोचता पोहोचता मधेच तिचे दुखले पाय. ती टेकली जरा झाडाशी. तिला झोप कधी लागली, ते कळलंच नाही!

झोपेत एकदम कोणीतरी बोललं, ''*हॅलो!* कोण तू? इथं कुठं आलीस?'' सानेई दचकून जागी झाली. समोर एक मुलगा. ती धडपडून उठली.

'अरे बापरे! हे लग्नाचे राजपुत्र सगळे... शोधत इथपर्यंत येऊन पोहोचले?' तिनं एकदम घाबरून पाहिलं. एक मुलगा राजपुत्रासारखा; पण डोक्यावर मुकुट नसलेला. मुकुटाऐवजी हिरवं *हेल्मेट*, कडेला तिच्यासारखी *रेसर* सायकल.

''कोण आहेस तू? आणि या रानात करत्येस काय?''

सानेईने बोलायला तोंड उघडलं; पण ओठातून शब्द फुटेच ना! मग सानेईने केले हातवारे. खाणाखुणांनी त्याला सांगायचा केला प्रयत्न. तिच्याकडे बघत समजुतीने मुलगा म्हणाला, ''*ओ सॉरी! आय अंडरस्टँड!* तुला बोलता येत नाही!'' हातातली *वॉटर बॉटल* देत म्हणाला, ''हे घे. पाणी पी.''

''तुला एक सांगू का, मी आलोय घरातून पळून, तुझं काय?''

सानेईला एकदम बरं वाटलं, हा आपल्यासारखाच दिसतोय म्हणून!

'मी पण आलीये तुझ्यासारखीच घरातून पळून!' तिनं सांगितलं खाणाखुणांनी! दोघांनाही वाटली मजा. दोघांनीही दिली एकमेकांना टाळी हसून...

मुलगा म्हणाला, ''मी विक्रमपूरचा राजपुत्र गंधार.



गंधार कसला!
माझ्याभोवती तर फक्त अंधारच अंधार!''

त्याच्या बोलण्याची गंमत वाटता-वाटता सानेईचे डोळे एकदम विस्फारले... विक्रमपूर... हा तर आपला शत्रू देश! विक्रमपूरबरोबर सानेईच्या राज्याची सात पिढ्यांची दुष्मनी! तिनं थोडं दबकत या मुलाकडे पाहिलं. 'पण तसा हा शत्रूसारखा वाटत नाही.'

सानेईच्या सायकलची अवस्था त्याला दिसली. *पंक्चर* काढायला वाकता-वाकता तो एकदम ओरडला, *''ओ माय गॉड! तुझ्या हेअरस्टाईलमध्ये* केलीये झाडावरून टपकलेल्या सुरवंटांनी गस्त! एक नाही... दोन नाही... तीन. तीन काळ्या सुरवंटांची चाललीय मस्ती!'' सानेई थरथरली. मनातल्या मनात जोराने किंचाळली.

राजपुत्र म्हणाला, ''इथे बघ.'' त्याने सायकल आडवी केली. सायकलीच्या आरशात सानेई डोकावली. आरशात काही दिसेचना! राजपुत्राला काही कळेचना! मग त्याच्या डोक्यात जरा पडला प्रकाश. ''ओह! तू तर खरीखुरी गोष्टीतल्यासारखी, एकदम *फेअरी टेलमधली* हरवलेली राजकन्या. आवाज हरवलेली, चेहरा हरवलेली आणि स्वत:च जंगलात हरवलेली राजकन्या!''

सानेईला रडू कोसळलं. राजपुत्राला वाईट वाटलं. तो म्हणाला, ''रडू नकोस! आपण तुला शोधून काढू!''

सानेईला जरा बरं वाटलं. ती हरवल्यापासून तिला असं कोणीच नव्हतं म्हटलं. शोधायला निघण्यापूर्वी तिनं झऱ्यात उतरून पोटभर पाणी पिऊन घेतलं. चेहरा धुतला खसाखसा. *मेकअप* सगळा उतरून गेला. *हेअरस्टाईलच्या* पिना काढल्या. हळूच कुरळे केस सोडले. वाऱ्यावरती भुरभुर उडले. राजपुत्र म्हणाला, *''व्हॉट अ रिलिफ!* आत्ता तू दिसतेस खरीखुरी मुलगी! मगाशी होतीस जपानी नाचातली, खरा चेहराच न कळणाऱ्या काबुकीची बाहुली!''

सानेई मनापासून हसली. पहिल्यांदाच, आयुष्यात अगदी पहिल्यांदाच, ती कोणाला तरी आहे तशीच, बरी वाटली!

राजपुत्र म्हणाला, *''सरप्राइज!* तुझ्या डोक्यावरच्या सुरवंटांचं जांभळं झालंय अंग! आणि हे बघ! या आपल्या रानाचाच जांभळा झालाय रंग!''

सानेई एकदम म्हणाली, ''ओ हो!'' आणि तिने आश्चर्याने लावला आपल्या गळ्याला हात. आख्ख्या दोन दिवसांनी सानेईला सापडला आपला आवाज!

राजपुत्र म्हणाला आश्चर्यानं, ''तू बोललीस? स्वत:च्या आवाजात?''

सानेई म्हणाली, ''बहुतेक! माझ्या स्वत:च्या आवाजात!''

राजपुत्र म्हणाला, ''तू आहेस तरी कोण? गोष्टीमधली परी की, जंगल जांभळं करणारी जादूगार?'' सानेई म्हणाली, ''मी वाट चुकलेली राजकन्या.''

राजपुत्र म्हणाला, ''तुझी वाट इथं कुठं चुकली? तुला शत्रूची भीती नाही वाटली?'' सानेई एकदम दचकली. हा शत्रुदेशाचा राजपुत्र, हे ती कसं विसरली?

सानेईनी विचारलं सावधपणानं, ''तुला लढाई करता येते?''

(कथेचा उत्तरार्ध पान क्र. ८५ वर)

कथेच्या पुढील भागासाठी येथे क्लिक करा.

# प्रकाश
## जीवनाचा एक अविभाज्य घटक!

– प्रीतेश लोले


माहितीपर

आत्ता आपण घरोघरी साजरी करत असलेली ‘दिवाळी’ आपल्या भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण. दिवाळी सणात ‘प्रकाशा’चे खूप महत्त्व असते. पणती, मेणबत्ती, आकाशकंदील, रंगीबेरंगी आतषबाजीच्या प्रकाशाने आसमंत उजळून निघतो आहे; पण एखाद्या सण-उत्सवापुरते मर्यादित न राहता, प्रकाश हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे!

सूर्योदय, सूर्यास्त, उन्हाळा-पावसाळा-हिवाळा तसेच ऋतुमानानुसार उन्ह-पावसाचा खेळ, काही काळासाठी सूर्याचं आभाळापलीकडे दडून बसणं, रात्रीच्या वेळी अनुभवता येणारा चंद्राचा शीतल प्रकाश ह्या सगळ्या प्रकाशाशी निगडित नित्याच्याच गोष्टी आहेत.

पृथ्वीवर जीवसृष्टीची निर्मितीच मुळात सूर्यप्रकाशामुळे झाली आहे. पृथ्वीचे सूर्यापासूनचे अंतर, परिभ्रमण, परिवलन, २३.५° कललेला पृथ्वीचा अक्ष आणि यामुळे होणारे दिवस-रात्र, अमावस्या, पौर्णिमा, ग्रहण, दक्षिणायन-उत्तरायणयातून निसर्गचक्राचा अनुभव आपण घेत आहोत. सूर्यावर घडणाऱ्या हेलियम आणि हायड्रोजन या दोन वायूंशी निगडित वेगवेगळ्या रासायनिक अभिक्रियातून प्रकाश आणि उष्णता ऊर्जेची निर्मिती होते. हवेमध्ये प्रकाशाचा वेग सुमारे ३ लाख मीटर/सेकंद असून सूर्यकिरण सूर्यापासून पृथ्वीच्या पृष्ठभागावर पोहोचण्यासाठी ८.२० मिनिटे इतका कालावधी लागतो. तर पाण्यामध्ये प्रकाशाचा वेग सुमारे २.२५ लाख मीटर/सेकंद असून माध्यमाच्या घनतेनुसार प्रकाशाचा वेग बदलतो.

सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर आकाशाचा निळा रंग तुम्ही पाहिला असेल.त्याच आकाशात सूर्योदय आणि सूर्यास्तावेळी लाल-केशरी रंगाच्या अनेक छटा दिसतात. तर पावसाळ्यात तेच आकाश कधीकधी पांढरे शुभ्र दिसते. असं का बरं होत असेल?





वार्षिक देणगीदार – • श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे • श्री. विकास हरताळकर, पुणे • एक हितचिंतक, पुणे

सूर्यप्रकाश सप्तरंगांनी बनलेला आहे. सूर्याचे पृथ्वीच्या क्षितिजापासूनचे अंतर, दिशा आणि या सात रंगांच्या तरंग लांबीतील फरकामुळे आकाशात उमटणाऱ्या रंगछटा आपण अनुभवत असतो.

दररोज सकाळच्या सूर्यप्रकाशात शरीराचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक 'ड' जीवनसत्त्वाची निर्मिती होते. त्यामुळे मोकळ्या हवेत घातलेले सूर्यनमस्कार, केलेले व्यायामाचे वेगवेगळे प्रकार यांमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यासाठी, दात व हाडांच्या मजबुतीसाठी मदत होते. त्वचेचे विकार तसेच नवजात बालकाची कावीळ बरी होण्यासाठी प्रत्यक्ष सूर्यप्रकाशातील वावर महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे वनस्पतींची प्रकाश संश्लेषण क्रिया, वनस्पतींवर अवलंबून पशू, पक्षी आणि एकूणच अन्नसाखळीचे मूळच प्रकाश ऊर्जेत दडले आहे.

आपल्या संस्कृतीमध्ये प्रकाशाचे महत्त्व पटवून देणारे आणि वातावरणातील तापमान बदलाची जाणीव करून देणारे अनेक सण-उत्सव आपण साजरे करतो. कोणत्याही कार्यक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्ज्वलनाने होतो, हा त्याचाच एक भाग. दिवाळीनंतर पंधरा दिवसांनी येणारी 'त्रिपुरी पौर्णिमा' तसेच 'मकर संक्रांत', 'होळी', श्रावण महिना सुरू होतानाची 'दिव्याची अमावस्या', चंद्राचा शीतल प्रकाश अनुभवता येणारी 'कोजागिरी पौर्णिमा' यांसारख्या सणांची रचना शास्त्रीय पद्धतीनेच करण्यात आली आहे.

सूर्याप्रमाणे पावसाळ्यात चमकणारी वीज, धुमकेतू, काजवा (किडा) इ. प्रकाशाचे नैसर्गिक स्रोत आहेत. सूर्य, चमकणारी वीज हे प्रकाशाचे प्रखर स्रोत तर धुमकेतू, काजवा(किडा) हे शीतल स्रोत म्हणून परिचित आहेत. मेणबत्ती, *बल्ब, ट्यूब लाईट, लेझर* इ. प्रकाशाचे मानवनिर्मित स्रोत आपण वापरतो. मानवनिर्मित प्रकाशस्रोतांच्या माध्यमातून आपण जीवन आणखी समृद्ध करण्याचा प्रयत्न करत आहोतच; पण मानवनिर्मित प्रकाशस्रोतांच्या वापराचे जसे फायदे आहेत (उदा.'क्ष'-किरण उपचार पद्धती) तसेच अनावश्यक आणि बेजबाबदार वापरामुळे वातावरणाचे प्रदूषण होऊन त्याचे दुष्परिणामही आपल्याला भोगावे लागतात.

चला तर मग,पृथ्वीचा प्रमुख ऊर्जास्रोत असलेल्या सूर्यापासून मिळणाऱ्या प्रकाश, उष्णता यांसारख्या नैसर्गिक ऊर्जांचा सौरचूल, सौरबंब, सौर दिवे यांसारख्या उपकरणांच्या साहाय्याने जास्तीत जास्त वापर दैनंदिन जीवनात करूया. आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करू या.

**– प्रीतेश लोले**
pritesh.lole09@gmail.com
**चित्रकार : चित्रांजली**

**हे जरूर करा**

- देशातील सौर ऊर्जा प्रकल्पांची यादी बनवा.
- मानवनिर्मित प्रकाशस्रोतांच्या अयोग्य वापरामुळे होणाऱ्या प्रदूषणाची माहिती घ्या आणि त्यावरील उपाय-योजनांची मित्रांशी, घरातील वडिलधाऱ्यांशी चर्चा करा.

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**ऐका व पाहा – विज्ञानगीत**
**'जो है जैसा वैसा क्यूँ है...'**

ललित



# रवींद्रनाथांच्या कुमार कथा

– स्वाती दाढे

**‘साहित्याचा हेतू माणसाच्या संवेदना बोथट होऊ न देता त्यांना जगायला मदत करणे.’ हा दृष्टिकोन मनात ठेवून गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी साध्या माणसांच्या सोप्या कथा चित्रमय शैलीत लिहिल्या. बंगालमधील निसर्ग, त्याकाळचे समाजजीवन यांचे दर्शन गुरुदेवांच्या कथांमध्ये घडते. खास कुमारांसाठी लिहिलेल्या त्यांच्या काही निवडक कथांचा परिचय प्रस्तुत लेखात वाचूया...**

*डॉक्टर विश्वंभरबाबू पालखीत बसून रोग्याला बघायला निघालेत. सोबत बलदंड नोकर शंभू आणि चार भोई. लांबच लांब माळरान पार करेपर्यंत संध्याकाळ होते. गुरे चारून परतणारा गुराखी डॉक्टरबाबूंना सांगतो, ‘गाव अजून सात-आठ कोस दूर आहे. वाटेत एक स्मशान आहे आणि तिथे डाकूंची भीती.’ ७०-८० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. डॉक्टरबाबू म्हणतात, ‘रोगी पोटदुखीने हैराण आहे, मला जायलाच हवे.’ रस्त्यात पालखीवर बांधलेला औषधांचा बॉक्स दोरी तुटून खाली पडतो. बॉक्स घट्ट बांधून निघतात तोच कड्कड् आवाज करत पालखीचा दांडा तुटतो. रात्रीचे दहा वाजलेले. आता इथेच रात्र घालवावी लागणार. तोच डाकूंची चाहूल लागते. घाबरून चारही भोई पळ काढतात. परंतु शूर, एकनिष्ठ शंभू हातातील लाठी वापरून तीन डाकूंना जखमी करतो, दोघे जण पळून जातात. जखमी डाकूंना पाहून डॉक्टरबाबू शंभूला म्हणतात, ‘औषधांचा बॉक्स आण.’ शंभू विचारतो, ‘कशाला?’ डॉक्टरबाबू म्हणतात, ‘या तिघांची शुश्रूषा करायला हवी.’ डॉक्टरबाबू आणि आज्ञाधारक शंभू त्या तीनही डाकूंच्या जखमांना बँडेज बांधतात. तोपर्यंत सकाळ होते. लपून बसलेले चारही भोई परत येतात आणि डॉक्टरबाबू पालखीत चढून रोग्याला बघायला पुढे निघतात.*

*

हल्ला करणाऱ्यांचीही सेवा-शुश्रूषा करणाऱ्या डॉक्टरची ही कथा लिहिली आहे, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी.

अशा प्रचीतीच्या, साध्या माणसांच्या, सोप्या कथा गुरुदेवांनी लिहिल्या. यात पल्लेदार वाक्ये, मोठमोठे संवाद अजिबात नाहीत. गुरुदेवांची वर्णनशैली चित्रमय आहे. कथा वाचताना ती पात्रं डोळ्यांसमोर उभी राहातात. त्यांच्या सोबत असतो ‘सुजलाम् सुफलाम्’ बंगालचा



निसर्ग, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, तरंगणाऱ्या नौका, जंगल, पाऊस... कथांमध्ये त्याकाळचे समाज जीवन, जमीनदारी, दारिद्र्य इ.चे दर्शन असले, तरी त्यांनी जे लिहिले आहे, ते सगळ्या काळात सुसंगत वाटेल, असे आहे. म्हणून आपल्या मातीतील हे साहित्य वैश्विक, कालजयी ठरले आहे.

'गोल्पगुच्छ' कथासंग्रहाच्या सुरुवातीला रवींद्रनाथ लिहितात, 'इतर काहीही न करता, जर मी छोट्या-छोट्या कथा लिहीत बसलो, तर मी माझ्या मनाला खूप सुखात ठेवेन. माझ्या कथा वाचून पाच वाचक जरी आनंदी झाले, तरी मी कृतकृत्य होईन. गोष्टी लिहिण्यात सुख हे असतं की, मी ज्यांची कथा लिहितो ते सारेजण माझ्या एकाकी मनाचे मित्र होतात. पावसाळी दिवसांत बंद घराचा कोंदटपणा दूर करतात आणि भर उन्हाळ्यात पद्मानदीच्या तीरावरील उज्ज्वल दृश्यात माझ्यासमोर सतत भटकत फिरत असतात.'

रवींद्रनाथांना कथा लिहायला किती आवडत होते, हे यावरून लक्षात येते. त्यांनी छोट्यांसाठी, मोठ्यांसाठी, सर्वांसाठी वेगवेगळ्या विषयांवर हजारो कथा लिहिल्या, नाटकं लिहिली, कविता लिहिल्या. त्यांना स्वत:लाही कथा ऐकायला, वाचायला, जमवायला आवडत. देश-विदेशात भ्रमंती करताना स्थानिक कथा, कहाण्या, गीतं त्यांनी गोळा केली. आपल्या देशातल्या लोककथा जमवून त्यांनी त्या बंगाली भाषेत अनुवादित केल्या- ''कथा ओ काहिनी'' या नावाने. त्यात शीख, राजपूत, मराठी, बौद्ध, वैष्णव इ. लोकजीवनातील कथा आहेत. ह्या पुस्तकात सुरुवातीला रवींद्रनाथांनी भूतकाळाला 'मुनि अतित' असे संबोधून विनंती केली की, 'भूतकाळाच्या पोटात अगणित कथा साठलेल्या असतात, त्या मला सांग.'

या पुस्तकातील एक छोटीशी पण महत्त्वाची कथा, जी शिखांच्या प्रखर स्वाभिमानाची आहे, त्या कथेचे नाव आहे 'अद्भुत दान'

*यवनांनी बंदी केले*
*शूर शिखांचे दल.*
*रक्तवर्णी होऊन गेले*
*तेथील धरणीतल ।*
*नबाब म्हणे तरुसिंहासी -*
*''माफ करीन तुला..''*
*तरुसिंह पुसे -''तर मग का*
*करिसी अवहेलना?''*
*''महावीर तू -'' नबाब बोले,*
*''कसा घेऊ प्रतिशोध?''*
*''वेणी तुझी कापून कर*
*मजवरी अनुरोध ।''*
*तरुसिंह म्हणे, ''करुणा*
*तुझी... हृदया आले भरते!*
*मागणीपेक्षा अधिक देतो,*
*मस्तक हे वेणीसंगे!''*

※

जरूर पाहा... www.iucaa.ernet.in (ॲस्ट्रोनॉमी आणि ॲस्ट्रोफिजिक्सची माहिती)
वार्षिक देणगीदार - • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे • डॉ. कृष्णकांत मानकर, मोशी, पुणे

मित्रांनो, शिखांसाठी वेणीच्छेद म्हणजे डोक्यावरील केस कापणे हे धर्मत्यागापेक्षा जास्त अपमानास्पद असते. म्हणून हा शूर, स्वाभिमानी तरुसिंह वेणीच्छेद करून जीव वाचवण्यापेक्षा स्वत:चे मस्तक कापून द्यायला तयार होतो!

रवींद्रनाथांनी अनेक निर्जीव वस्तूंना मन दिले आणि त्यांच्या आत्मकथा लिहिल्या. अशीच एका राजपथाची कथा. हा राजपथ सांगतो –

*''मी राजपथ. जशी देवी अहिल्या मुनींच्या शापाने पाषाण होऊन पडली होती, मीही कुणाच्यातरी शापाने अवाढव्य अजगराप्रमाणे चिरनिद्रित, अरण्य-पर्वत-वृक्षतरूंमधून, प्रचंड प्रस्तराच्या छाताडावर कित्येक युगांपासून जडशयनी पडलो आहे. मी एकाच स्थितीत जखडलो आहे, तरीही मला एक क्षणभरही आराम नाही,''* असं सांगत तो आपल्याला त्याच्या कहाणीत गुंतवून ठेवतो.

चालण्याच्या ढंगावरून तो कसा एकेकाला ओळखतो हे तो सांगतो, ''ही पावलं छोट्या मुलाची, ही पैंजण घातलेली मुलगी, हा झपाझप घाईत चाललेला तरुण, हा जड पावलांनी चाललेला कुणी थकलेला वाटसरू, या हितगूज करत चाललेल्या बायका...''

असे कितीतरी लोक येतात, जातात. कुणाबद्दलही आनंद किंवा दु:ख करायला, गुंतून राहायला त्याला वेळ नाही. तो प्रत्येकाला मार्ग दाखवतो; पण स्वत: मात्र तिथेच आहे. एखाद्या निश्चल अजगरासारखा... एक राजपथ!

*

हे वाचून आपल्या डोळ्यांसमोर तो राजपथ मूर्तिमंत उभा राहतो.

'कात्यायिनी' या प्रेमळ जमीनदारीण स्त्रीची कथाही अशीच!

*दरिद्री उद्धव मजुरी करून कुटुंबाची गुजराण करत असतो. त्याच्या मुलीचे लग्न ठरते. लग्नासाठी नातेवाईक, वऱ्हाडी मंडळी येणार म्हणून त्यांच्या जेवणासाठी जवळच्या तळ्यातून एक मोठा रुई मासा आणायला उद्धव जातो. तळ्याच्या मालकाचे नोकर त्याला बघतात आणि पकडून मालक दुर्लभबाबूकडे नेतात. कठोर दुर्लभबाबू त्याला दहा रुपये दंड ठोठावतात. दंड भरेपर्यंत सोडू नका, म्हणून नोकरांना सांगतात. उद्धव खूप गयावया करतो, ''मुलीचे लग्न होऊ दे, मग मला शिक्षा करा,'' असे विनवतो.*

*दुर्लभबाबू ऐकत नाहीत. त्यांची आत्या, कात्यायिनी ठाकुरण, त्यांना समजावतात; पण उपयोग होत नाही. तेव्हा त्या स्वत: दंड भरतात आणि उद्धवला सोडवतात. दुसऱ्या दिवशी गोधुली मुहूर्तावर उद्धवच्या मुलीचा विवाह असतो. त्यावेळी कात्यायिनीबाई मिठाई, वधूची साडी, शंभर रुपये घेऊन लग्नघरी जाऊन वधूला प्रेमाने आहेर आणि आशीर्वाद देऊन त्या जातात.*

*

गरीब उद्धव आणि त्याचे कुटुंबीय यांच्याप्रमाणे आपणही सुखावून जातो कथा संपल्यावर.



लाटांवरती लाटा आणि किती लाटा। मनामधल्या समुद्राच्या, कितीतरी वाटा।।

वार्षिक देणगीदार – • श्री. अनंत बेडेकर, वाई
• श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे

गुरुदेवांनी गमतीशीर कथाही लिहिल्यात. ‘इच्छापूरण’ ही एक फँटसी कथा.

*सुबलबाबूंचा मुलगा सुशील, खूप मस्तीखोर. खेळ, मजा यांचीच त्याला आवड. एक दिवस नेहमीप्रमाणे वडिलांशी त्याची शाब्दिक झटापट होते.*

*“पोटात दुखते आहे”, असे सांगून तो शाळेत जायचे टाळत असतो; कारण शेजारच्या वाडीत करमणुकीचा कार्यक्रम असतो. सुबलबाबू ते ओळखून त्याला घरातच राहायची शिक्षा देतात.*

*त्यावेळी सुशीलच्या मनात येतं, ‘मी जर बाबांएवढा असतो तर किती बरं झालं असतं. मनात येईल तसं करता आलं असतं, पाहिजे तिकडे जाता आलं असतं इ.इ.’ आणि सुबलबाबूंच्याही मनात येतं, ‘माझं बालपण मला परत मिळालं, तर किती बरं होईल. तेव्हा उनाडपणा केला, आता खूप अभ्यास करीन, इ.इ.’*

*त्याचवेळी इच्छापूर्तीदेवी तिथून जात असते. ती दोघांचे मनोगत ऐकते आणि त्यांना म्हणते, ‘उद्या सकाळी तुमची इच्छा पूर्ण होईल.’ आणि मग काय, सुबलबाबू (मनाने) छोटा मुलगा होतात आणि सुशीलचं (बौद्धिक) वय वडिलांएवढं होतं. दोघांच्याही आयुष्यात भरपूर गमतीजमती, फजितीचे प्रसंग येतात. शेवटी दोघेही वैतागून देवीकडे प्रार्थना करतात, ‘आम्हाला पहिल्यासारखं कर.’ देवी ‘तथास्तु’ म्हणते. दोघांची अदलाबदल होते आणि पुन्हा पहिले पाढे पंचावन्न!*

✻

अशा अनेक कथा मनोरंजनाबरोबर नकळत योग्य ती शिकवण देतात. शिक्षण म्हणजे मुलांसाठी हसतखेळत, मजा घेत करण्याचा प्रयोग असावा, या हेतूने गुरुदेवांनी डिसेंबर, १९०१ मध्ये शांतिनिकेतनला शाळा सुरू केली. ज्या वातावरणात मुलांचं पोषण होतं, ज्या भाषेत लोकांचे व्यवहार चालतात, गाणी म्हटली जातात, गोष्टी सांगितल्या जातात, त्या वातावरणात, त्या भाषेत शिक्षण असावे असा त्यांचा आग्रह होता. बालवयातील आनंदाचे प्रसंग आणि पाठ्यपुस्तक यांची सांगड घालून त्यांनी ‘सहजपाठ’ लिहिले. यात मुलांना धडे देणे, उपदेश करणे वगैरे प्रकार अजिबात नाहीत. यातील पाठ म्हणजे छोट्या मुलांच्या डोळ्यांनी रोज पाहिलेली अवतीभवतीची सुंदर ‘शब्दचित्रे’च आहेत. मुलांच्या डोळ्यांतील कुतूहल टिकून राहील याची काळजी या पाठांमध्ये घेतली आहे.

साहित्याचा, शिक्षणाचा, संस्कृतीचा, कलांचा मूळ हेतू हा की, निसर्गाने माणसांना दिलेल्या संवेदना बोथट होऊ न देता, त्याला जगायला मदत करणे. हे लक्षात ठेवून गुरुदेवांनी रसाळ कथा लिहिल्या. त्या वाचताना आपलं संवेदनशील मन अपूर्व आनंदाने आणि अनुभूतीने उचंबळून येतं, हे नक्की!

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**– स्वाती दाढे**
१०, ‘प्रतिभा’, वेलणकरनगर,
पर्वती दर्शन, पुणे 411009
**चित्रकार : चित्रांजली**

**अवश्य वाचा : कथासंग्रह – ‘पोरवय’**
**ले. रवींद्रनाथ टागोर**
**अनुवाद – पु. ल. देशपांडे**

**वाचा**
**चित्रपट रसास्वाद**
**‘पावसाचा निबंध’**
**लेखिका – शैलजा देशमुख**

कविता




आम्ही तुमचे घड्याळ मुळी बघत नाही
तुमची सोय बघून पाऊस पाडत नाही
गच्च भरल्या आमच्या सभेत घुसतो वारा
तेव्हा पखालीतून झरती पाऊस-धारा
शाळा, ऑफिस, कामासाठी पळती पाय
हे तर तुमचे प्रश्न, त्यांचे मला काय?
जलचक्रासंगे आम्ही धरतो ताल
'जीवन'दायी तेव्हाच येतो पाऊस-काळ
कुणी म्हणे, शेतामध्येच जाऊन पड
कुणी म्हणे, विहिरींमध्ये पडो झड
कुणी म्हणे, नदीत वहा, रानात खेळ
मुरेल कशी त्यांच्या मनात पाऊस-ओल?
तुम्हां काय माहीत कोसळण्यातली मजा?
दान करत स्वत:मधून होणे वजा..!
भिजून, मुरून, गाडून नंतर रुजून येणे
कळेल, तेव्हाच गाऊ शकाल पाऊस-गाणे
नद्यांमधून समुद्रात, लाटा..लाटा मंथन
सूर्य-चंद्र पिंजून घेती माझे सारे 'जीवन'
वाफेसोबत आभाळीचा तरंग-भवरा होणे
वाऱ्यासह धरेवरती पुन्हा पाऊस-लेणे
आम्ही खूप जुने, नवे-नवे होऊन येतो
युगे-युगे फिरून फिरून चिंब-चिंब न्हातो
भुईवरल्या तुमच्या छोट्या-छोट्या व्यथा!
विराटाच्या मंचावरती आमच्या पाऊस-कथा

**-आश्लेषा महाजन**
मंजिरी, २३० चित्ररेखा सोसायटी, सहकारनगर १, पुणे - ९


**चित्रकार : राहुल देशपांडे**

**ऐका**
**अंध संगणक तज्ज्ञ**
**कृष्णकांत माने**
**यांची प्रेरणादायी मुलाखत**

नव्या युगाच्या नव्या उषेची किरणप्रभा जागवू
पिढ्यापिढ्यांची दृढ चाकोरी ओलांडूनी जाऊ
**टेक्नोफोरच्या सौजन्याने**

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

# सोडवा हे शब्दकोडे




## ‘अ’ची अंगत-पंगत

सोबतच्या आकृतीत ‘अ’ या अक्षराने सुरू होणारे व ‘न’ या अक्षराने संपणारे शब्द आहेत. खालील अर्थाच्या साहाय्याने मधील दोन अक्षरे भरून ते शब्द पूर्ण करा.

अर्थ : १) अभ्यास करणे, शिकणे २) धैर्य ३) शिकविणे
४) प्राचीन नसलेले ५) स्थापन करणे ६) न शोभणारे
७) भान ८) निष्कर्ष काढणे

(उत्तरे अन्यत्र)

---

## हास्यलहरी...

घरमालक भाडेकरूकडे आला आणि म्हणाला,
‘‘गेले खूप महिने तुम्ही माझं भाडं थकवलं आहे. आज कुठल्याही परिस्थितीत मला भाडं हवं.’’
भाडेकरूने गयावया केली आणि चार दिवसांनी थकलेले भाडे देण्याचे कबूल केले. चार दिवसांनी मालक आले. भाडेकरूने त्यांच्या हातावर पन्नास रुपये टेकवले.
‘‘हे काय? एवढेच पैसे. अहो, माझं भाडं किती आणि तुम्ही पैसे किती देताय?’’
‘‘माझ्याकडे खरंच नाहीत,’’भाडेकरू गयावया करत म्हणाला.
‘‘मग एवढे तरी कुठून आले?’’
‘‘अहो, खोलीचं मागचं दार मला विकता आलं नसतं तर एवढेही मिळाले नसते.’’



अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

# रांगोळी रेखाटनामधील मूलभूत चिन्हे


कलाकृती



रांगोळी काढण्याकरता कुंडा किंवा मगामध्ये रांगोळी घेऊन दोन्ही पायांच्यामध्ये दोन इंचाचे अंतर ठेवा. डाव्या हातात कुंडा घेऊन, शरीराला थोडे वाकवून, उजव्या हाताच्या बोटांमध्ये रांगोळी घ्या. हात ताठ ठेवून, उजव्या हाताच्या बोटांचे जमिनीपासून एक बोटाचे अंतर ठेवून, बिंदू काढण्यास सुरुवात करा.

१ 

२ 

३ 

४ 

५ 

६ 

१) **बिंदू** – हे चिन्ह संस्कारभारतीच्या रांगोळीमधील प्राथमिक चिन्ह आहे. हाताची पाचही बोटे एकत्रित करून, हे चिन्ह काढावं लागतं. रांगोळी काढताना तुमच्या हातावर तुमचं नियंत्रण असणं फार गरजेचं आहे. बिंदू काढताना बोटांच्या रिकाम्या जागेतून अधिक रांगोळी बाहेर पडणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल.

२) **अर्धवर्तुळ** – शक्यतो तुम्ही हातात घेतलेल्या रांगोळीमध्येच इंग्रजी 'C' अकाराचे हे अर्धवर्तुळ काढावयाचे आहे. अर्धवर्तुळ काढताना हात न उचलता अर्धवर्तुळ पूर्ण केलं, तर त्यात एकसारखेपणा दिसेल.

३) **पूर्ण वर्तुळ** – पूर्ण वर्तुळ काढण्यासाठी अर्धवर्तुळ दोनदा काढा.

४) **रेषा** – आकृती ४ मध्ये दाखवल्याप्रमाणे विविध रेषांचा सराव करा.

५) **गोपद्म** – सुरुवातीला अर्धवर्तुळ काढा. त्यानंतर अर्धवर्तुळाच्या दोन्ही टोकांवर आत तोंड केलेले लहान-लहान अर्धवर्तुळ काढा. तुमचे गोपद्म पूर्ण झाले.

६) **केंद्रवर्धिनी** – आकृती ६ मधील पूर्ण वर्तुळ काढताना तुमचा हात चकली करताना फिरवतो, त्याप्रमाणे बाहेर फिरवत आणायचा आहे.

ही सहा चिन्हे प्राथमिक आहेत. फक्त वरील सहा चिन्हांचा वापर करूनही तुम्ही उत्तमप्रकारे रांगोळी काढू शकता. सुरुवातीला तुम्ही पाहिजे त्या रंगाची पार्श्वभूमी चाळणीने तयार करून घ्या. त्यावर या चिन्हांच्या साहाय्याने रांगोळी काढा आणि दिवाळीत घराची शोभा वाढवा.

**– विश्वास सोनावणे**
किसनवीर चौक, साठे मंगल कार्यालयाजवळ, वाई 412803

अनुक्रमणिकेवर जाण्यासाठी येथे क्लिक करा.





पाहा काही कलात्मक रांगोळ्या

वरील फोटोंत सुचवलेल्या *डिझाईनप्रमाणे* रांगोळीचा सराव करून पाहा.

# के. के. ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजकडून

सर्व हिंदू बांधवांना

## दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा

**अनन्याश्चिंतयंतोमाम् येजनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानाम् योगक्षेम वहाम्यहम्।।**

**फिनिक्स स्पेशालिटी केमिकल्स**
बल्क ट्रेडिंग ऑफ बेसिक केमिकल्स अँड प्रॉडक्शन

**श्री व्यंकटेश ॲसिड व केमिकल्स**
बल्क ट्रेडिंग व सर्व प्रकारचे ॲसिड उपलब्ध

**समर्थ केमिकल्स व प्रोजेक्ट कन्सल्टंट**
प्रॉडक्ट अँड प्रोजेक्ट कन्सल्टन्सी
इंडस्ट्रियल केमिकल्स
संपर्क : ७४९९००२२१६०

**गणेश ॲक्वा पॅक**
हॉस्पिटल्स, हॉटेल्स आणि घरगुती वापराकरिता
सर्व प्रकारचे क्लिनिंग केमिकल्स
संपर्क : ८००७०८७८२४





"बाळा, तुझ्या अंगातला गणवेश इतर मुलांपेक्षा वेगळा आहे. तुला 'माणुसकी'चा गणवेश मिळालाय... माणुसकी पेरायची असते. आणि माणुसकीची पेरणी करून ती जगवायची देखील असते...!"

काय बरं अर्थ असेल आजीच्या या बोलण्याचा? जाणून घेऊ या सोबतच्या कथेतून!

# माणुसकीचा गणवेश

– डॉ. रामचंद्र देखणे



अनेक वर्षं मी पुण्यात राहात असलो, तरी माझं बालपण आठवलं की, माझं गाव माझ्या डोळ्यांसमोर उभं राहातं. माझं गावातलं माळवदी घर, बहरलेली फुलझाडं असलेलं मागचं परसदार, पुढचं अंगण, बाजूचा जनावरांचा गोठा, गोठ्यामध्ये गुरांसाठी रचून ठेवलेली कडब्याची वळही! देवपूजेत रमलेली आजी, तर सतत कष्ट करणारे आई-वडील! सर्वांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता आणि अत्यंत गरिबीतही आनंदाची वाट गवसलेलं माझं घर आठवलं की, मन भरून येतं.

जून महिना लागला की, शाळेची लगबग सुरू व्हायची. मागच्या वर्षीच्या मुलाची जुनी पुस्तके आणि जुन्याच वह्यांतील न वापरलेल्या कोऱ्या कागदांच्या वह्या वडील शिवून देत. यावर्षी मी सातवीतून आठवीत गेलो होतो. आमच्या गावी सातवीपर्यंतच शाळा होती. आठवीसाठी १४-१५ किमी. अंतरावरील तालुक्याच्या गावी *हायस्कूलच्या* शाळेत नाव घातलं. तालुक्याच्या गावी खोली घेऊन मी आणि माझी आजी, असं आम्ही दोघांनी राहायचं ठरलं. ही *हायस्कूलची* शाळा खूपच भव्य होती. ती इमारत पाहून, मी पहिल्या दिवशी

भांबावूनच गेलो. आमच्या गावच्या प्राथमिक शाळेत, विद्यार्थ्यांनी सारवलेल्या जमिनीवर आम्ही बसत असू. इथे *हायस्कूलच्या* शाळेत प्रत्येकाला बसायला बाके होती. गावी शाळेत आम्ही रमतगमत जायचो. इथे तसं काही नव्हतं. सगळं काही शिस्तीत आणि वेळेत! थोडक्यात मी 'गुरुजीं'च्या शाळेतून 'सरां'च्या *हायस्कूलमध्ये* आलो होतो.

माझ्याकडे शाळेचा गणवेश नव्हता. वर्गशिक्षकांनी मला 'गणवेशाशिवाय यायचं नाही,' असं बजावलं. आणि मी माझ्या घरची पार्श्वभूमी सांगितल्यावर मला गणवेशासाठी दहा दिवसांची मुदत दिली.

'तेवढ्यात गावी जाऊ आणि गणवेशाची तरतूद करू,' असं ठरलं. वडिलांकडे गणवेशखरेदीसाठी खरोखरीच पैसे नव्हते. त्यांच्याकडचे पैसे माझ्या शाळेचं प्रवेश शुल्क, तालुक्याच्या खोलीचं भाडं आणि तिथं रोज जेवायला लागणारं धान्य, सामुग्री यातच संपले होते. आता गणवेशासाठी पैसे कुठून येणार? हा मोठ्ठा प्रश्न उभा राहिला. मी आणि आजी परत गावी आलो. गणवेशाच्या पैशांची लगेचच व्यवस्था करता येत नाही, म्हणून वडील निरुत्तर झाले. मी मात्र नाराज होऊन काहीसा रडवेला झालो.

माझी आजी खूप धीराची होती. तिनं बराच वेळ विचार केला आणि तिला एक मार्ग सापडला. ती वडिलांना म्हणाली,

''बापू, आपण लमाणांना जर थोडाफार कडबा विकला तर...''

आजीची ही युक्ती सगळ्यांनाच पटली.

माझ्या लहानपणी पावसाळा सुरू झाल्याबरोबर म्हणजे जूनच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यापर्यंत गावात रोज लमाणांचे तांडे यायचे. अनेक लमाण मंडळी आपल्याजवळील बैल-गुरे घेऊन वर्षभर कष्ट करण्यासाठी आणि मोलमजुरी करण्यासाठी लांबलांब दूरदेशी जात. आणि पावसाळा सुरू व्हायच्या तोंडाला आपली सारी गुरे घेऊन पुन्हा मराठवाडा, विदर्भ या भागातील आपल्या गावाकडे शेतीसाठी परतत. हा समाज भटका; पण खूप कष्टकरी. रात्रंदिवस ऊन, वारा, पावसात भटकणारा! गाईगुरांवर त्यांचं खूप प्रेम! पोटच्या पोरासारखं जनावरांना सांभाळणारा!! आमच्या गावाच्या वेशीबाहेर 'मुऱ्हाळ' म्हणजे खुरटं गवत असलेलं एक मोठं पटांगण होतं. त्यावर त्यांचा मुक्काम असायचा. ते भराभर तंबू ठोकायचे. त्यांच्या बायका तिथंच तीन दगडांच्या चुली मांडून स्वयंपाकाला लागायच्या. तंबूच्या बाजूलाच लोखंडी खुंट्या ठोकून, दाव्याने गुरे बांधली जायची. रात्री मुक्काम करून पहाटेच हा तांडा केव्हा निघून जायचा, हे कळायचंही नाही. सामानाची बांधाबांधी झाली की, मग गावात जाऊन कुठं त्यांच्या जनावरांना कडबा विकत मिळतो का, म्हणून ते शोध घ्यायचे. त्याचवेळी ज्याच्या घरी विकायला कडबा आहे, अशी माणसं रोख पैसे घेऊन त्यांना कडबा विकायची.

आजी आणि मी गावी आलो तेव्हा दररोज लमाण येत होते. 'लमाणांना कडबा विकू आणि त्याच्या पैशात गणवेश आणि उरलेली पुस्तके घेऊ,' असं ठरलं. 'लमाण आले, लमाण आले' अशी

अधिक माहिती मिळवा : वैशिष्ट्यपूर्ण धरणे - भवानीसागर धरण - तामिळनाडू.



वार्षिक देणगीदार - • श्री. किशोर पंडित, चेंबूर, मुंबई • एक हितचिंतक, पुणे • श्रीमती लीला आचवल, नाशिक

कुणीतरी आवई दिली आणि मी मुऱ्हाळाकडे धूम ठोकली. तेवढ्यात गावातल्या काही मोठ्या माणसांनी कडब्याच्या व्यवहाराबद्दल लमाणांशी बोलणी केली. मी लहान मुलगा असल्याने कडबा घेण्यासाठी माझ्याशी कोणीच बोलेना. दहा-पंधरा मिनिटांत गावातील कुणाकुणाकडून तरी कडबा घेऊन लमाण मुऱ्हाळात आले. त्यामुळे माझ्या कडब्याला गिऱ्हाईक मिळेना.

आता गणवेश कसा घ्यायचा? पुस्तके कशी घ्यायची? माझ्या डोळ्यासमोर शाळा दिसू लागली, सर दिसू लागले, आजी दिसू लागली आणि समोर कडबा खाणारी लमाणांची गुरेढोरे! मला रडूच फुटलं. एका लमाणाच्या तंबूपाशी मी मोठमोठ्यांदा रडू लागलो.

''का रडतोस रे बाळा?'' म्हणून त्या लमाणानं मला विचारलं आणि मी खरं कारण सांगून टाकलं.

''किती पैसं तुझ्या बुकाला अन् साळंला लागणार हायेत!''

''दहा रुपये.''

त्याला काय वाटलं कुणास ठाऊक; पण माझी कडबा विकण्यामागची भूमिका त्याच्या लक्षात आली.

''ए पोरा, रडू नगं... चल तुझ्या घरी... दोन-चार लमाणांना घेऊन येतो...''

आणि दोन-चार लमाण घेऊन, तो कडबा घ्यायला माझ्याबरोबर माझ्या घरी आला. दहा रुपयाला दहा पाचुंदे कडबा दिला आणि प्रत्येक पाचुंद्यामागं एक-एक पेंढी माझ्या वडिलांनी त्यांच्या जनावरांसाठी फुकट दिली.

मी आनंदाने नाचतनाचत आजीला सांगायला लागलो. ''आपलं काम झालं. आपल्याला पैसे मिळाले.... आता गणवेश... पुस्तकं...''

खरंतर, गरज त्या लमाणाला नव्हतीच. गरज आम्हाला होती! त्याने त्याला लागेल एवढा पुरेसा कडबा घेतला होता. माझ्यासाठी त्याने पुन्हा कडबा विकत घेतला होता. हा अतिरिक्त कडबा पुढच्या प्रवासाला कसा न्यायचा, हा त्याच्यापुढे प्रश्न होता. त्याने कडब्याचे लहान लहान भारे करून बैलाच्या पाठीवर टाकून पुढच्या गावचा रस्ता धरला होता...

माझा गणवेश झाला. पुस्तकं मिळाली. एक वर्ष कसं निघून गेलं, हे कळलंही नाही. पुढल्या वर्षी ह्याच कालावधीत पुन्हा लमाणांचा तांडा गावात





आला. यावर्षी दुष्काळ पडला होता. दुसरी पिकं हातातून गेली होती. दुष्काळामुळे ज्वारीची पिकं आली नव्हती. एक लमाण कडबा मागण्यासाठी दारात उभा होता. आजीने त्याच्याकडे पाहिलं. त्यानं मागच्या वर्षीची ओळख सांगितली. आजी म्हणाली,

''बाबा, माझ्याकडे विकायला कडबा नाही; पण माझ्याकडून तुझ्या गुरा-ढोरांसाठी पाचुंदा दोन पाचुंदे तसेच घेऊन जा.'' तो कृतज्ञतेच्या नजरेने पाहू लागला आणि कडब्याचे पैसे देऊ लागला.

''पैसे कसले देतोस? पावले तुझे पैसे मागल्या वर्षीच! माझ्या नातवाची बुकं झाली, गणवेश भागला. आता माझ्याकडून तुझ्या गुरांसाठी कडबा घेऊन जा. आज माझ्या वतीने त्यांच्या मुखात हा घास भरव. त्यांना तृप्त कर...''

त्याच्याही डोळ्यातून दोन थेंब ठिबकले...

वाटचा वाटसरू; पण माणुसकीचं केवढं नातं ठेवून जातो!

''बाबारे, माणुसकी पेरायची असते आणि माणुसकीची पेरणी करून ती जगवायची देखील असते...,'' आजी म्हणाली.

तो कडबा घेऊन त्याच्या तांड्यात निघून गेला. त्यानंतर तो लमाण मला कधीच भेटला नाही. जर भेटला असता, तर माझी संपूर्ण वळही त्याला तशीच देऊन टाकली असती. मागच्या वर्षीची आठवण पुन्हा ताजी होऊन उभी राहात होती...

मी नवा गणवेश घालून जेव्हा शाळेत जायला निघालो, तेव्हा आजी म्हणाली, ''बघ तुझ्या अंगातला गणवेश इतर मुलांपेक्षा वेगळा आहे. तो नुसता कपड्याचा गणवेश नाही तर माणुसकीचा गणवेश तुला मिळालाय.''

नवा गणवेश घातल्याने आज मी खूप आनंदात होतो आणि वर्गात मराठीचे सरही कवी वि. म. कुलकर्णींची कविता शिकवत होते,

*'चालला चालला लमाणांचा तांडा*
*एका गावाहूनि दुज्या गावाला...'*

**– डॉ. रामचंद्र देखणे**
सी ३-४ डी. एस. के. चिंतामणी,
५१३ शनिवार पेठ, पुणे 411030
**चित्रकार : राहुल देशपांडे**

**वाचा : ऐतिहासिक कथा**
**मुघल शहजादा**
**लेखक – निनाद बेडेकर**

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

# दिशा बदलणारा बाण

**साहित्य :** काचेचा प्लेन (कोणतीही डिझाईन नसलेला) पेला, पाणी, कागद, पेन/पेन्सील इ.

**कृती :**
- एका कागदावर उजवी किंवा डावी यापैकी एकच दिशा दर्शविणारे २ बाण योग्य अंतर ठेवून एका खाली एक काढा.
- तो कागद पेल्याच्या मागील बाजूस (सुमारे २-३ इंच अंतरावर) अशाप्रकारे धरा की, पेल्यासमोरून पाहिल्यास दोन्ही बाण व्यवस्थित दिसतील. आता बाणांचे निरीक्षण करा.
- पेला पाण्याने अर्धा भरा. (पेल्यामधील पाण्याची पातळी ही कागदावर काढलेल्या खालील बाणापेक्षा थोडी जास्त असली पाहिजे.) पेल्यासमोरून पुन्हा बाणांच्या दिशांचे निरीक्षण करा.



रिकाम्या पेल्यामध्ये दिसणाऱ्या बाणाची दिशा

पेल्यामधील पाणी पातळीत दिसणाऱ्या बाणाची दिशा

पाहा
दाब या तत्त्वावर
आधारित विज्ञान प्रयोग

**निरीक्षण :**
१. रिकाम्या पेल्यासमोरून बाणांचे निरीक्षण केल्यास दोन्ही बाण एकच दिशा दर्शवितात.
२. अर्ध्या भरलेल्या पेल्यासमोरून बाणांचे निरीक्षण केल्यास पाण्याच्या पातळीमध्ये सामावणाऱ्या खालील बाणाची दिशा बदललेली दिसेल. वरील बाणाच्या दिशेच्या अगदी विरुद्ध दिशा! असे का बरं होत असेल?

**विश्लेषण :**
- रिकामा पेल्यासमोरून पाहिल्यास, काचेचा पेला एक पारदर्शक पृष्ठभागासारखे काम करतो. त्यामुळे पेल्याच्या मागील बाजूस असलेल्या गोष्टी आहे तशाच दिसतात.
- पण जेव्हा काचेच्या पेल्यामध्ये पाणी भरले जाते, तेव्हा पेल्याचा वक्र भाग आणि पाणी यामुळे तात्पुरत्या स्वरूपात बहिर्वक्र भिंग तयार होते. 'प्रकाशाचे अपवर्तन' (प्रकाश एका पारदर्शक पदार्थातून दुसऱ्या पारदर्शक पदार्थात जाताना व तिथून परत हवेत येताना प्रकाशकिरण आपली दिशा बदलतात. या प्रवृत्तीला 'प्रकाशाचे अपवर्तन' म्हटले जाते.) या गुणधर्मामुळे पेल्यामधील पाण्यामुळे दिसणाऱ्या बाणाची दिशा बदललेली तसेच त्याची लांबी वाढलेली दिसते.

**विचार करा :** पेल्यामध्ये पाण्याऐवजी खाद्यतेलाचा वापर केल्यास काय फरक दिसेल? जास्त किंवा कमी अपवर्तनांक असलेल्या पेल्याची काच, वापरलेला द्रवपदार्थ इत्यादीसारख्या गोष्टी/वस्तू प्रयोगासाठी वापरल्यास निरीक्षणांमध्ये काय फरक पडेल?

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

– **प्रीतेश लोले,** pritesh.lole09@gmail.com




अधिक माहिती मिळवा : वैशिष्ट्यपूर्ण धरणे - तुंगभद्रा धरण - कर्नाटक.

बाचनाच्या आनंदाने उजळे आपुले जीवन, 'छात्र प्रबोधन' सततच देई उपयुक्त विचारधन!

मित्रांनो, तुमच्या मनात 'मुला-मुलींची मैत्री' याविषयी खूप संभ्रम असतात ना? या लेखात तुमच्याच वयाच्या मुलमुलींची मतं जाणून घेऊन, डॉ. आशुतोष जावडेकर तुमच्याशी या नाजूक विषयावर हितगूज करतायत!
'मैत्री नावाच्या सुंदर गोष्टीवर 'विश्वास' ठेवायचा आणि मैत्रीत सहज पडायचं,' हा विचारच किती आपलासा करण्यासारखा आहे, हा अनुभव तुम्हाला प्रस्तुत लेख वाचताना येईल...

# मैत्रीत पडा

– डॉ. आशुतोष जावडेकर

ललित

पौगंडावस्थेमध्ये – ज्याला आजकाल *टीनेजर* हा नवीन मराठी प्रतिशब्द आहे – सगळं जग म्हटलं तर मोठ्ठं, सोप्पं, बेभान करणारं असतं. आणि म्हटलं तर अनेक शंका पोटात घेतलेलं छोटं, बावरलेलं, आक्रसलेलं असतं. आणि मग त्या शंकांमध्ये, त्या आक्रसण्यामध्ये साथ-सोबत करणारे मित्र आणि मैत्रिणी घरच्यांहूनही जवळचे, जिवाभावाचे कधी होऊन जातात, याचा पत्ता त्या मुलांना आणि त्यांच्या पालकांनाही लागत नाही.

मैत्रीचं रसायन काही वेगळंच असतं. त्याचा आदी आणि अंत सहज दाखवता येत नाही. हे सगळ्याच वयातल्या मैत्रीबाबत खरं आहे; पण *टीनेजर* काळातल्या दोस्तीबाबत तर फार अधिक खरं आहे.

एकाएकी जो मुलगा दिवसरात्र फुटबॉल खेळत असतो तो '*इन्स्टा*'वर वर्गातल्या मुलीशी चॅट करू



मैत्रीच्या सुंदर क्षणांना, आयुष्यभर जपावं। मैत्री फुलवण्यासाठी, थोडंफार आपणही खपावं।।

वार्षिक देणगीदार – • डॉ. वर्षा बखले, चेंबूर, मुंबई • श्री. अनिल रिसबूड, पुणे • श्री. रवींद्र बांडे, शिवापूर, पुणे

लागतो. जी मुलगी बावरी, अबोल म्हणून अख्खा वर्ग ओळखायचा, ती अचानक पंख फुटल्यासारखी, बिनधास्त होते आणि पोरांच्या ग्रुपमध्ये हुल्लडबाजी करण्यात मज्जा घेऊ लागते.

बदलाच्या वेगाचा तलास न लागू देणारं वय आणि झिरमिरत्या पावसासारखी नवी नवी मैत्री! कुठलीच पिढी त्याला चुकली नाही. पण आजच्या तुमच्या टीनेजर पिढीमधल्या मुलांचं वागणं आणि विचार आम्हा मोठ्यांना काही म्हणजे काही कळत नाही. आणि तुम्ही पोरं आमची नुसती भंबेरी बघत, हसत बसता... ☺

आणि म्हणून आज खास मी तुमच्याच वयाच्या मुलांना आणि मुलींना जरा मुद्दाम बोलतं करणार आहे.

मी दहावीतल्या सोहम हडपला विचारतोय की, 'मित्र आणि मैत्रीण यात तो काही फरक करतो का? का सेम वाटतात त्याला दोघं?'

सोहम मला मस्त उत्तर पाठवतो आहे :

*''मित्र आणि मैत्रीण यांच्यात नुसताच फरक नसून बऱ्यापैकी अंतर आहे, असं मला वाटतं. ज्या सहजतेने मी मित्र बनवू शकतो, त्या सहजतेने मी मैत्रीण नाही बनवू शकत; कारण तो प्रत्येकाचा स्वभाव पण असतो. जर माझ्याशी कोणी मुलगी स्वत:हून बोलायला आली, तर मला नक्की आवडेल. मी मित्रांसोबत जितक्या सहजतेने खेळू शकतो, मजा करू शकतो तितक्या सहजतेने मैत्रिणीबरोबर नाही खेळू शकणार. हो; पण हेही तितकंच खरं आहे की, जेव्हा कोणत्याही विषयावर चर्चा अथवा वाद करायचे असतील तेव्हा मी मित्र/मैत्रीण असा फरक नाही करणार.''*

मला सोहमचं उत्तर आवडतंय. अनेक मुलग्यांना असंच वाटत असतं ना? पण सोहम उगाच, नखरे न करता, निर्धास्तपणे ते सांगतो आहे, हे महत्त्वाचं.

मग मी तोच प्रश्न दहावीतल्याच मैथिली परचुरेला विचारतो. ती म्हणते, *''मैत्री, मग ती कुणाचीही असो - मुला-मुलींची, मुली-मुलींची किंवा मुला-मुलांची. पण जरा विचार केल्यावर कळतं की मुलां-मुलींची मैत्री ही काहीशी वेगळीच असते. एक मुलगी असून मी असं नक्की म्हणेन की, जे मी माझ्या मैत्रिणीबरोबर शेअर करू शकते, ते मी मित्रांबरोबर नाही करू शकत. पण मुलगे मित्र असणं हीसुद्धा खूप छान गोष्ट आहे. मी जेव्हा माझ्या मित्रांसोबत असते तेव्हा मलासुद्धा मी त्यांच्यासारखा एक मुलगा असल्यासारखंच वाटतं! आम्ही खूप मजा, मस्ती, दंगा करतो. मुली-मुलींमध्ये जेवढी गॉसिप आणि भांडणे होतात तेवढी मुलांसोबत असताना कधीच होत नाहीत. मित्रांच्याही घरी माझं येणं-जाणं असतं आणि आम्ही एकत्र अभ्यासाचा प्रयत्नही करतो. माझ्या आई-बाबांनी मला हेही सांगितलं आहे की, 'मुला-मुलींच्या मैत्रीमध्ये एक अंतर बाळगणं हे खूप महत्त्वाचं आहे.' शेवटी मी हे नक्की म्हणेन की, एक तरी मुलगा मित्र म्हणून नक्कीच हवा.''*

मैथिलीचं लांबलचक उत्तर ऐकून मी गार होतोच; पण त्याआधी तिला 'शाब्बास' म्हणतो! या वयात जशी मैत्री मुला-मुलींमध्ये हवी असते, तशी तिला गवसली आहे. या वयात आकर्षण वाटणार, क्रश

असणार; पण मैत्री म्हणजे प्रेमाची पहिली पायरी–बियरी नसते. किंवा 'मला चार मैत्रिणी आहेत बरं का,' असं म्हणत मिरवणारा मुलगा हा खरंतर एकटा आणि त्यामुळे असुरक्षित असतो. 'जेव्हा मैत्रीण असते, तेव्हा असतेच; जेव्हा मित्र असतो, तेव्हा तो असतोच! मिरवावा लागत नाही!'

मैथिलीला मी सांगतो आहे की, प्रत्येक मुलालाही एक छान निखळ मैत्रीण हवीच! बेस्ट मित्र जे देतो, त्याहून वेगळं असं काही ती देते, हे नक्की. निखळ मैत्रीमधला एक अडसर म्हणजे त्या मुलीकडे नुसतं 'मुलगी' म्हणून बघणं. मात्र 'माणूस' म्हणून बघितलं की, गोष्टी सोप्या होतात आणि मग जेण्डरचं जे वैशिष्ट्य असतं, तेही नकळत छान मुरत जातं नात्यात... आणि हो, गाजावाजा न करता...

पण मग दहावीतलीच माझी छोटी मैत्रीण रितिका पंडित मला एकीकडे बोलावून व्हॉट्सअपवर म्हणते आहे, *''आशुकाका, माझ्यासाठी मैत्रीची व्याख्या वेगळी आहे. माझ्यासाठी मित्र आणि मैत्रीण हे एकच! मी आज दहावी इयत्तेमध्ये आहे व आजपर्यंत मी मित्र व मैत्रिणी यामध्ये भेद नाही केलेला. माझ्यासाठी जो मित्र मला गरजेच्या वेळेस मदत करेल व ज्याच्यावर मी पूर्ण विश्वास ठेवू शकते, त्याच्याबरोबर मी मैत्री करते.''*

मी रितिकाला अंगठे आणि बदाम आणि अजून चिन्हे पाठवून मस्त दाद देतो. मला पटतंय तिचं. किती सहज, साध्या शब्दांत तिनं एक महत्त्वाचं सूत्र सांगितलं! 'विश्वास!' एखाद्या मित्राबरोबर असताना सुरक्षित वाटत नसेल, तर नाहीये तो चांगला मित्र! मैत्रीत विश्वास ही फार मोलाची गोष्ट आहे. तो असेल तर सगळं आहे. विश्वास जाणवत नसेल तर मैत्री विरून किंवा अगदी मरून जाते.

मग मी सहज पारस आरेकर या आठवीतल्या छोट्या मित्राला विचारतो, ''तुझं रे बाबा काय म्हणणं? आणि मैत्रीण होते तेव्हा तू काय नेमके गुण मुलींमध्ये बघतोस?''

पारस थोडा विचार करतोय. जणू डोक्यात विचारांची खाडाखोड सुरू आहे आणि मग तो मस्त थेट सांगतो, *''मी मित्र-मैत्रिणींमध्ये फरक करतो का?'' तर हो, करतो! मित्रांशी चेष्टामस्करी केलेली त्यांना चालते; पण मुलींची चेष्टा केली की, त्या लगेच टीचरला नाव सांगण्याची धमकी देतात आणि भाव देत*



*नाहीत!... पण जर मला एका मुलीशी मैत्री करावीशी वाटली, तर मी तिच्यातले कोणते गुण बघेन? एक तर तिला मस्करी केलेली चालेल. ज्या मिळून-मिसळून राहतात, चांगलं आणि स्पष्ट बोलतात. ज्या लोकांची काळजी करतात आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे दुसऱ्याला कमी लेखणाऱ्या मुली तर मला अजिबात आवडत नाहीत.''*

पारसचं हे असं थेट बोलणं मला बेहद्द आवडतं.

तितक्यात मागून सोहम पुन्हा सांगतो, *''मला जर मैत्री करायची असेल आणि तेही मुलीबरोबर, तर मी तिच्यात खालील गुण बघेन– ती अजिबात इगो नसलेली असावी. ती 'मुलगी' आहे म्हणून, 'मी कोणी वेगळी आहे, जास्त सुपिरिअर आहे, मला सर्वांची सहानुभूती मिळेल,' अशा विचारांची नसावी. आणि सर्वांत महत्त्वाचं मी तिच्याबरोबर कोणत्याही विषयावर मोकळेपणाने चर्चा करू शकेन, अशी असावी.''*

मुलींनो, नीट ध्यानात घ्या. एकंदर मुलगे तुमच्या रूपापेक्षा, अभ्यासापेक्षा तुमच्या ॲटिट्यूडकडे बघतात मैत्री करायची असेल तर! टीनेजर मुली जरा जास्त भाव खातात आणि मुलगे तरी काय वेगळं करत असतात? आणि मग या *ॲटिट्यूड*पायी दीर्घकाळ मैत्रीच्या शक्यताच पुसल्या जातात. 'या वयात झालेली मैत्री सुंदर टिकते,' यावर विश्वास ठेवा.

माझी आठवीपासूनची चांगली मैत्रीण पुढे कॉलेजच्या वयात आयुष्यातून गायबच झाली. ना तेव्हा 'इन्स्टा' होतं, ना मुळात 'नेट!' मग अचानक मोठेपणी माझी आणि तिची भेट झाली, तेव्हा जणू कुठलीही मधली वर्षे नव्हतीच गेलेली. जणू आम्ही आमच्या शाळेच्या पायरीवर आत्ताच भेटत होतो, अशा सहजतेने बोलत गेलो आणि मग भेटी नित्य होत गेल्या. जुनी मैत्री नव्याने जागी झाली; ताजी झाली.

एवढंच सांगेन, की अशी मैत्री नंतर वय वाढत जातं तेव्हा होत नाही! अनेक लोक जोडले जातात, आपण त्यांना 'मित्र-मैत्रीण'ही म्हणतो; पण खरं तर, ते सगळं वरवरचं असतं. टीनेजर मैत्री मात्र 'खोल' असेल तर 'लांब'ही टिकते. बाईचं संयमी, धीराचं जग 'मैत्रीण' मुलग्याला दाखवते, शिकवते. मित्र मुलीला एक वेगळं पुरुषांचं जरा राकट जग दाखवतो. आणि ते अनुभवयाला कधी सोबतही नेतो. पुढे प्रेम आयुष्यात भेटतं, लग्न होतं, मुलं-बाळं वगैरे. आयुष्यात कुठंही गेलो तरीही, या वयातली मैत्री अक्षय राहते, बळ देते.

माझ्या वयाचे लोक कितीही तुमच्या तक्रारी करत आले, तरी माझा मात्र तुमच्या पिढीवर अधिक विश्वास आहे. आमच्याहून तुम्ही थेट आहात, स्पष्ट आणि खरेही आहात! आणि सोहम, पारस, मैथिली आणि रितिकाच्या गप्पांमधून मला तेच आश्वासन मिळतं आहे.

तेव्हा तो तुमचा प्रख्यात ॲटिट्यूड थोडा कमी करा. 'मैत्री' नावाच्या सुंदर गोष्टीवर विश्वास ठेवा आणि ते सिनेमामध्ये प्रेमात पडतात ना, तसं – 'मैत्रीत पडा!'

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**– आशुतोष जावडेकर**
ashuwriter23@gmail.com

**चित्रकार : राहुल देशपांडे**

ऐका : 'दुर्गमैत्री'
लेखन-वाचनस्वर
प्रा. प्र. के. घाणेकर

# उपलली जीभ अन्..

विज्ञान माहितीपर

– डॉ. कांचनगंगा गंधे

दिवाळीचा खमंग फराळ म्हटलं की, तोंडाला पाणी सुटणारच! घरातल्या सर्वांच्या आवडीचे, जिभेचे चोचले पुरवायचे म्हणजे आईला थोडीसुद्धा उसंत मिळत नाही! नरक चतुर्दशीला एकदा का नैवेद्य दाखवून झाला की, मग सर्वजण 'फराळावर' तुटून पडणार! पदार्थाची चव कळायला 'जीभच' पाहिजे. गोड, कडू, तिखट, तुरट, आंबट, खारट अशा चवी फक्त 'जीभ'च जाणे! आवडत्या पदार्थाची चव बराच काळ रेंगाळते ती जिभेवरच! ओठावर राहिलेल्या घासाच्या शेवटच्या कणाचा स्वाद सुद्धा फक्त जिभेलाच कळतो. फक्त स्नायूंनी बनलेल्या आपल्या जिभेचं टोक क्वचितच नाकाच्या टोकापर्यंत पोहोचतं! आपल्यासारख्या पृष्ठवंशीय प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या जिभा खरोखरच विलक्षणच विस्मयकारक आहेत.

रंग बदलणाऱ्या सरड्याची (शॅमेलिऑन) जीभ ही त्यांचं शरीर आणि शेपूट एकत्र करून जेवढी लांबी होईल तेवढी लांब असते. ती तोंडात गुंडाळलेली असते. जिभेच्या बाहेर येणाऱ्या टोकाला चिकट, गोंद असलेलं 'पॅड' असतं आणि बाकीचा भाग एखाद्या नळीसारखा असून दोन स्नायूंनी बनलेलं 'वेटोळं' असतं. जिभेची हालचाल करण्यासाठीच्या आणि प्रतिक्रिया दर्शवणाऱ्या स्नायूंची वेटोळी 'हॉईड' ह्या हाडाला गुंडाळलेली असतात. त्यांची हालचाल एखाद्या 'अॅकॉर्डियन' सारखी होते. ह्या स्नायूंमुळे आपल्या डोळ्याचं पातं लवतं न लवतं, तोच जीभ तोंडातून बाहेर काढली जाते आणि आतही घेतली जाते. छोटे किडे, मधमाश्या, कोळी, अगदी छोटे पक्षी, उंदरासारखे प्राणी हे सरड्याचं खाद्य! 'भक्ष्य' त्याच्या टप्प्यात आलं की, स्नायूंच्या हालचाली वेगाने होऊन जीभ बाहेर येऊन 'भक्ष्य' इतक्या त्वरेनं पकडलं जातं की, 'भक्ष्याला' थोडीसुद्धा कल्पना येत नाही की, आपण 'भक्ष्यस्थानी' पडलो आहोत ते!



*शॅमेलिऑन* ज्या वेगाने भक्ष्य पकडतो, त्यापेक्षाही कमी वेळात बेडकांच्या जगातल्या जवळजवळ सर्व जाती त्यांचं 'भक्ष्य' जिभेने पकडतात. त्यांची जीभ कणखर असते. ती खालच्या जबड्याच्या

पुढच्या भागाला चिकटलेली असते.

मगरीची (ॲलिगॅटर) जीभ लालभडक आणि एखादा किडा अडकवल्यासारखी दिसते. रंगामुळे लहान-मोठे मासे आणि इतर प्राणी मगरीच्या तोंडाकडे आकर्षिले जातात. त्यामुळे ती फक्त तोंड उघडं ठेवून शांत पाण्यात पडून राहते. 'भक्ष्य' तोंडात आले की, मगर फक्त तोंड बंद करते.

बलाढ्य 'ब्लू व्हेल' माशाची जीभ भीतिदायक असते. तिचं वजनच जवळजवळ दोन टनाइतकं असतं. जिभेचा उपयोग तो खाण्यासाठीच करतो. तोंडामध्ये भरपूर प्रमाणात पाणी ओढून घेतो. त्याच्या जिभेवर 'केरॅटिन'ने बनलेल्या 'बलिन प्लेट्स' असतात. त्यातून पाणी गाळलं जातं आणि पाण्यातून आलेलं 'भक्ष्य' त्यांना अन्न म्हणून मिळतं.

एखादा माणूस जर उद्दामपणे बोलायला लागला तर आपण म्हणतो, 'तुझ्या जिभेला काही हाड आहे की नाही?' खरं तर सर्व प्राण्यांच्या जिभा फक्त स्नायूंनी बनलेल्या असतात; त्यामुळे त्यात हाडं नसतात. त्याला अपवाद आहे तो ॲमेझॉन नदीत सापडणाऱ्या 'ॲरापिआमा गायगॅस' ह्या साध्या पाण्यात वाढणाऱ्या सर्वात मोठ्या माशाचा! त्याच्या जिभेत चक्क हाडं आहेत आणि जिभेवर धारदार दातही असतात. ह्या दोन्हींच्या साहाय्याने तो सावज पकडतो.

तांबडं पोट असलेल्या **'सुतार'पक्ष्याच्या** जिभेतही हाड असते. शिवाय त्यात 'कार्टिलेज' आणि स्नायू असल्यामुळे सर्वांच्या साहाय्याने झाडाच्या खोडात लपलेले किडे जिभेमुळे तो पकडू शकतो.

नळीसारखं तोंड असलेल्या अगदी लहान **'नेक्टर' वटवाघळाच्या** (८.५ सें. मी.) जिभेची लांबी त्याच्या शरीराच्या जवळजवळ दीडपट मोठी असते. जिभेच्या शेवटच्या भागावर केस असतात. त्यामुळे जीभ बाहेर काढून किंवा फुलात तोंड खुपसून जिभेतल्या केसांवर फुलातला मध आणि परागकण ते तोंडात साठवू शकतं.

**'हमिंगबर्ड'ची** जीभ खरोखर विलक्षण आहे. ज्या फुलापाशी हा पक्षी जातो, तिथल्या फुलातला मध खाण्यासाठी स्वत:च्या जिभेच्या टोकाची रचना हा पक्षी थोडा काळ बदलू शकतो. जिभेवरचा भाग थोडा वाकतो, त्यात 'इलॅस्टिक' ऊर्जा निर्माण होते. त्यामुळे थोड्या वेळात खूप त्वरेने तो फुलातला मध काढून घेऊ शकतो.

**गरुडाच्या** चोचीवर पाठीमागे वळलेले आकडीसारखे (हूकसारखे) बारीक अवयव असतात, त्यामुळे भक्ष्य आकडीत अडकतं आणि गरुड नंतर ते पटकन गिळूनही टाकू शकतो.

फ्लेमिंगो पक्ष्याची



अधिक माहिती मिळवा : वैशिष्ट्यपूर्ण धरणे - सरदार सरोवर धरण - गुजरात.

शुभेच्छुक - • श्री. श्रीकांत शिंदे, कोल्हापूर • डॉ. नितिन खेडकर, पुणे
• सौ. सुलभा आशिष फडके, पुणे - कै. रामचंद्र जनार्दन काळे स्मरणार्थ.



जीभ गाळणीचं काम करते. त्यामुळे पाण्यातले छोटे, मोठे किडे, मासे त्यांना सहज मिळू शकतात.

खूर असलेल्या सस्तन प्राण्यांमध्ये **'जिराफा'ची** जीभ जास्त ताकदवान आणि पिळदार स्नायू असलेली समजली जाते. त्याची जीभ १.८ फुटापर्यंत लांब असते. त्यामुळे स्वत:चा चेहरा तो जिभेने साफ करू शकतो.

**खवल्या मांजराच्या** जिभेवर 'केरॅटिन'च्या प्लेट्स असतात. जिभेचं एक टोक आतून ओटीपोटाला चिकटलेलं असतं. त्यामुळे वारुळातल्या मुंग्या, वाळवी यांसारखे 'भक्ष्य' तो शेपटांत गुंडाळून ठेवू शकतो. मुंग्या खाणाऱ्या प्राण्याची जीभ दोन फुटापर्यंत लांब असते आणि तिच्यावर बारीक काटे असतात. शिवाय जिभेवरची लाळ चिकट असते. किडे पकडले गेले की, लाळेमुळे त्यांना बाहेर पडता येत नाही. काट्यांमुळे किडे मरतात. शिवाय तो जबड्याने किड्यांना चिरडूनही टाकतो.

आपल्या आजूबाजूला वावरणारी मांजरं, कुत्री स्वत:च्या जिभेने स्वत:चं अंग चाटतात, अंगावरचे किडे उडवून लावतात; तर जंगलातले सिंहासारखे प्राणी जिभेने अंग चाटून आपल्या बछड्यांवर प्रेमही करतात. जिभेचं सर्वात मोठ्ठं कार्य म्हणजे चव कळणं; पण पेंग्विन पक्ष्याच्या जिभेवर अनेक केस असूनही त्याला कोणतीच चव कळत नाही. असं असलं तरी जिभेच्या साहाय्याने तो भक्ष्य पकडू शकतो, हेही तितकंच महत्त्वाचं!

*'जीभ' आहे म्हणून वाणी आहे।*
*'वाणी' आहे म्हणून 'संभाषण'*
*आणि 'वक्तृत्व' आहे।।*
*'जीभ' आहे म्हणून चव आहे।।*
*'चव' आहे म्हणून*
*'खमंग फराळ' आहे।।'*
*'फराळ' आहे कारण*
*दिवाळी हा 'सण' आहे।*
*'सण' आहे कारण*
*भारतीय संस्कृती आहे।।*

**– डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७ लोकमान्यनगर,
पुणे 411030

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**वाचा**
**'त्रयोदशगुणी विडा'**
**लेखक – डॉ. कांचनगंगा गंधे**

**बुद्धीला खुराक –** दोस्तांनो, माणसाच्या जिभेवरून अनेक वाक्प्रचार, म्हणी प्रचलित आहेत, त्यांचे अर्थ आणि त्यावरून एखादी गोष्ट तयार करता येईल का बघा. शिवाय कोणती अक्षरं 'जीभ' टाळ्याला लावल्याशिवाय म्हणता येत नाहीत, तेही शोधून काढा.

**छात्र प्रबोधन मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणी व ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या..

Wish you a very
Happy Diwali

YOGA
ENTERPRISES
Medical Equipments
Surgical Disposables

Second Floor, 1184/4, Office No. 57/58, A Wing,
Shreenath Plaza, Shivajinagar, Pune 411 005,
Ph. No. 020 25530063/64, 9011099487
E-Mail : accounts@yogaenterprises.com

POWER CARE
KIRLOSKAR GREEN

CUBE POWER CARE
PVT. LTD.

15, Muktangan Commercial Complex,
Opp. Sarang Society, Sahakarnagar
No. 2, Pune 411009,
Tele/fax : 91 20 2422 44 45,
2422 29 20
Email : cubegen@dataone.in

Wish you a very
Happy Diwali

Vinayak Polymers Industries

# 2, Vighnahar Chambers, Opp. Telephone Exchange,
Karve Road, Erandawane, Pune - 411 004,
Mobile: 9822192885
Phone: 020-25459218, 32922958, 25389179, 30220916,
Telefax: 020-25459218
E-mail : vinaykpolymersindustries@yahoo.com

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !**

## खास कुमारांसाठीची पुस्तके



**※ कथासंग्रह**

१. रस्काझी-रशियन कथा ........................७०
२. सफर विज्ञानकथांची..........................८०
३. प्रेरक कथा*...................................५०
४. कहाणी दोन भावांची..........................४०

**※ ललित लेखसंग्रह**

५. अलगुज* .......................................५०
६. केवड्याचं पान................................५०
७. बकुळफुलं ......................................६०



**※ कविता/काव्यपंक्ती संग्रह**

८. कवितेच्या गावा................................७०
९. शब्दांची रत्ने ..................................६०

**※ काव्य-रसग्रहण लेखसंग्रह**

१०,११. गंध मोहवी काव्याचा भाग १ व २(प्रत्येकी) ७०
१२. पाहिलेच पाहिजे असे काही ..................८०
१३ ते १५. वाचलेच पाहिजे असे काही
भाग १,२,३ (प्रत्येकी) ..........................४०



**※ माहितीपर पुस्तके**

१६. आपला पाऊस ..................................३०
१७. छंद आकाश दर्शनाचा ........................१००
१८. वनस्पतींचे अनोखे विश्व.......................८०

**※ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**

१९. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत..................१३०
२०,२१. कल्पक बनू या/Be Creative १००/१५०
२२. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ....................७०
२३. तरंग मनाचे*.....................................६०
२४. उजळती वाट......................................४०
२५. निर्णय कौशल्य*..................................५०
२६. नियोजन कौशल्य*................................५०
२७. भावनांच्या प्रांगणात ............................७०
२८. गीता-गीताई .....................................२०
२९. प्रबोधन गीते भाग १.............................४०
३०. प्रबोधन गीते भाग २.............................३०



**※ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके**

३१. जिद्दीची लोभस रूपं ............................६०
३२. आयुष्यातील वादळलाटा .......................८०
३३. कथा इस्रोची ....................................८०
३४. आम्ही असे घडलो..............................८०
३५. हरिसिंह नलुआ..................................६०
३६. आमची जडणघडण..............................८०
३७. गोष्टीरूप आप्पा..................................५०
३८. आपले आप्पा....................................५०
३९. समाजशिल्पी आप्पा ............................८०





**※ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह**

४०. स्वीकारशील स्वदेशी ...........................५०
४१,४२. हरित संदेश/Green Messages . १५/२०
४३. हट्टी व्हा हट्टी ..................................७०



**※ अभ्यासविषयक पुस्तके**

४४. असे घटते सुंदर अक्षर ..........................२०
४५. प्रज्ञाबोध भाग-५ ...............................७०
४६,४७. अभ्यासातील स्वावलंबन
भाग १ - अभ्यासाची पूर्वतयारी ..................७०
भाग २ - अभ्यास कौशल्ये* .....................१००
भाग ३ - परीक्षा तंत्र* ...........................८०
४८. चला प्रकल्प करूया ............................१००
४९. Learning To Explore ..........................२००



**※ कलाकृतिपर पुस्तके**

५०, ५१. त्रिमितीची किमया/3D Magic ........८०/९०
५२. कागदी हस्तकलेच्या दुनियेत ...................५०
५३. हस्तकलांचा उत्सव..............................७०
५४. कलेच्या विश्वात ................................७०
५५. अभिवाचन एक कला.............................७०

## युवा-शिक्षक-पालकांसाठी उपयुक्त पुस्तके



**※ ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक पुस्तके**

१,२. बुद्धिवैभव/Glory of Intelligence (प्रत्येकी).. ४०
३,४. हसत खेळत बुद्धिविकास भाग १व२ (प्रत्येकी) १५०
५,६.Enhancing the Intelligence through
Play - Part 1*, Part 2 (each)....................१५०
७. आश्वासक पालकत्व ..............................१००
८. सामाजिक जाणीव संवर्धन.........................१००
९. मनुष्य घडणीसाठी आवाहन : खंड १ ..........१३०
१०. मनुष्य घडणीसाठी आवाहन : खंड २............१२०
११. Man Making.......................................२५०
१२. राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण .....................१५०
१३. शिक्षण व्हावे चैतन्यदायी ........................१००



१४ ते १६ ज्ञान प्रबोधिनी खंड - ४
भाग - १ शिक्षण प्रभाग ............................१००
भाग - २ संशोधन प्रभाग............................१००
भाग - ३ ग्रामविकसन प्रभाग.......................१००
१७. चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी .........................७५



**※ ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक पुस्तके**

१८. राष्ट्रद्रष्टे विवेकानंद........................ १२०
१९. विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता.......... ८०
२०. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. वि.वि. पेंडसे १००
२१. Appa Pendse-The Man & The Mission४०

**※ ज्ञान प्रबोधिनीची वैचारिक पुस्तके**

२२. विवेकानंदांचा राष्ट्रधर्म........................ ६०
२३. समर्थ रामदास काय म्हणाले?................ ६०
२४. महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म...................... ६०
२५. राष्ट्रदेवो भव .................................. ७०
२६. महर्षी दयानंद काय म्हणाले? ................ ३०
२७. स्वत:ला घडविण्यासाठी उपासना.............. ३०

(*या पुस्तकांची नवीन आवृत्ती प्रकाशनाच्या मार्गावर!)

पुस्तकांचा परिचय
वाचण्यासाठी व
ऑनलाइन खरेदीसाठी
jpprakashane.org
या संकेतस्थळाला भेट द्या.

**वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - ३०**
☎ ०२०- २४२०७१७४/१७५

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी
येथे क्लिक करा.

शब्द शब्द पालवता, हळू बिलगावी कळी। अन् अंगणात यावी, शब्दफुलांची दिवाळी।।

शुभेच्छुक - • श्री. अतुल एदलाबादकर, पुणे • श्री. अंबरिश देशमुख, पुणे
• श्रीमती माधवी दाते, पुणे- कै. निर्मला व कै. दिनकर जोशी-पुराणिक स्मृतिप्रीत्यर्थ.

# शुभ दीपावली !!





दीप लाव तेजस्वी, विश्व प्रकाशमय करणारा।
दीप लाव ओजस्वी, साऱ्यांना सहज फुलवणारा।।
एक दीप लाव, प्रत्येकाच्या मनाशी।
माणसाला, माणसाशी, माणसासारखं वागायला शिकवणारा।।





## रामचंद्र अँड कंपनी

७५२, गणपती पेठ, सांगली ४१६४१६
ramchandra_co@hotmail.com
Phone : ०२३३ – २३७६८८५, २३७२८२२

*Everthing must be made as simple as possible but not simpler*

**Avinash Musale - 9850079738**
**Akshay Musale - 9011043499**

## PRABHA ENTERPRISE

***MFG's of automobile components and machine tools. All type of bar turning job works. Spare capacity on CNG SLIDING HEAD & CNC TRAUB***

**1325/13, Shivaji Udyam Nagar**
**Kolhapur- 416234, Contact - 0231 6681336**



ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील मातृमंदिरापासून स्फूर्ती घेऊन, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे काही कार्य करावे अशा हेतूने काही तळमळीच्या नागरिकांनी १९८८ साली गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर आदरणीय वा.ना. अभ्यंकर तथा भाऊ ह्यांच्या मार्गदर्शनाखाली 'मातृमंदिर विश्वस्त संस्था' या न्यासाची स्थापना केली.

# मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे

**मोठ्या संख्येने सहभागी व्हा !**

संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित

## राज्यस्तरीय 'चित्रकथा' स्पर्धा

### स्पर्धेचे स्वरूप, नियम व अन्य तपशील

**स्वरूप** : संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत रामदास स्वामी यांच्यापैकी कोणाही एका संतांच्या जीवन चरित्रातील कोणताही एक प्रसंग कमीत कमी चार चित्रांच्या मालिकेतून चित्ररूपात मांडणे.

**वयोगट** : १) सातवी-आठवी २) नववी-दहावी

**कागदाचा आकार** : A-३( २९ X ४२ सें.मी.) आकाराच्या पांढऱ्या कागदावर एकाच बाजूस.

**रंगमाध्यम** : ऑइल पेस्टल, रंगीत पेन्सिली, वॉटर कलर्स, पोस्टर कलर्स यांपैकी एक व एकत्रित माध्यमे.

**चित्रावरील मजकूर** : चित्राखाली कोणतेही स्पष्टीकरण वा चित्रामध्ये कोणतेही संवाद लिहू नयेत. चित्राला शीर्षक द्यावे. चित्राच्या खाली चित्रकाराचे नाव, इयत्ता, गाव व संपर्क क्रमांक लिहावा.

**परीक्षणाचे निकष** : प्रसंगाची निवड, शीर्षक, चित्र रेखाटन, रंगसंगती, चित्रांची संगती व चित्रकलेची परिणामकारकता यांच्या आधारे परीक्षण केले जाईल. गुणवत्ताप्राप्त चित्रे काढणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन मुलाखती घेतल्या जातील व त्या आधारे क्रमांक जाहीर केले जातील.

**अधिक माहितीसाठी:** संपर्क : श्री. शिवराज पिंपुडे - ८८८८४३१८६८, Email ID - mvsnigdi@gmail.com

**चित्रकथा पाठविण्याचा दिनांक व तपशील**

**३० डिसेंबर २०२०** पर्यंत चित्र उत्तम गुणवत्तेने स्कॅन करून वा फोटो काढून mvsnigdi@gmail.com यावर पाठवावा. मेलवर स्पर्धेच्या नावाचा उल्लेख करून, स्वत:चे पूर्ण नाव, विद्यालयाचे नाव, इयत्ता, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.

**बक्षीसे** (२६ जानेवारी २०२१ रोजी निर्णय जाहीर होईल.)

दोन्ही गटांमधून स्पर्धकांच्या संख्येनुसार तीन ते पाच क्रमांक काढले जातील.

प्रथम क्रमांक - रु. २०००,

द्वितीय क्रमांक रु. १५००, तृतीय क्रमांक रु. १०००.

उत्तेजनार्थ (२ क्रमांक) - प्रत्येकी ५००


आपले,

श्री. वा. ना अभ्यंकर
संस्थापक

नितीनभाई कारीया
अध्यक्ष

यशवंतराव लिमये
कार्यवाह

**संपर्क** – शशिकला निवास, पेठ क्र. २५, निगडी प्राधिकरण, पुणे-४४
(संस्थेला दिलेल्या देणग्या आयकर धारा- 80G सवलतीस पात्र आहेत.)



100
1920
2020
KIRLOSKAR BROTHERS LTD.
Kirloskar
Enriching Lives
किर्लोस्कर पम्पस
तर्फे
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !!
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
स्थापित १८८८
किर्लोस्कर ग्रुप कंपनी


Ideas to IMPACTS
Distributing The Future Evenly®
Ideas to IMPACTS
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
भारतात एक सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी I2I वैशिष्ट्यपूर्ण असे
स्मार्ट टाऊन मॉडेल वापरत आहे, ज्या योगे जागतिक ग्राहकांना
भारताच्या निमशहरी व ग्रामीण भागातून आय.टी. सेवा पुरवल्या जात आहेत.
"Distributing the future evenly®"
Services
Content Data & Transformation
Security Testing Services
Product & data engineering
Enterprise Services
S. No. 284/2D, 286/1B, 286/2/2 Pallod Farm, Behind Vijay Sales, Baner,
Pune - 411 045, Maharashtra, India, www.ideastoimpacts.com/

# Balaji Group

Passion for Perfection

## BUSINESS HOURS

Monday - Friday : 8.00 to 16.30
(phone until 17.30 Hrs.)
Saturday : 8.00 – 18.30 Hrs
Sunday : 11.00 – 15.00
(Phone until 16.30)

## WE ARE HERE

Palm Beach Road, Sector 15, CBD Belapur,
Navi Mumbai. Maharashtra
Phone : 022 - 27560450/460
Email: info@balaji-group.in

*Once in a........*
LIFETIME


पाणी, ऊर्जा, हाताला काम। संख्या, शिक्षण, संघटित ग्राम।।
यामध्ये खोरे पातळीवर काम
- ग्रामविकसन प्रभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**कोरोनासारख्या प्रतिकूल परिस्थितीला दीर्घकाळ सामोरं जायचं तर परिस्थितीचं, वास्तवाचं भान हवं! काही अपरिहार्य बदलांना सामोरं जायला मन स्वीकारशील, लवचीक हवं. आपला विचार करताना हातावर पोट असणाऱ्या लोकांसाठी, कोविडग्रस्तांसाठी मदतीचा खारीचा वाटा देखील आपल्याला उचलता यायला हवा. या आव्हानात्मक काळात आपलं मन कणखर आणि सकारात्मक असेल तरच आपला टिकाव लागू शकेल. कोरोनाविरुद्धच्या दीर्घ लढ्यासाठी सकारात्मक ऊर्जा कशी मिळवायची? 'न्यू-नॉर्मल' जीवनशैली कशी अंगिकारायची? आपल्या मनातील या आणि अशा अनेक प्रश्नांची उकल करणारा हा 'कोरोनासह जगताना'चा खास विभाग तुम्हाला नक्की दिशादर्शक ठरेल!**

## चला उभारू आयुष्याला!

चला उभारू आयुष्याला जिद्द उसळते आहे!
हिरमुसलेली कळी मनाची पुन्हा उमलते आहे!
खडक पाहिला हिरवळताना
तृणपर्णांनी मोहरताना
निळे स्वप्न ते आकाशाचे, त्यावर झुलते आहे!
चला उभारू आयुष्याला, जिद्द उसळते आहे!

मुक्या मनांना शब्दपालवी
नात्यामधुनि सूर लाघवी
बोलायाचे तरीही काही; मनात उरते आहे!
चला उभारू आयुष्याला, जिद्द उसळते आहे!

काळोखाची पुसुनि रेषा
अंकुरणे तेजोमय आशा
जीवन धावे पुढे-पुढे हे, नकळत कळते आहे!
चला उभारू आयुष्याला, जिद्द उसळते आहे!

क्षणभर वाटे विश्व थांबले
अंकुरणारे श्वास लांबले
क्षणांतुनि त्या, दु:स्वप्नातून, जग सावरते आहे!
चला उभारू आयुष्याला, जिद्द उसळते आहे!

पुन्हा उघडूया पंख नव्याने
गगन भारूया चैतन्याने
उत्सवातल्या सौरभातुनि, अमृत झरते आहे!
चला उभारू आयुष्याला, जिद्द उसळते आहे!


**– प्रवीण दवणे**


ब-३०३, राजहंस, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम) 400604


**चित्रकार : राहुल देशपांडे**

**ऐका प्रस्तुत कवितेचं रसग्रहण व सादरीकरण कवी प्रवीण दवणे यांच्या आवाजात**




अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.



बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
न्यूनतम ब्याज दरें और ईएमआई
अपने होम लोन को
बैंक ऑफ बडौदा में स्विच करें
Home Loan linked with
Saving Bank (SB) Account
Baroda
HOME LOAN
ADVANTAGE
Your interest on Home Loan comes down
When your Savings go up
Open Instant Saving Bank Account with us by TAB Banking
बड़ौदा
होम लोन
AT BRLLR = 7 %
• पात्रता की उच्चतम राशि
• 30 वर्ष तक की लंबी चुकौती अवधि
• व्यक्तिगत दुर्घटना बीमा
• बाधा रहित टॉपअप लोन की सुविधा
बड़ौदा
कार लोन
BRLLR+0.50%
• पात्रता की उच्चतम राशि
• 7 वर्ष तक की लंबी चुकौती अवधि
• ऑन रोड लागत का 95% तक वित्तपोषण
Bank of Baroda
Railway Lines Solapur,
Mobile No. 9923208950
Advances Deptt. 0217-2314499
शर्तें लागू
बड़ौदा
मोरगेज लोन
BRLLR+1.2%
• पात्रता प्रोपर्टी के रिलाईजेबल
• वैल्यू का ६० प्रतिशत
• व्यक्तिगत /व्यवसाय उपयोग हेतू
पि. व्हि. सिंधू
ऑलिंपिक रजत पदक विजेता
व्यापार
के लिए लोन
BRLLR+1.45%
• नये व्यवसाय की शुरुवात
• वर्तमान इकाई के नवीकरण
• व्यावसायिक विस्तार के लिए
दीपावली की
हार्दिक
शुभकामनाएँ।
Open Instant Saving Bank Account
with us by TAB Banking
बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

# प्रवाही आणि प्रभावी वृत्ती

– गुंजन कुलकर्णी

मित्रांनो, तुम्ही चोलुटेका नदीवरच्या पुलाची गोष्ट वाचली आहे का? अमेरिकेमधील हॉन्डरस नावाच्या भागात चोलुटेका नदी आहे. हॉन्डरस भागात सातत्याने तुफानी चक्रीवादळे होत असतात. त्यामुळे १९९६ मध्ये जेव्हा चोलुटेका नदीवर नवीन पूल बांधायचा ठरला, तेव्हा तो हवामानाच्या अत्यंत तीव्र परिस्थितीतही पक्का राहील, यासाठी प्रयत्न करायचे ठरले. एका जपानी कंपनीने हा पूल बांधायचे कंत्राट घेतले. त्यांनी निसर्गाच्या लहरींमध्ये टिकून राहील असा, अत्यंत *सॉलिड* पूल बांधला. नवीन युगातील अभियांत्रिकी चमत्कार *(इंजिनीअरिंग मार्व्हल)* मानला जाणारा हा पूल, १९९८ मध्ये सर्वांसाठी खुला करण्यात आला. त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात हॉन्डरस भागात 'मिच' नावाचे मोठे चक्रीवादळ धडकले. सहा महिन्यांमध्ये जितका पाऊस होतो, तितका केवळ चार दिवसांत पडला. या वादळाने या भागात मोठ्या प्रमाणात हानी केली. चोलुटेका नदीला महापूर आला. नदीवरील सगळे पूल वाहून गेले. केवळ एक पूल मात्र टिकून राहिला... नवीन चोलुटेका पूल!



या नवीन पुलावर चक्रीवादळाचा काहीही परिणाम झाला नाही. परंतु यात दुसरीच मोठी समस्या होती. हा नवीन पूल अगदी जसाच्या तसा राहिला खरा; पण त्या पुलापर्यंत जाणारा रस्ता आणि पुलावरून पुढे जाणारा रस्ता, हे दोन्ही मात्र वादळात पूर्णपणे वाहून गेले. हे इतकेच नाही तर, या महापुराच्या तीव्र जोरामुळे चोलुटेका नदीचा मार्गच बदलून गेला. नदीचा एक नवीनच प्रवाह तयार झाला. आणि ती आता या नवीन पुलाच्या एका बाजूने वाहायला लागली. त्यामुळे चक्रीवादळाच्या तडाख्यात पाय रोवून घट्टपणे उभा राहणारा हा पूल आता ना नदी पार करत होता; ना कुठून येत होता; ना कुठे घेऊन जात होता.

ही घटना विचार करायला लावणारी आहे. मूळ समस्या सोडवली का? तर निश्चित सोडवली. त्यावर भक्कम उपाय शोधला. पण त्यानंतर अपरिहार्य कारणामुळे समस्याच बदलून गेली.

'शाळेत जायला

साऱ्याच समस्यांना, मी झेलणार आहे। युद्धात जीवनाच्या, मी जिंकणार आहे।।

वार्षिक देणगीदार – • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे • सौ. सीमा परांजपे, पुणे • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे

*बोअर* होतं' असं म्हणणारे आपल्यातले बरेच जण आता, 'कधी संपणार हे कोरोना प्रकरण? शाळेत जायला कधी मिळणार?' असं म्हणायला लागले असतील ना? कोरोना नावाच्या एवढ्याशा विषाणूने आपल्या समोरच्या कित्येक समस्या बदलून टाकल्या. 'शाळेत जावं लागणार नाही' या नुसत्या विचाराने सुखावणारी कल्पना, प्रत्यक्षात आल्यावर आता इतकी त्रस्त करणारी असेल असं वाटलंच नव्हतं ना कधी?

आठवड्यातून एकदा तरी *रेस्टॉरंटमध्ये* जाणाऱ्या कुटुंबांनी किंवा *मेसच्या* डब्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांनी, हे मार्ग बंद झाल्यावर काय पर्याय शोधले असतील? '*ॲडव्हान्स बुकिंग* केल्याशिवाय तिकीट मिळणारच नाही,' असा ट्रेंड झालेली सिनेमागृहे गेल्या ६-८ महिन्यांपासून पूर्ण बंद आहेत. मोठ्या शहरांमधून *वीकएंडचा* अविभाज्य भाग झालेले *शॉपिंग मॉल्स* देखील बंद होते.

परंतु अशा अनेक गोष्टींवर आपण गेल्या काही महिन्यांत तोडगे काढले. शाळा *डिजिटल* माध्यमातून सुरू राहिल्या; घरोघरी नवनवीन पदार्थ बनवले गेले; करमणुकीची विविध साधने शोधली गेली; घरात राहून काय काय शिकता येईल, याचे प्रयोग केले गेले. कल्पनेतसुद्धा विचार न केलेल्या या परिस्थितीशी आपण, या ना त्या मार्गाने जुळवून घेतले. इतकंच नाही तर त्यात अजून चांगलं काय करता येईल, याचाही विचार व कृती केली. जरी हे 'परिस्थितीशी जुळवून घेणं' सहज साध्य झालं नसलं आणि अजूनही यातील अनेक समस्या सुटल्या नसल्या, तरी आपण परिस्थितीचा स्वीकार करून मार्ग काढू शकतो, हे तर आपल्या सगळ्यांच्या निश्चित लक्षात आलं आहे.

माझ्या ओळखीतल्या एका आठवीच्या विद्यार्थिनीने कोरोनाकाळात लोकांचे व्यवसाय कसे बदलले याचे सर्वेक्षण केले. तिच्या लक्षात आले की, जे व्यावसायिक आहे ती परिस्थिती स्वीकारून आणि आजची गरज ओळखून काम करताहेत, ते जास्त चांगल्याप्रकारे काम करताहेत. आणि भविष्याबद्दल देखील आशावादी आहेत.

कोरोनाच्या या परिस्थितीत आणि त्यापूर्वी परिस्थितीशी जुळवून घेऊन स्वतःमधे बदल करण्याचे प्रसंग तुमच्या आयुष्यात आलेत का कधी? उदा. तुमच्या घरात *कमोड* पद्धतीचेच स्वच्छतागृह वापरलं जातं आणि तुम्ही एखाद्या *कॅम्पिंगला* गेलात; तिथे जुन्या पद्धतीच्या स्वच्छतागृहाचीच सोय आहे. अशा वेळी तुम्ही काय केले आहे? एखाद्या गटाबरोबर *ट्रेकिंगला* गेले असताना, तुम्ही एकटेच काही कारणामुळे गटापासून वेगळे पडला आहात का? अशा वेळी तुम्ही काय केलंत? एखाद्या नातेवाईकांकडे गेलेले असता त्यांनी अजाणतेपणी पण खूप प्रेमाने तुम्हाला न आवडणारा पदार्थ तुम्हाला खायला दिला. काय कराल तुम्ही? अनेक छोटे-मोठे, कमी-अधिक असे आव्हानात्मक प्रसंग तुमच्या आयुष्यात सध्या आणि पुढेही येतील.

माझ्याकडे समुपदेशना-साठी येणाऱ्या एका १४ वर्षाच्या मुलीला ७-८ महिन्यांपूर्वी तिच्या कुटुंबातील तणावामुळे, त्यांच्या मोठ्या बंगल्यातून आईसोबत एका

छोट्या फ्लॅटमधे राहायला जावं लागलं. सुरुवातीला याचा तिला खूप त्रास झाला. कुटुंबापासून दुरावणं, घरातली स्वतःची खास जागा सोडावी लागणं, नातेवाईकांच्या, मित्रमंडळींच्या प्रश्नांना उत्तरं द्यावी लागणं, नवीन घरात जुळवून घेणं, पूर्वीपेक्षा कमी पैसे हाती येणं, या सगळ्या गोष्टींमुळे ती अस्वस्थ झाली. 'माझ्याच बाबतीत हे का?' अशा प्रश्नांमुळे ती चिडचिडी झाली. गेल्या काही महिन्यांत मात्र तिची जिद्द, बदललेला दृष्टिकोन, तिच्या आईचा संयम आणि समुपदेशन याचा एकत्रित परिणाम म्हणून; ती पुन्हा पूर्वीसारखी उत्साही, आनंदी झाली आहे. तिचा आत्मविश्वास वाढला आहे. आणि ती पूर्वीपेक्षा अधिक *मॅच्युअरसुद्धा* झाली आहे.

प्रत्येक बाबतीत आई-बाबा, आजी-आजोबा यांच्यावर अवलंबून न राहता 'आता मी स्वतंत्रपणे माझी, काळजी छान घेऊ शकते' हा तिचा *कॉन्फिडन्स* पाहून खूप समाधान वाटते. परिस्थिती स्वीकारण्याच्या, त्यातून मार्ग काढण्याच्या, पुढे होणाऱ्या बदलांचा अंदाज घेण्याच्या,



त्यानुसार आपल्या विचारांत आणि वागण्यामध्ये बदल करण्याच्या क्षमता आपली भावनिक शक्ती खूप वाढवतात हे तिने दाखवून दिलं आहे.

आपल्यावर आलेली परिस्थिती, मग त्यात आपला काही हात नसताना आपल्यावर ओढवली असेल; तरीही ती *पॉझिटीव्हली* स्वीकारली, तर त्यात शिकण्याच्या अनेक संधी आपल्याला सापडू शकतात. मला खात्री आहे की, तुमच्यापैकी अनेकांनी सध्याच्या परिस्थितीचा आपल्या सर्वांगीण शिक्षणासाठी छान उपयोग करून घेतला असेल.

आज आपल्यासमोर असणाऱ्या समस्यांचं स्वरूप बदलत्या काळाबरोबर बदलणारे असू शकते. अचानकपणे काही आव्हाने समोर येऊ शकतात. तेव्हा परिस्थितीशी जुळवून घेण्याची आपली वृत्ती नदीसारखी प्रवाही, बदलांना सामावून घेणारी असेल तर ती जास्त प्रभावी ठरेल!

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**– गुंजन कुलकर्णी**
बाल व कुटुंब मनोविकासतज्ज्ञ, नाशिक
gunjan.mhc@gmail.com

**चित्रकार : चित्रांजली**

**ऐका**
**न्यू-नॉर्मल आणि मी!**
**लेखन व सादरीकरण**
**स्वप्नीला सेठिया**

**हे करून पहा बरं!**

- कोरोनाच्या या अभूतपूर्व काळात कुठल्या समस्या सोडवल्यात, कुठल्या नवीन गोष्टी करून पाहिल्यात त्यांची यादी करा.
- नेहमीपेक्षा वेगळे असे कोणते आव्हानात्मक प्रसंग आपल्या आयुष्यात येऊ शकतात याचा विचार करा.
- अशा परिस्थितीतून आपण कसा मार्ग काढू शकतो याबाबत विचार करा/ इतरांबरोबर चर्चा करा.
- अजून ५ वर्षांनी, १० वर्षांनी, १५ वर्षांनी जगात कोणत्या समस्या असू शकतात यांवर मित्रांमध्ये चर्चा करा.

दु:साध्य वाटती जरी, दूर यशाची शिखरे। गुणवत्ता अन् चिकाटीने, साफल्य साधिती सारे।।
शुभेच्छुक – • श्री. सुधीर रायकर, डोंबिवली • श्री. राहुल कर्णे, पुणे
• श्री. आशिष फडके, पुणे – कै. श्रीमती कमलाबाई फडके स्मरणार्थ.




वैयक्तिक कर्ज | प्रोफेशनल कम्फर्ट लोन | प्रॉपर्टी मॉर्गेज लोन | व्यवसाय कर्ज
आकर्षक व्याजदराच्या मुदत ठेव योजना

बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांस
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!

रजिस्टर्ड ऑफिस : 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आयसीएस् कॉलनी,
युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००७.
Ph.: 020-67086708 I E-mail : customerhelp@cosmosbank.in I Follow Us On :
www.cosmosbank.com

# कोरोना आणि आत्मनिर्भर भारत

– अमोल फाळके

कोरोना महामारीमुळे (pandemic) आपण अभूतपूर्व अशी परिस्थिती अनुभवत आहोत. बहुतांशी देशांनी आपल्या भौगोलिक सीमा बंद केल्या आहेत. दळणवळण, व्यापार हे ठप्प झाले आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, स्थानिक, राष्ट्रीय ते जागतिक पातळीवर जे काही प्रयत्न करावे लागत आहेत, त्यावरून आपण सर्वजण एकमेकांशी किती पद्धतीने आणि कितीप्रकारे जोडलेले आहोत, हे लक्षात येते आहे. हे एक मोठे जागतिक संकट आहे. जागतिक आरोग्य संस्थेच्या (WHO) अहवालाप्रमाणे २१ ऑक्टोबर २०२० पर्यंत जगभरात कोरोनाविषाणुची लागण झालेल्या काही करोडो व्यक्ती आहेत आणि यामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या कित्येक लाख आहे. १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात झालेल्या मृत्यूंचे प्रमाण हे जागतिक सरासरीपेक्षा कमी असले, तरी देशाच्या अर्थव्यवस्थेवर कोरोनामुळे मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम झालेले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. शक्तिकांत दास यांनी ९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात २०२०-२१ मध्ये विकासदर ९.५ टक्क्यांनी घसरेल, असे भाकीत वर्तवलेले आहे. कदाचित विकासदर याहून अधिक प्रमाणात घसरण्याचा धोका देखील त्यांनी व्यक्त केला आहे.

कोरोना महामारीचे संकट येण्याआधीपासून भारताची अर्थव्यवस्था एका कठीण काळातून जात होती. अर्थव्यवस्थेचा विकासदर मंदावला होता, म्हणजे विकासदर २०१८-१९ मधील ८% वरून २०२०



मध्ये ४.५% एवढा खाली आला होता. त्यात भर म्हणून हे कोरोना महामारीचे संकट कोसळले. सर्व जगाची अर्थव्यवस्थाच या महामारीमुळे गोठली, म्हणजे अर्थव्यवस्थेतल्या घटकांमध्ये काम करण्याची क्षमता आहे; पण ते काम करू शकत नाहीत. कारण कुठल्याही वस्तू-सेवांची निर्मिती करायची तर लोकांना एकत्र यावं लागतं किंवा काही वस्तू-सेवांचा आस्वाद घ्यायचा असला, तरी एकत्र यावं लागतं, त्यासाठी प्रवास करावा लागतो. त्यावर आता *लॉकडाऊनच्या* धोरणामुळे निर्बंध आले आहेत.

तसेच या वस्तू-सेवांची निर्मिती करण्यासाठी लागणारा कच्चा माल, इतर गोष्टी, मनुष्यबळ आणि त्यांच्या सेवा यादेखील जगभरातून येत असतात. महामारीने यावर देखील मर्यादा आल्या आहेत. ज्यांच्या जीवावर हा जागतिक व्यापार-उदीम चालतो, त्या दळणवळणाच्या वाहिन्याच जणू थिजल्या आहेत. महामारीने निर्माण झालेल्या या असुरक्षिततेच्या वातावरणामुळे माणूस/एकंदर

समाज आवश्यक तेवढ्या गरजाच भागवायला पाहतो. त्यामुळे एकंदरच मागणी देखील थंडावते. मागणी थंडावली तर पुरवठा कसला करणार. मग उद्योग व्यवसाय थंडावणार किंवा बंद होणार. म्हणजे हे एक अर्थव्यवहार गोठवणारं दुष्टचक्रच...! या अर्थव्यवहारांचे पुनरुज्जीवन करायचे असेल तर अनेक गोष्टींची पुनर्रचना करावी लागणार. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये परस्पर अवलंबनाच्या अनेक गुंतागुंतीच्या साखळ्या तयार झाल्या आहेत. त्यातल्या कोणत्या साखळ्या पुनरुज्जीवित होऊ शकतात, या सगळ्याबद्दल प्रचंड अनिश्चिती आहे. त्यात हे महामारीचे संकट अजून ओसरलेले नाही. त्यामुळे जीवितहानी होऊ न देता वित्तव्यवस्था व आर्थिक व्यवहार परत सुरळीत कसा करायचा, ही तारेवरची कसरत सर्व देशांना करावी लागत आहे.

भारताने देखील योग्य वेळी या दिशेने पाऊले उचलली. १९ मार्च २०२० रोजी भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजींनी COVID-19 Economic Response Task force च्या स्थापनेची घोषणा केली. २४ मार्च रोजी पंतप्रधानांनी आरोग्य क्षेत्रासाठी १५,००० कोटी रुपयांच्या तरतुदीची घोषणा केली. २५ मार्चपासून भारत स्थानबद्धतेच्या (Lockdown) वेगेवेगळ्या चार टप्प्यांमधून गेला. जून महिन्यापासून ही स्थानबद्धता टप्प्याटप्प्याने उठविण्यात येत आहे. अर्थातच त्या त्या राज्यसरकारांनी स्थानिक गरजा आणि परिस्थितीनुसार स्थानबद्धतेचे आवश्यक ते टप्पे लागू केले. या टप्प्यांमध्ये केंद्रसरकार व राज्यसरकारांनी वेगेवेगळ्या समाजघटकांसाठी, क्षेत्रांसाठी उपयोगी पडतील अशा योजनांची घोषणा देखील केली.



एखाद्या व्यवस्थेवर जेव्हा ताण पडतो, तेव्हा सर्वात पहिल्यांदा त्या व्यवस्थेतील कमकुवत स्थाने (Weakness) उघडी पडतात. जेव्हा अर्थव्यवस्था गोठते, तेव्हा टिकून राहण्यासाठी ज्यांच्याकडे साठा नसतो किंवा बचत नसते त्यांचा मोठा प्रश्न निर्माण होतो. असा आपल्याकडील घटक म्हणजे रोजंदारीवर अवलंबून असलेले मजूर, कामगार. हे बहुतांशी स्थलांतर करून गावांकडून शहरांमध्ये कामासाठी आलेले असतात. असा असंघटित क्षेत्रांत काम करणारा मोठा वर्ग आपल्याकडे आहे. या सर्वांचे मोठे प्रश्न निर्माण झाले. स्थानबद्धतेच्या काळात यांचा रोजगार बंद झाला आणि त्यांना आपल्या गावाकडेदेखील जाता येईना. दळणवळणाची साधने देखील बंद झाली होती. मग प्रशासनाने, अनेक स्वयंसेवी संस्थांनी यांच्या प्राथमिक गरजांची सोय केली. तसेच त्यांना आपल्या गावी जाण्यासाठी विशेष रेल्वे व इतर वाहने उपलब्ध करून दिली.

२६ मार्चला ‘प्रधान मंत्री गरीब कल्याण योजना’ जाहीर करण्यात आली. या योजनेसाठी १.७ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात

अधिक जाणून घ्या - राष्ट्रीय वारसा स्थळे : खजुराहो लेणी - मध्य प्रदेश.

शुभेच्छुक - • सौ. अपर्णा आशीर्वाद बोंद्रे, डोंबिवली • सौ. माधुरी बनसोड, पुणे
• सौ. माधुरी अ. सोलेगावकर, डोंबिवली- कै. रमाबाई मुकुंद सोलेगावकर स्मरणार्थ.

आली. या योजने अंतर्गत तीन महिन्यांसाठी मोफत अन्नधान्य देऊन आणि थेट रोख रक्कम जनधन खात्यात जमा करून गरिबांना मदत करण्यात आली. रोजगार हमी योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कामाचा रोजचा मेहनताना १८२ रु. वरून वाढवून २०२ रु. करण्यात आला. तसेच २० जूनला स्थलांतरित कामगारांसाठी १२५ दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देणारे, ५० हजार कोटी रुपयांची तरतूद असलेले 'गरीब कल्याण रोजगार अभियान' देखील जाहीर करण्यात आले आहे.

**अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा घटक म्हणजे छोटे आणि मध्यम आकाराचे उद्योग क्षेत्र** (MSME-Micro, Small & Medium Enterprises). भारतीय उद्योग क्षेत्रातला ४५% रोजगार, ५०% निर्यात आणि ९५% उद्योग या क्षेत्रातून येतात. या क्षेत्रातील उद्योगांना जोम यावा, टिकून राहण्यासाठी ऊर्जा मिळावी म्हणून सरकारने अनेक योजना घोषित केल्या आहेत. या उद्योगांना वित्तपुरवठा चालू राहावा,



त्यांच्या उत्पादनांना मागणी यावी या दृष्टीने ह्या योजना आहेत. कोरोना महामारीमुळे निर्माण झालेल्या संधीचा अवाजवी फायदा घेऊन परकीय कंपन्यांनी भारतीय उद्योग कंपन्या ताब्यात घेऊ नये म्हणून परकीय गुंतवणुकीच्या कायद्यात देखील बदल करण्यात आलेले आहेत. एकंदरच **भारतीय** अर्थव्यवस्थेची मरगळ दूर घालवण्यासाठी १२ मे रोजी भारताच्या प्रधानमंत्र्यांनी 'आत्मनिर्भर भारत' ही योजना घोषित केली आहे. २० लाख कोटी रुपये म्हणजे भारताच्या सध्याच्या सकल घाऊक उत्पन्नाच्या (GDP) १०% एवढी तरतूद या योजनेसाठी केलेली आहे. या योजनेमधील **'आत्मनिर्भर भारत' निर्माण करण्याची ध्येयदृष्टी (Vision) पुढील ५ आयामांवर/खांबांवर आधारलेली आहे अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था, मोठ्या प्रमाणावर युवा असलेली लोकसंख्या आणि आर्थिक मागणी.**

कठीण प्रसंग हे आव्हानांबरोबर अनेक संधी घेऊन येतात. आपले प्रधानमंत्री आपल्याला कोरोना महामारीकडे स्थानिक उत्पादने आणि आर्थिक स्वावलंबनावर भर देण्याची संधी म्हणून बघायला सांगत आहेत. सध्या बाह्य देशातील धोरणांविषयी आपल्याला काही सांगता येत नाही, त्यामुळे निदान देशांतर्गत अर्थव्यवस्था सबळ करणे हे आपल्या हातात आहे. अर्थात चीन व अमेरिका यांचा चालू असलेला आर्थिक संघर्ष, कोरोना महामारीच्या उगमामुळे चीनभोवती असलेलं संशयाचं सावट, चीनने सीमेवर चालवलेले लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन व घुसखोरी यांमुळे काही देश, कंपन्या आपले उद्योग चीनमधून इतरत्र हलविण्याची शक्यता आहे.

ही भारतासाठी संधी होऊ शकते. ही संधी घेण्यासाठी राज्यांनी उद्योगस्नेही नीती आणि रीतींचे अवलंबन करावे, असेही केंद्रसरकार सुचवते आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने देखील पुरेसे

आज जीवा त्रास तरी, उद्या सुख वाटे। काट्याकुट्यातून पुढे, हिरवळ भेटे।।
शुभेच्छुक – • श्री. व्यंकटेश प्रभुदेसाई, कल्याण • श्री. हृषिकेश साठे, पुणे
• चि. अंजिश पराळे, निगडी-पुणे – छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा!

भांडवल बाजारपेठेमध्ये खेळते राहण्याच्या दृष्टिने नियोजन केले आहे. वेगवेगळ्या योजनांचा परिणाम त्या कशाप्रकारे राबवल्या जात आहेत आणि त्या ज्यांच्यासाठी राबवल्या जात आहेत, ते समाजघटक त्यांना कसा प्रतिसाद देत आहेत; यावर अवलंबून असतो.

कोरोना महामारीसारखे प्रश्न हे गुंतागुंतीचे (complex) असतात. यांच्यावर ठरलेली ठोकळेबाज उत्तरे काढता येत नाहीत. परिस्थिती ही खूप अनिश्चित आणि सारखी बदलणारी असते. आपण ठरवलेल्या योजना अपेक्षित परिणाम करतीलच असे सांगता येत नसते; पण म्हणून 'काहीच न करणे' हा देखील उपाय नसतो. काही उपाय करून त्यांचा काय परिणाम होतो आहे, हे बघत राहावे लागते. होणाऱ्या बदलांचा सातत्याने आढावा घ्यावा लागतो. आणि गरज पडल्यास आपली धोरणे, योजना बदलण्याची लवचीकता ठेवावी लागते. या दृष्टीने आपण होणाऱ्या बदलांकडे पाहायला हवे आणि त्याबद्दल सजग व प्रतिसादी असायला हवे.

एकंदर या महामारीमुळे आपल्याला विकेंद्रीत विकासाचे महत्त्व नक्कीच जाणवले असेल. त्यामुळे काही शहरांपुरताच विकास मर्यादित न राहता, तो गावागावांपर्यंत कसा पोहोचेल; यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. आपलं बलस्थान असलेल्या शेतीउद्योगांवर आधारित असलेले प्रक्रिया उद्योग स्थानिकरीत्या कसे निर्माण करता येतील. त्यातून स्थानिक पातळीवरच मूल्यवर्धन कसे होईल आणि रोजगार कसा वाढेल, हे बघायला हवे.

जर आवश्यक त्या पायाभूत सुविधा (वीज, इंटरनेट) असतील तर माहिती-तंत्रज्ञानाचे काम ठरावीक शहरे सोडून इतर ठिकाणी होणे शक्य आहे, हे या काळात आपल्या लक्षात आले आहे. त्यासाठीच्या सुविधा पुरवणे आणि कौशल्य प्रशिक्षण करणे आवश्यक आहे. छोट्या, मध्यम उद्योगांना बळ देऊन. असंघटित कामगार वर्गाला संघटित व्यवस्थांमध्ये आणले पाहिजे. त्यांची नोंदणी करण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याची गरज आहे.

मोठ्या उद्योगांनी (CSR-Corporate Social Responsibility) खाली त्यांच्या पुरवठ्यासाखळ्यांमध्ये (Supply Chain) असलेल्या सर्व कामगारांची नोंद (नाव, कामाचे स्वरूप, कालावधी, बँक खाते, आधार नंबर इ.) करावी, अशी योजना करता येईल का?

आरोग्य व्यवस्थेमध्ये लागणाऱ्या साधनांचे स्थानिक उत्पादन करण्यावर भर देणे, तसेच अशा रोगांशी लढा देण्यासाठी प्रतिकारशक्ती वाढविण्याचे काम करणाऱ्या पर्यायी आरोग्यसेवा-पद्धती-योग, आयुर्वेद, निसर्गोपचार इ. यांच्या संशोधनावर भर देणे. त्यासाठीची उत्तम गुणवत्ता असलेल्या सेवा उपलब्ध करून त्यांची बाजारपेठ निर्माण करण्यास मदत करणे, अशा काही गोष्टी आपण करू शकतो का? याचा विचार करावा लागेल.

भविष्यात येऊ पाहणाऱ्या कोरोना महामारीसारख्या धक्क्यांना पचविण्यासाठी, समर्थपणे सामोरे जाण्यासाठी एकंदरच आपल्या अर्थव्यवस्थेची 'प्रतिकारशक्ती'

वाढवायला लागेल. त्यासाठी अर्थव्यवस्थेच्या पायाचा विस्तार करावा लागेल. त्यासाठी जास्तीतजास्त भारतीय नागरिकांची क्रयशक्ती वाढून, अन्न-वस्त्र-घर-आरोग्य-गुणवत्तापूर्ण शिक्षण अशा मूलभूत गरजा भागविण्यासाठी, आर्थिक मागणी करण्याची त्यांची क्षमता कशी निर्माण होईल, असे बघावे लागेल.

या मागणीचा पुरवठा भारतीय सेवा-पुरवठादार व उद्योजक भागवू शकतील, अशा रचना निर्माण कराव्या लागतील. 'Make In India' आणि 'Make For India' हे दोन्ही साधावे लागेल. या सर्व काळात उपयोगी पडलेल्या कुटुंब व्यवस्थांसारख्या सामाजिक व्यवस्था आणि परस्पर सामंजस्य यांचं दृढीकरण आपल्याला पुढील काळात करावं लागणार आहे.

या संकटाच्या काळात वैयक्तिक पातळीवरसुद्धा आपण काही गोष्टी करू शकतो. आपल्या गरजा नेमक्या करण्याकडे आपण भर दिला पाहिजे. या गरजांचे आपल्याला काही वर्गीकरण (खूप, मध्यम,कमी महत्त्वाच्या) करता येते का, हे आपल्याला पाहायला हवे. सर्वच गोष्टींच्या उपलब्धतेची काही काळ कमतरता असणार आहे. त्यामुळे आपण खर्चाबद्दल जागरूक राहून, तो कमी करून बचत व गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला पाहिजे. गुंतवणूक करताना परताव्याबरोबरच



स्थैर्याचा विचार अधिक करावा लागेल. आपल्यावर कमी खर्च करून आपण जास्तीतजास्त काम, मूल्यवर्धन कसे करू शकतो, या दृष्टिने प्रयत्न करायला हवेत.

आव्हानांना तोंड द्यायला शिकवते, परिस्थितीवर मात करायला शिकवते तेच शिक्षण! असे 'जीवनदायी' शिक्षण घेऊन आपल्या देशाला आत्मनिर्भर करण्याच्या प्रवासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

– अमोल फाळके
amolphalke@gmail.com

चित्रकार : चित्रांजली

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**काही उपयुक्त संकेतस्थळे**

https://en.wikipedia.org/wiki/Economic_impact_of_the_COVID-19_pandemic_in_India
https://covid19.who.int/ - WHO Coronavirus Disease (COVID-19) Dashboard

छात्र प्रबोधन मासिकाचे आजच सभासद व्हा!
वार्षिक वर्गणी : छापील अंक – ₹ २००, इ-अंक ₹ १००
(घरपोच दिवाळी अंकासाठी रु. ५०/- जादा आकार भरावा.)

पाहा – कोरोनासह जगताना कोणता दृष्टिकोन बाळगावा व काय काळजी घ्यावी याबाबत डॉ. धनंजय केळकर यांचे मार्गदर्शन

# जागवू संवेदना!

– कु. मधुरा बापट

जिथे एका बाजूला आपण आपल्या आयुष्यातील छोट्या-छोट्या गोष्टींबाबत तक्रार करत असतो, तिथे काही माणसं मोठ्या-मोठ्या समस्याही अगदी लहान वाटाव्यात अशा पद्धतीने सोडवतात. गेल्या महिन्यात मला अशाच काही लोकांचा सहवास लाभला, त्याबद्दल मी तुम्हाला सांगणार आहे.

कोरोनाची साथ भारतात आल्यापासून आपण सर्वच गोंधळून गेलो होतो, घाबरलो होतो, वेगवेगळे उपाय शोधत होतो. देशातील कोरोना रुग्णांच्या संख्येसोबत सर्वांवरील ताणही वाढत होता. या सगळ्या परिस्थितीत मी काय करू शकते, असा प्रश्न मला सारखा पडत होता. मी ना डॉक्टरांची कामे करू शकत होते, ना लस बनवू शकत होते. मग नक्की करायचं काय?

ह्या सगळ्या विचारात असतानाच मला 'गरवारे कोवीड केअर सेंटर'बद्दल समजलं. पुण्यातील गरवारे महाविद्यालयामध्ये 'जनकल्याण समिती व पुणे महानगरपालिका' ह्यांच्या प्रयत्नांतून हे *'कोवीड केअर सेंटर'* सुरू आहे. ज्या लोकांना कोरोनाची लागण झाली आहे; पण काही लक्षणे नाही त्यांच्यासाठी इथे विलगीकरणाची सोय केली आहे. ह्या केंद्राचे काम पूर्णपणे स्वयंसेवक बघतात. हे समजल्यावर मग मी पण तिथे 'स्वयंसेवक' म्हणून जायचं ठरवलं. घरच्यांचा पहिल्यापासून पाठिंबा होताच. आणि मग आपण ह्या कोरोनाच्या संकटात प्रत्यक्ष काही योगदान देऊ शकतो, असा विश्वास निर्माण झाला.

गरवारे महाविद्यालयात पाऊल ठेवताच तेथील सकारात्मक ऊर्जा जाणवू लागली. प्रत्येक माणूस एका वेगळ्याच चैतन्याने भारलेला होता. आणि तेव्हाच मनोमन जाणवलं की, पुढचे १४ दिवस आयुष्यभर लक्षात ठेवावे, असे असणार आहेत.

पहिल्याच दिवशी संध्याकाळी सगळ्या स्वयंसेवकांची एकत्र बैठक झाली. आम्ही साधारण १६ जण असू. पहिली बैठक वीणाताई बेडेकर (गेले ४ महिने ही ताई या केंद्रात अविरत काम करत आहे) व दत्ताजी काळे ह्यांनी घेतली. कामाचे साधारण स्वरूप



अधिक जाणून घ्या - राष्ट्रीय वारसा स्थळे : काझीरंगा उद्यान - आसाम.

शुभेच्छुक – • श्री. देवदत्त कुलकर्णी, पुणे • डॉ. धनंजय लोंढे, शिक्रापूर • श्री. मोरेश्वर कोकजे, डोंबिवली

सांगितल्यावर नंतर सगळ्यांच्या सोयीनुसार कामाच्या वेळा ठरवल्या गेल्या. मी सकाळच्या पाळीला होते. मग आम्हाला काय काय कामे असतील, याची सविस्तर माहिती देण्यात आली. आम्हा सगळ्या स्वयंसेवकांना रोज घेण्यासाठी आयुर्वेदिक गोळ्या व काढा देण्यात आला. दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली...

पुढील सात दिवस आमच्यासाठी आव्हानात्मक होते. स्वतःची काळजी घेत रुग्णसेवा आम्हाला करायची होती.

सकाळी ७ वाजता रुग्णांच्या इमारतीजवळ हजर झालो. ८ वाजता रुग्णांना गरमागरम काढा द्यायचा, ९.३० वाजेपर्यंत सर्व रुग्णांना चहा व नाश्ता द्यायचा, मग स्वतः नाश्ता करायचा. रुग्णांच्या नातेवाइकांनी काही सामान दिले असेल तर ते त्यांच्यापर्यंत पोहोचवायचे, डॉक्टर आल्यावर त्यांच्यासोबत *पी.पी.ई कीट* घालून तपासणीसाठी जायचे, रुग्णांचे *ऑक्सिजन*, *पल्स*, तपासायचे. त्यावेळी आम्ही रुग्णांची चौकशी करायचो, त्यांना काय हवंय-नकोय, त्यांच्या समस्या, त्यांच्या शंकांचे निरसन करायचो. १२.३० वाजता रुग्णांचे जेवण यायचे. बाकी पूर्ण वेळसुद्धा रुग्णांचे *फोन* घेत राहायचं! त्यांच्या काही तक्रारी असतील किंवा काही अडचणी असतील तर त्यांचे समाधान करायचे. त्यांच्या मनोरंजनासाठी आम्ही भजने, अभंग, भक्तिगीते *स्पीकरवर* लावायचो. ही व अजून काही कामे करण्यात दुपारचे २.३० कधी वाजायचे कळायचेही नाही.

बाहेर आल्यावर आधी अंघोळ करायची व मगच आपापल्या निवासस्थानी जायचे, हा इथला नियम आम्ही स्वयंसेवकांनी तंतोतंत पाळला. परत आल्यावरही उत्साह तेवढाच असायचा. मग छोटी मोठी कामे करायची. आपली वैयक्तिक कामे असल्यास ती करायची. सायंकाळी ७.३० वाजता आढावा बैठक व्हायची. कोणाला काय अडचणी आल्या, अनुभव कसा होता, शंकांचे निरसन, गप्पा, छोटे खेळ व शेवटी प्रार्थनेने बैठक संपायची.

ह्या सर्व गोष्टी करण्यात मोठ्या सेवाभावी व्यक्तींचा सहवास लाभला, ही खूप महत्त्वाची गोष्ट होती. तिथले डॉक्टर आणि व्यवस्थेतील सर्वजण फक्त रुग्णांचीच नाही, तर आम्हा स्वयंसेवकांचीही घरच्यासारखी विचारपूस करत होते. सफाई कर्मचाऱ्यांपासून डॉक्टरांपर्यंत सगळे एकाच ऊर्जेने काम करत होते.

जेव्हा एका ठिकाणी बातम्या, टीव्ही व इतर माध्यमातून समाजातील विविध घटकांवर सतत आरोप लावले जात होते, त्याचवेळी अशा वातावरणात काम करून खूप प्रेरणा व विश्वास मिळाला. ही सर्व कामे आपण फक्त समाजकार्य किंवा आपल्याच *बायोडेटामध्ये* भर म्हणून न करता, कर्तव्य, सामाजिक बांधीलकी समजून करायला हवीत. जोपर्यंत अशी कार्ये समाजात घडत राहतील व आपल्यासारखे नागरिक त्यात योगदान देत राहतील तोवर कोणत्याही आपत्ती किंवा संकटांचा सामना करण्यासाठी आपण 'सक्षम' आणि 'आत्मनिर्भर' असू!

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**– मधुरा बापट**
madhurab66@gmail.com

देशाचा संसार माझे अंगावरी, असे थोडे तरी वाटू द्या। माझी कासाविसी याचसाठी।।
शुभेच्छुक – • श्री. विश्वास लिमये, सातारा • श्री. अरविंद मेढेकर, ठाणे • श्री. संजीव वाडीकर, सातारा

# कोरोना लॉकडाऊन काळात 'ज्ञान प्रबोधिनी'चे मदतकार्य

ज्याप्रमाणे सैन्यदल आणि प्रशासन कोणत्याही क्षणी आलेल्या कोणत्याही संकटाला सामोरं जायला तयार असते, तसेच ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते असतात; असे प्रबोधिनीच्या इतिहासातल्या अनेक उदाहरणांमधून नक्कीच म्हणता येईल.

त्यानुसार 'कोरोना संकटात आपण काय व कशी मदत करू शकतो,' याचा विचार प्रबोधिनीच्या सगळ्या केंद्रांमध्ये तसेच विभागांमध्ये केला गेला. **तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या पद्धती आत्मसात करत सगळ्या शाळा आणि शैक्षणिक उपक्रम सुरू होते.** 'शिक्षण हे फक्त चार भिंतींच्या वर्गातच घेता येते असे नाही, तर नियमित अभ्यासक्रमाबरोबर इतरही अनेक गोष्टी दूरस्थ राहून करू शकतो,' हे मुलांबरोबरच त्यांच्या पालकांच्यापण लक्षात आले.

गेली चार वर्षे पाणी प्रश्नावर काम करणाऱ्या **अंबाजोगाईच्या गटाने स्थलांतरित वाड्या-वस्त्यांवरील कुणी उपाशी राहणार नाही याची काळजी तर घेतलीच; पण त्याचबरोबर विविध वृद्ध, निराधार व्यक्तींच्या अडचणी सोडवल्या. हराळी, सोलापूर, वेल्हे, पुणे केंद्राने सगळीकडेच अगदी वस्त्या आणि वाड्यांवर अन्नधान्य पोहोचवले. सोलापूरला विडी कामगार महिलांसाठी नवीन रोजगार व आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.**

प्रबोधिनीतून प्रशासनात गेलेल्या अधिकारी वर्गाने त्यांच्या कार्यक्षेत्रात इतकी उत्तम कामगिरी केली की, माध्यमे आणि सरकार यांनी त्यांची दखल घेतली. **प्रज्ञा मानस संशोधिकेचे मानसतज्ज्ञ** त्यांचे कौशल्य वापरून या आपत्तीतही कुटुंबात चांगले वातावरण, सुसंवाद राहील याची काळजी घेत आहेत, पोलिसांना व अन्य गरजूंना समुपदेशन करत आहेत. अन्न-वस्त्र-निवारा याचबरोबर पुणे आणि सोलापूर युवक विभागाने गरज ओळखून मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन (अमेरिका) यांनी भारतातील वंचित घटकांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी 'इशरीप खपवळर' या अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उभारला व **अमेरिकेतील आरोग्य सेवेतील योद्ध्यांना कृतज्ञतापूर्वक खाद्यपदार्थांची पाकिटे दिली.**

**'छात्र प्रबोधन'ने 'ऐपावा'** (ऐका-पाहा-वाचा) आणि इंग्रजीत 'Reliview' (Read-Listen-View) **असे व्हॉट्स् ॲप गट तयार केले** आणि मुलांसाठी रोज विचार व कृतिप्रवर्तक साहित्य गटावर पाठवले गेले. **युवती विभागाने दूरस्थ पद्धतीने विविध कार्यशाळा आणि प्रशिक्षणे घेतली. स्त्री-शक्ती ग्रामीण महिला गटाने पुणे जिल्ह्यातील, वेल्हे तालुक्यातील दुर्गम भागात लक्षणीय काम केले. वाड्या वस्त्यांवर किराणा-धान्य पोहोचवणे, आरोग्य साक्षरता करणे व सुविधा पोहोचवणे, तसेच शेती मालाची शहरांमध्ये विक्री व्यवस्था करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक महिलांना सक्षम करणे इ. अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम हाती घेतले. डोंबिवली विस्तार केंद्राने नियमित उपक्रम दूरस्थ पद्धतीने केले आणि निधी संकलनावर भर दिला.** कुटुंबात कधी चांगल्या तर कधी अप्रिय गोष्टी घडतच असतात. या दोन्ही प्रसंगात **प्रबोधिनीचा पुरोहित वर्ग सगळे संस्कारविधी दूरस्थ पद्धतीने करण्यात कार्यरत होता.**

'कंटकातुनी वा फुलांतुनी, मार्ग शोधूनी आक्रमू आक्रमू' असा निश्चय करत कोरानाशी दोन हात करण्यासाठी अनेक स्तरावर प्रबोधिनीचे काम चालू आहे. (मदतकार्याची काही प्रकाशचित्रे मलपृष्ठावर पाहा.)


**सविस्तर वृत्त शेजारील क्यू आर कोड स्कॅन करून वाचा.**

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

अधिक जाणून घ्या : राष्ट्रीय वारसा स्थळे - सुंदरबन उद्यान - प. बंगाल.


शुभेच्छुक - • श्री. श्रीधर लोणकर, पुणे • श्री. एन. पी. पाटील, सातारा
• श्री. विक्रम चाफेकर, पुणे - छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा!

# ओळख वारली चित्रशैलीची



१- महालक्ष्मी माता मंदिर

**ठा**णे जिल्ह्यातील आदिवासी पाडे, डहाणू, विक्रमगढ, मोरवाडा, जव्हार, तलासरी आणि वसई पालघर या तालुक्यांत तुरळक वस्ती असलेली जमात म्हणजे वारली जमात. ते अगदी सहजपणे त्यांची संपूर्ण जीवनशैली या वारली चित्रशैलीतील चित्रांमध्ये रेखाटतात! त्यांचे रीतीरिवाज, सण, उत्सव, दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंग नकळत, हळूवारपणे त्यांच्या कुडाच्या भिंतींवर साकार होत जातात. शेणा-मातीनं सारवलेल्या कुडाच्या भिंतीवर तांदळाच्या पेजेनं रंगवण्याचा वारली जमातीचा आनंद अगदी पूर्वापारचा आहे. वारलीची झाडं, पानं, माणसं, शेती, घरं, प्राणी-पक्षी हे आपण नेहमी वेगवेगळ्या चित्रांमधून बघतोच. आज आपण बारलीमधील वेगळी प्रासंगिक चित्रे बघुयात.



२- पालघाट

**१. माता महालक्ष्मी –** माता महालक्ष्मी ही प्रथम देवता मानतात. तिची प्रत्येक स्वरूपात पूजा केली जाते जसे की धन्वंतरी (पृथ्वीमाता), गवतारी (गोमाता), कनसरी (धान्यांची माता), पालघाट (झाडे आणि लग्नाची माता). त्यांची अशी समजूत आहे की ऋतुचक्रीय वर्ष ही माता ठरवते.



३- सूर्यदेव

**२. पालघाट** (झाडे आणि लग्नाची माता)- पालघाट ही देवी म्हणजे निसर्गाचे उदार स्वरूप. झाडे, वनस्पती यांची प्रमुख देवता. जन्म आणि मृत्यू या अत्यंत प्रमुख गोष्टी पालघाट देवीच्या गर्भाशयात दडलेल्या आहेत अशी या वारली आदिवासींची समजूत आहे. या देवीच्या चित्रात दोन त्रिकोण आहेत, त्यातील वरील त्रिकोण पुरुष तत्त्व तर खालील त्रिकोण स्त्री तत्त्व दर्शवते. या देवीतून निर्मितीची ऊर्जा मिळते असे मानतात.



४- वाघदेव

**३. सूर्यदेव –** सूर्यदेवाचे चित्र हे पालघाट देवीच्या बाजूला चौकोनी मंडलात लग्नाच्या वेळी काढले जाते. सूर्यदेवाची प्रतिमा पंचमुखी आणि घोड्यावर स्वार अशी असते.

**४. वाघदेव / व्याघ्रदेव –** वाघदेवाला आदिवासी लोक पालनकर्ता समजतात. त्याची पूजा भाताच्या कापणीआधी केली जाते. वाघदेवतेचा उत्सव कार्तिक (नोव्हेंबर) महिन्यामध्ये साजरा होतो.

**५. वारलीचे देवदेवता –** ज्याप्रमाणे आपण सण-समारंभात, कोणत्याही शुभप्रसंगी प्रथम देवदेवतांचे स्मरण करतो, त्याचप्रमाणे वारली आदिवासींमध्ये सुद्धा सुरुवात देवांच्या चित्रांनीच करतात. सर्व देवांची चित्रे ही विपुल अलंकारांनी गुंतलेल्या चौकोनी मंडलात काढतात.



५

तुम्हीपण ही चित्रशैली आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.

**– मनाली भांडारे – पटवर्धन**

bhandare.manali@gmail.com

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

पाहा
**वैविध्यपूर्ण सुशोभने कशी कराल!**

## आयुर्वेद रसशाळेची दर्जेदार उत्पादने

सर्व केमिस्ट व
आयुर्वेदिक औषध विक्रेत्यांकडे उपलब्ध



**ब्राह्मीप्राश**
स्मरणशक्ती, ग्रहणशक्ती
वाढविते.
मज्जासंस्थेवर कार्यकारी,
आयुष्यवर्धक रसायन,
सर्व वयोगटांसाठी उपयुक्त.



**बालजीवन**
लहान मुलांना नेहमी द्यावे,
भुक वाढवते, पचन चांगले होते,
स्वास्थ्य टिकवणारे व
वाढवणारे.



**रक्तवर्धक**
अवलेह
ॲनिमिया, थकवा,
दौर्बल्य दूर करणारे,
शक्तिदायी टॉनिक.




**बालचतुर्भद्र**
सायरप
लहान मुलांमधील श्वसनसंस्थेचे
आजार (सुरवातीच्या अवस्थेत
देणे फार महत्वाचे),
पचनसंस्थेचे आजार, सर्दी,
ताप, घसादुखी, कणकण,
कोरडा खोकला या लक्षणांमध्ये
अत्यंत उपयोगी.

**आयुर्वेद रसशाळा फाऊंडेशन**
२५, आयुर्वेद रसशाळा चौक, कर्वे रोड, पुणे ४.
फोन : ०२०-२५४४०८९३/२५४४०७९६
WhatsApp number - 9158898382 Toll Free Number- 18001209727
Email id- marketing@ayurvedarasashala.com

मनमोहक, आकर्षक, रंगसंगती
कुटूंबातील प्रत्येकांना
एक वेगळा सुखद-आनंदमयी अनुभव,
अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त
भारतातील एकमेव वातानुकुलित पेंट शोरुम...



SINCE-1952
ग्राहकांचा विश्वास हेच आमचे यश...
**भारत पेंट कंपनी**
*a paint showroom*
बाळीवेस, टिळक चौक रोड, सोलापूर.
फोन : ०२१७-२३२६९३१/३२




*सण आहे दिव्यांचा*
*दूर करणाऱ्या अंधाराचा*
*एकच वर मागायचा*
*उजेड पडू दे ज्ञानाचा.*

**शुभ**
**दीपावली**

## सिद्धेश्वर लॅपटॉप / डेस्कटॉप
कर्ज योजना

- सुलभ EMI
- त्वरित मंजुरी
- व्याजदर फक्त १०%
- मुदत २४ महिने
- जामीनदाराची अट नाही



**मुलांच्या On line शिक्षणासाठी**
**Work From Home करणाऱ्यासाठी**

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

**सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर**

मुख्य कार्यालय - २०५, पूर्व मंगळवार पेठ,
कै. वि. गु. शिवदारे भवन,
पहिला मजला सोलापूर, फोन नं. २६२६८११, २७४२९१०

✽✽✽✽✽

श्री. प्रकाश संगप्पावाले,
चेअरमन

श्री. नरेंद्र महादेव गंभीरे,
व्हा. चेअरमन

श्री. राम बद्रीनारायण शर्मा,
सरव्यवस्थापक
व सर्व संचालक मंडळ

# LEARN CHINESE

*Critical time... Crucial language...*
*Learn it the **YINYANG** way.*

## **Chinese Language Batches** for All Age Groups & Professions

- 30 Hrs - Beginners Batches for All
- HSKK 1-3: Spoken Chinese
- YCT & Learning Activities for Kids
- Guidance for All Scholarships
- HSK 1-6 : Language Proficiency Exam
- Business Chinese for Professionals
- C-Pop Music & Chinese Movie Club
- Fun Learning Online Camps for Kids *(Age 4 - 14)*

**About YINYANG**

- Exclusive Chinese Language Teaching Institute
- Interactive Online / Offline sessions
- In-house library of Books & AV
- Coaching by experts with exposure to Chinese culture
- Genuine guidance for international certification
- 500+ students completed International Certifications
- Scholarship recipients in various Competitive examinations
- Students participated at the Jinhua HomeStay Project in China
- YinYang teachers sponsored for Teachers Training Programme at China
- In-house teachers training in Pune
- Chinese कट्टा : Live interactive sessions with Chinese Natives

**VIRTUAL CLASSES / ONLINE SESSIONS**

*Learn from Anywhere*



**Yashodhara Gadgil**
*Director, YIN YANG CCL*

- Certified language teacher by Govt of China
- Interpreter & Translator for many MNC / Corporate
- International Volunteer at Chinese Govt.'s Tourism Project
- Confucius Philosophy Learning Scholarship Recipient
- Author of Std. 11 & 12 HSC board Chinese language textbook, Balbharati


**• TEACHING & TRAINING • INTERPRETATION**
**• TRANSLATION • LANGUAGE CONSULTANCY**

m: 98220 89970 | e: yinyangpune@gmail.com

Follow us

**YINYANG**
Center for Chinese Language
Nalstop, Karve Road, Pune.


'रूप पालटू देशाचे' या ध्येयाच्या दिशेने शालेय व महाविद्यालयीन
युवक-युवतींसाठी नेतृत्व शिक्षणाचे उपक्रम योजणारी संघटना
- युवक व युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी.


www.paradisegroup.co.in
PARADISE GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
CREATING WORLD-CLASS LIFESTYLE
IN NAVI MUMBAI
LUXURY PROJECTS
KHARGHAR - Sai World Empire | Sai Mannat | Sai Crystals | Sai Moksh
Sai Miracle | Sai Solitaire | Sai Spring | Sai Wonder | Sai Jewel | Sai Pearls
ULWE - Sai Fortune | Sai Harmony | Sai Sapphire | Sai Ganga | Sai Sahil
TALOJA - Sai Riverdale | PANVEL - Sai World City
LONAVALA - Sai World Retreat
Corp. Off.: 1701, Satra Plaza, Plot No. 19 & 20, Sector - 19 D, Vashi, Navi Mumbai - 400 705
Tel.: 022 2783 1000 | Email: enquiry@paradisegroup.co.in
Follow us on

# उगवत्या सूर्याचा प्रदेश ‘अरुणाचल’

## सायकल दौरा







(लेख पान क्र. ८२ वर वाचा)

**TEAM NBC .. together everyone achievers miracles**

*We are specialized in*
*Residential projects Commercial Projects*
*Institutional Projects*
*Interior designers & Turnkey Projects*
*landscape & Infrastructure Development Projects*


N B C

**NARENDRA BAKALE**
**Constructions**

Let’s Make The World Happy


❖ BAKALE Group ❖ Narendra Bakale construtions ❖ R-EVOLUTION
❖ Shubhankar Enterprises ❖ G 9 Entertainment

1, Phulebaug, Opp BSNL Office, Shahu Collage Road, Parvati, Pune 411009
Tel:020-24421450, Fax-020-24420214, 9010 92848 Email::nbc@bakalegroup.com, www.bakle group.com


Best Compliments From
AKSHAR
Akshar Developers
Solution to all your quries is just call away.
Feel free to get in touch with us.
Registered Office Address:
O Wing Akshar Business Park, Sector 19 F,
Near APMC, Navi Mumbai 400 705
Call : + 91-22-2788 9991-98
Email : infor@akshardevelopers.com

# समर्पण...

– डॉ. संजय ढोले



कोरोना विषाणूने जगभर थैमान घातल्यावर त्यावर औषध किंवा लस शोधण्याचा आटोकाट प्रयत्न वेगवेगळ्या राष्ट्रातील अनेक शास्त्रज्ञ करत होते. भारतही त्याला अपवाद नव्हता.
डॉ. सेरा अशाच संशोधकांपैकी एक! देहभान विसरुन संशोधनात अहोरात्र त्या गढून गेल्या होत्या!
अचानक एक दिवस त्या कोरोना बाधित झाल्या. त्यांचा साहाय्यक प्रतीक हे कळताच सैरभैर झाला. आता त्याच्यापुढे एक आव्हान उभं होतं... कोणतं? त्याला तो कसा सामोरा जाणार होता... याची ही चित्तथरारक तरीही अतिशय उदात्त अशी ही विज्ञान कथा...!

कथा

''मॅडमऽऽ जरा प्रयोगशाळेत येता का?''
''काय झालंय प्रतीक?''
''तुम्ही जे औषध तयार केलंय, त्याच्या चाचणीत तो विषाणू *डिसइंटिग्रेट* होताना दिसतोय. आर.एन.ए, डी.एन.ए वेगळे होताना दिसत आहेत.'' प्रतीक सकारात्मक बोलत होता.

''काय म्हणतोस प्रतीक? एवढ्या लवकर हा परिणाम मला अपेक्षित नव्हता. इट्स अ गुड न्यूज.'' *मॅडम मास्क* व्यवस्थित करीत उठल्या आणि पुढे म्हणाल्या,''चल प्रतीक, बघूयात.''

दोघेही केबिनबाहेर पडले व प्रयोगशाळेकडे जाऊ लागले. डॉ. सेरा थॉमस विषाणू संस्थेतील मुख्य शास्त्रज्ञ आणि प्रतीक त्यांचा साहाय्यक!

प्रयोगशाळेत शिरताच डॉ. सेरा वेगाने ट्यूब लावलेल्या उपकरणाकडे झेपावल्या. त्यातील सूक्ष्मदर्शिकेचा आधार घेऊन त्यांनी अवलोकन करण्यास प्रारंभ केला. त्यातील विषाणूंची स्थिती पाहून त्यांचा चेहरा बदलला आणि त्या म्हणाल्या,

''औषधातील रसायनं बेमालूमपणे लागू होताना दिसत आहेत. हा खूपच आशादायी परिणाम आहे.'' उपकरणांतील विषाणूंकडे पाहातच डॉ. सेरा पुढे म्हणाल्या,

''आर.एन.ए, डी.एन.ए. जरी तुटत असले तरी विषाणूच्या मुख्य *लिपिड* आवरणाला छेद द्यायला उशीर होतो आहे. आपल्याला ती लिपिडची भिंत वेगानं फोडायची आहे. अजून मला वाटतं क्लोरोक्विनची मात्रा वाढवूयात; कारण त्यातील हायड्रोक्झिल निश्चितच कमाल करतील, असं मला वाटतं. यातील हायड्रोरॅडिकल अतिशय सशक्त असून, या विषाणूंवर जोरदार आघात करतील.''

प्रतीक माघारी वळला व अतिसूक्ष्म *सीरिंज स्वॅबमध्ये* क्लोरोक्विन घेऊन आला. डॉ. सेरांच्या हातात देत म्हणाला,

''*मॅडम*, नॅनोलिटर एवढी मात्रा आहे.''

''आण. पुरेशी होईल तेवढी,'' हातात घेत डॉ. सेरा म्हणाल्या.

डॉ. सेरानी शिताफीने ती मात्रा *ट्यूबमध्ये* टाकली आणि पुन्हा एकवार अवलोकन करून घेतलं.

''प्रतीक! मला वाटतं *ओव्हर दी नाईट* असंच राहू द्यावे. *आय होप टू सी अ गुड रिजल्ट अ‍ॅण्ड किल दिस ब्लडी व्हायरस.*'' डॉ. सेरांचा विषाणूवरील राग व्यक्त झाला होता.

प्रतीक म्हणाला,

''*मॅडम*, मी निरीक्षण करत राहीन आणि तुम्हाला कळवत राहीन.''

डॉ. सेरा प्रयोगशाळेबाहेर पडल्या आणि आपल्या *केबीनमध्ये* आल्या.

गेली आठ ते दहा वर्ष त्या मोठ्या हिरीरीने व जिद्दीने वेगवेगळ्या विषाणू व त्यांच्या लसींवर काम करीत होत्या. आज विषाणुशास्त्रातील त्यांचं नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर मानानं घेतलं जात होतं.

सगळ्यांत प्रथम चीनमध्ये वुहान शहरात या विषाणूने हाहाकार माजवला. या अज्ञात विषाणूचं 'कोरोना' असं नामकरण करून, जागतिक आरोग्य संघटनेने 'कोविड-१९' असं त्याला संबोधलं.

या विषाणूने युरोपातील प्रगत राष्ट्रे, अमेरिका आणि जगभरातल्या इतर अनेक देशांत शिरकाव केला. भारतातही कोरोनाने हळूच पाऊल टाकलं आणि त्याचा प्रसार वेगानं होऊ लागला. प्रशासनाने वेळीच उपाययोजना करून, सातत्याने भारताची टाळेबंदी सुरू ठेवली होती.

सर्व रस्ते, दुकाने, मॉल, शाळा... शुकशुकाट होता. अज्ञात शत्रू बाहेर वावरत असल्याने सर्वच घरात होते. कुणीही बाहेर पडत नव्हतं. सर्वच ठप्प असल्याने बहुसंख्य राष्ट्रे आर्थिक दिवाळखोरीच्या पायरीवर येऊन ठेपली होती.

कोरोनावर औषध किंवा लस शोधण्याचा आटोकाट प्रयत्न रात्रंदिवस प्रत्येक राष्ट्र करीत होते. युरोपातील प्रत्येक राष्ट्र, जपान, अमेरिका, चीन येथील शास्त्रज्ञ लस शोधण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत होते; पण अजूनही औषध सापडत नव्हतं.

भारतातही बहुसंख्य प्रयोगशाळा व कंपन्यांमध्ये औषधासाठी संशोधन सुरू होतं. पंतप्रधानांनी आघाडीच्या वीस विषाणुशास्त्रज्ञांच्या एका *टास्क फोर्सची* औषध निर्माण

श्रद्धांजली : पद्मविभूषण जॉर्ज फर्नांडीस - माजी संरक्षणमंत्री, मृत्यू : २९ जानेवारी २०२०.
शुभेच्छुक – • सौ. शिल्पा कुलकर्णी, पुणे • सौ. गायत्री ताविलदार, कोल्हापूर
• श्री. रमाकांत शिवनारायण भुतडा, पुणे

करण्यासाठी निवड केली होती. त्यामध्ये डॉ. सेरा थॉमस यांचं नाव आघाडीवर होतं. वेगवेगळ्या शक्यता व रसायनं वापरून डॉ. सेरा प्रयोग करीत होत्या व प्रतीकची त्यांना साथ मिळत होती.

डॉ. सेरानी या प्रयोगाला व कोरोनावरील औषध शोधण्याला स्वतःचं सर्वस्वच जणू समर्पित करून टाकलं होतं. घरी त्यांचा पती, नऊ महिन्यांचा मुलगा व सासूबाई होत्या; पण विषाणूंच्या संपर्कात नियमित काम असल्यामुळे गेले एक महिना डॉ. सेरा घरच्यांना भेटू शकल्या नव्हत्या. रात्री उशिरा त्या *पार्किंगमध्येच*, गाडीत झोपायच्या व सकाळी लवकर उठून संशोधनात गढून जायच्या. त्यांच्यामुळे घरच्यांना बाधा होऊ नये, म्हणून त्यांनी स्वतःला वेगळं ठेवलं होतं. खिडकीतूनच मुलाला डोळे भरून त्या बघून घेत असत. अशावेळी त्यांना गलबलून येत असे; कारण एका आईचं मन उफाळून येत असे; पण दुसऱ्याच क्षणाला सावरून त्या संशोधनाला तयार राहात असत. त्यांच्या आजूबाजूला सातत्याने कोरोना विषाणूचा वावर होता याची त्यांना जाणीव होती.

कोरोना विषाणूवरील प्रयोग सातत्याने रात्रंदिवस चालू होते. आजही प्रतीकसोबत त्यांनी काही प्रयोग केले. औषधे, त्यांची मात्रा व रसायनं बदलली आणि रात्रीपर्यंत त्या प्रयोग व निरीक्षणे करीत राहिल्या.

'लस शोधायचीच,' ही त्यांची जिद्द होती. आजच्या प्रयोगाने त्यांना दिलासा दिला होता. आता सुरू केलेला प्रयोग दिशा व टोक गाठेल, याची त्यांना शाश्वती होती. त्यांचा नुकताच डोळा लागला. तेवढ्यात *मोबाइल* वाजला.

''हं बोल प्रतीक.'' डॉ.सेरांचे डोळे जडावले होते.

''*मॅडम! सॉरी.* तुम्ही आताच गेलात; पण परत येऊ शकाल?''

''का रे? काही झालं का?''

''*मॅडम!* तुम्ही क्लोरोक्विनची दिलेली मात्रा लागू पडेल असं वाटतंय; कारण तिथं एकही विषाणू नाही.''

''काय? कसं शक्य आहे. त्याचे काहीच अवशेष नाहीत?'' डॉ. सेरा आश्चर्याने उद्गारल्या.

''होय! *मॅडम* म्हणूनच मी फोन केला.''




प्रत्येकाच्या विश्वासाचं,
कुटुंबातल्या प्रत्येकाचं
नेत्रारोग्य जपणारं
आयुर्वेदिक अंजन
WESTERN INDIA CHEMICAL CO
Jai KAJAL
जाई काजल
MUMBAI - 400066 INDIA
Jai KAJAL
डोळ्यांचे स्वास्थ्य बिघडू नये यासाठी
जाई काजळ वापरा. त्यामुळे डोळे
थंड व निरोगी राहून दृष्टी स्वच्छ होते
आणि डोळ्यांचा थकवा देखील जातो.
जाई काजळ
आयुर्वेदिक अंजन
लहान थोरांस सारखेच उपयुक्त.
वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी, बोरीवली (पूर्व), मुंबई 400066, फॅक्टरी – फोन (0250) 645 26 11

"बरं, मी निघालेच."

डॉ. सेरा लगेच तयार झाल्या आणि त्यांनी कार बाहेर काढली. आवाजाने त्यांचे पती खिडकीत आले. डॉ. सेरांनी फक्त त्यांना बघून हात उंचावला व प्रयोगशाळेत निघाल्या. यावेळी रात्रीचे दोन वाजले होते.

सर्व तयारीनिशी उपकरणात डोकावून सूक्ष्मदर्शिकेखाली ट्यूब पाहिली आणि आश्चर्याने त्या पाहातच राहिल्या. तेथे विषाणूचे कुठलेही अवशेष नव्हते. हे अतिशय कमी कालावधीत झालं होतं.

"प्रतीक! खरंच की!! फक्त एक औषध आणि विषाणूंचा संपूर्ण नायनाट!! आपण एक काम करू या," डॉ. सेरा उत्साहाने म्हणाल्या.

"काय *मॅडम?*"

"पडताळणीसाठी यात आपण पुन्हा कोट्यवधी कोरोना विषाणू टाकू आणि त्यांच्यावरील परिणाम बघूयात," डॉ. सेरा उत्तरल्या.

"*मॅडम!* एवढे?"

"होय! प्रतीक आपल्याला अब्जावधी कोरोना विषाणूंचा उपयोग करावाच लागेल; कारण या एवढ्या संख्येनेच खऱ्या अर्थाने तो संक्रमित होतो. आणि विषाणू फुफ्फुसाचा ताबा घेऊन ते निकामी करतो."

उपकरणात बघत त्या पुढे म्हणाल्या, "प्रतीक, जर का एवढ्या संख्येच्या विषाणूंचा नायनाट झाला, तरच आपलं हे औषध व त्याची मात्रा मानवासाठी लागू पडेल."

"काय म्हणताय *मॅडम!*"

"होय! बघूयात." डॉ. सेरा म्हणाल्या.

डॉ. सेरा उठल्या व निर्वात *कोल्ड स्टोरेजकडे* गेल्या. त्यातील एक *स्वॅब* शिताफीने बाहेर काढलं. त्यातील एका कणामध्ये लाखो कोरोना विषाणू असल्याने सेरा काळजीपूर्वक ते हाताळत होत्या. तशा त्या निष्णात होत्या. आतापर्यंत त्यांनी वेगवेगळे विषाणू हाताळले होते. नाकातील चिकट द्रव्यातून कोरोना विषाणू वेगळे करून, डॉ. सेराने खात्री करून घेतली. त्यातील फक्त नॅनोग्रॅम द्रव्य त्यांनी ट्यूबमध्ये टाकले. ज्यात अब्जावधी कोरोना विषाणू होते. स्वॅब पुन्हा जागेवर ठेवत डॉ. सेरा पुढे म्हणाल्या,

"प्रतीक! लेट *अस सी. व्हॉट विल हॅपन.* जर का औषधाने या सर्वच कोरोना विषाणूंचा नायनाट झाला तर, *इट मे बी अ ब्रेक थ्रू.*"

"*मॅडम, आय ऑल्सो होप दि सेम,*" तो पुढे विचार करत म्हणाला,

"*मॅडम!* एवढ्या कोरोना विषाणूंच्या संख्येची गरज काय होती? ही मोठीच जोखीम आहे."

"ती घ्यावीच लागेल प्रतीक. मी सांगते, कोरोना विषाणूचे वजन साधारण ०.८५ ऑटोग्रॅम (०.८५×१०$^{-१८}$ ग्रॅम) एवढे असून, साधारण सत्तर अब्ज कोरोना विषाणूंच्या एकाच वेळी झालेल्या आघाताने माणूस आजारी पडतो आणि याचे वजन ०.५ मायक्रोग्रॅम एवढे असते. विचार कर, जर आज दोन कोटी लोकं जगात बाधित असतील, तर त्याला फक्त एकूण दहा ग्रॅम वजनाचे कोरोना विषाणू कारणीभूत आहेत. म्हणून या विषाणूच्या समूळ नायनाटासाठीच मी हा प्रयोग करतेय," डॉ. सेरांनी अशातही प्रतीकला समजावून सांगितलं होतं.

एका तासानंतर डॉ. सेरांनी पुन्हा उपकरणात

पाहिलं आणि त्या आश्चर्याने पाहातच राहिल्या व म्हणाल्या,
''प्रतीक! जस्ट हॅव अ लूक.''

प्रतीक पाहाताच आश्चर्याने उद्गारला,

''*मॅडम!* अब्जावधी विषाणूंचा पत्ताच नाहीये. याचा अर्थ हे औषध लागू पडलंय. मॅडम, हे कसं शक्य झालं? मला सांगा ना!''

डॉ. सेरा त्याच्याकडे आश्वासक नजरेने पाहात म्हणाल्या,

''प्रतीक, तू स्वतः सूक्ष्मजीवशास्त्राचा विद्यार्थी आहेस. तुला जीवाणू व विषाणू माहीतच आहेत. आजपर्यंत जीवाणूंचे उत्पादन रोखण्यासाठी आपण अनेक प्रतिजैविके शोधू शकलो, जी मानवी पेशीसाठी विशेष धोकादायक नसतात. ती फक्त जीवाणूंच्या यंत्रणेवर हल्ला करून, त्यांना नष्ट करतात. विषाणूंकडे मात्र स्वतःचं पुनरुत्पादन करायला, स्वतःची अशी काहीही यंत्रणा नसते. माणसाच्या पेशीतील यंत्रणाच हे विषाणू वापरत असतात. त्यामुळे विषाणूंवर हल्ला करणारं एखादं औषध सापडलं, तरी ते मानवी पेशींसाठी धोकादायक देखील ठरू शकतं.''



प्रतीकने पदवीच्या अभ्यासात वाचलेलं त्याला आठवलं.

'विषाणू हे नुसते प्रथिने असतात. विषाणू हा तसा एक छोटासा *डी.एन.ए.* किंवा *आर.एन.ए.* असलेला एक कण असतो आणि त्यावर एक प्रथिनाचे संरक्षक आवरण असते. ते प्रथिनाचे आवरण किती मजबूत आहे किंवा विषाणू ज्या पेशीत जाणार आहे त्या पेशीशी ते किती मिळते-जुळते आहे; त्यावरून तो विषाणू त्या पेशीत संक्रमित होणार की नाही, ते ठरते. कुठल्याही पेशी आपल्या *डी.एन.ए.च्या कॉपी* तयार करतात. त्याचप्रमाणे विषाणू पेशीत शिरल्यानंतर डी. एन.ए. तेथील पदार्थ वापरून स्वतःच्या खूप प्रती तयार करतात. आणि प्रत्येक प्रत हा विषाणूचा कणच असल्याने, शरीरातील इतर पेशीत घुसून त्यांनाही मारतात. अशाप्रकारे अनेक पेशी बाधित होऊन संक्रमित होतात.'

भानावर येत प्रतीकनं विचारलं, ''मग या औषधाने नेमकं काय काम केलं, *मॅडम?*''

''या औषधाने खूप मोठं काम केलंय प्रतीक. बघ. विषाणूंची भरपूर संख्या झाली की, हे विषाणू पेशींची भिंत तोडून बाहेर येतात आणि बाजूच्या पेशींच्या *रिसेप्टर्सवर* जाऊन चिकटतात व त्यांना संक्रमित करतात. या कोणत्याही *स्टेपवर* औषध विषाणूला *ब्लॉक* करू शकते. औषधात अशी रसायनं आहेत की, एकतर जी विषाणूचं *रिसेप्टर्सशी बाँडिंग* होऊ देत नाहीत किंवा *डी.एन.ए.ला* रोखून प्रति *डी.एन.ए. स्ट्रेंड* बनवू देत नाहीत. अन्यथा विषाणूला भिंत तोडून आत येऊ देत नाहीत. आणि विषाणूचा *डी.एन.ए.*च बाद करून टाकतात,'' डॉ. सेरा म्हणाल्या.

''याचा अर्थ लस अशीच कार्यरत होतेय तर?'' प्रतीकचा प्रश्न.

''होय. आपल्या औषधानं नेमकं कोरोनाचं अंतरंगच म्हणजेच प्रथिने व *रिसेप्टर्स*

शोधून काढले आहेत आणि त्यांना अटकाव केला आहे. हे आताच्या परिणामानं सिद्ध झालं.''

डॉ. सेरा समाधानानं पुढे बोलल्या, ''प्रतीक, याची चाचणी आता लवकरात लवकर करायला हवी.''

''होय *मॅडम!* पण कशावर?''

''मानवावर!''

''कसं शक्य आहे *मॅडम?* कुठल्याही लसीची चाचणी आधी प्राण्यांवर व नंतर गटागटाने मानवावर केली जाते. त्याची उपयुक्तता तपासली जाते. मगच ती सर्वसमावेशक होते. सरळ मानवावर म्हणजे...?'' प्रतीक प्रश्नार्थक मुद्रेने म्हणाला.

''होय, आता पर्यायही नाही; कारण जगात या कोरोनाचा फैलाव गुणाकारात होतो आहे. जर वेगवेगळ्या चाचण्यांत वेळ घालवला तर अजून कोट्यवधी मानवांचे बळी जाणार आहेत. नाही प्रतीक, लवकरात लवकर काही मार्ग काढावाच लागेल.''

''पण कसा *मॅडम?* मला तरी सुचत नाहीये,'' प्रतीक न कळून म्हणाला.

डॉ. सेरा थोडा वेळ थांबल्या. त्यांनी उपकरणातील ट्यूबकडे पाहिलं. औषध सापडलं होतं; पण चाचणीसाठी विलंब होणार होता. एक दीर्घ श्वास घेत डॉ. सेरा म्हणाल्या,

''प्रतीक, एक सांगू! समजा, उद्या उठून मी कोरोनाबाधित झाले, तर या औषधाची चाचणी माझ्यावर घेशील?'' डॉ. सेरानी सरळ विचारलं.

''काय म्हणताय *मॅडम!* मी? कसं शक्य आहे? हा गुन्हा होईल *मॅडम.* मी असं करूच शकत नाही. तुमचा जीव धोक्यात घालू शकत नाही,'' प्रतीक आश्चर्याने नकार देत म्हणाला.

''मी जर बाधित झाले तर प्रतीक, तुला ते करावंच लागेल. मानवाच्या कल्याणासाठी.'' आणि माझ्या शोधलेल्या औषधावर माझा पूर्ण विश्वास आहे. ते मानवसृष्टी वाचवेल,'' डॉ. सेरा ठामपणे म्हणाल्या.

प्रतीक निरुत्तर झाला. तो काहीच बोलू शकला नाही.

डॉ. सेरांनी पुन्हा-पुन्हा प्रयोग करून पाहिले आणि खात्री करून घेतली. ते औषध प्रतीकसमोरच एका बाटलीत स्टोरेजमध्ये ठेऊन दिले.

सरळ मानवावरच औषधाची चाचणी घेणं हे नैतिकतेविरुद्ध होतं, हे डॉ. सेरांना ठाऊक होतं. त्यामुळे प्रतीक किती धाडस करेल, याविषयी त्या साशंक होत्या.

यावेळी पहाटेचे चार वाजले होते. डॉ. सेरांनी पुन्हा एकदा औषध व कोरोनाच्या स्वॅबकडे एकवार पाहिलं. मानवाचा कर्दनकाळ कोरोना स्वॅबमध्ये होता, तर कोरोनाचा कर्दनकाळ एका बाटलीत बंदिस्त होता. अंतर छोटसंच होतं; पण काळ खूप मोठा होता. हा काळच आता डॉ. सेरांना कमी करायचा होता. तसा त्यांनी निश्चय केला होता. आयुष्याच्या एका टोकावर येऊन त्या थांबल्या होत्या.

*कार पार्किंगमध्ये* आणताच, त्यांनी खिडकीत पाहिलं. अंधार होता. अजून कुणीही उठलेलं नव्हतं. पहाटेचे साडेचार वाजले होते. डॉ. सेरांनी थोडं अंग टाकलं. थोड्या वेळानंतर त्यांना पुन्हा संशोधन संस्थेकडे जायचं होतं.

सकाळी उठल्यावर डॉ. सेरा तयार झाल्या. त्या बाहेर रस्त्यावर आल्या आणि

अणुरेणूंची अगाध दुनिया, दृष्टीच्या पार। सूक्ष्म जीव, अदृश्य किरण हेही भवती फिरणार।।
शुभेच्छुक - • डॉ. सतीशचंद्र गोरे, पुणे • श्री. सुमेध फाटक, पुणे
• सौ. स्नेहल परब-एकंबीकर, पुणे

May the beauty of diwali fill your home with happiness.
And may the coming year provide you with all that bring you joy!
Happy Diwali!!

**Vinod Kulkarni**

• 98609 99133 • 94204 96242 • 97673 34536

*Vaccinate*

Shop No. 3, Build No. C, Utkarshanagar,
Gadital, HadapSar, Pune - 411 028, Ph.: 020 26991906

**PRABODHAN**

Avoid Electricity Board penal charges for low power factor by installing PRABODHAN make L.T. shunt capacitor.

PRABODHAN capacitors are available in three designs: MPP, MD, ALLPP- Impregnated with N-PCB oil.

PRABODHAN capacitors are tested and approved by CPRI, ERDA, Tariff advisory Committee and Electricity Boards - all over India.



**Seva Engineering Works Pvt. Ltd.**

**Post Box No. 822, Deccan Gymkhana, Pune - 411 004. Tel : 020-24450363, 25531347 Telefax : 020 - 24455344**

खिडकीकडे पाहिलं. तेथे पती, मुलगा, सासूबाई उभ्या होत्या. डॉ. सेरा यांचे पती व सासूबाई दोघांनी हात उंचावून त्यांना आश्वस्त केलं. मुलाकडे पाहून डॉ. सेरांचे डोळे भरून आले. ते त्यांनी हळूच टिपले.

निकराने त्या कारकडे वळल्या. त्यांची पावले जड झाली होती; पण त्याचवेळी कर्तव्य मात्र हाका देत होतं. त्यांनी कार काढली आणि त्यांनी मुलाला शेवटचंच पाहून घेतलं. आणि वेगाने त्या पुढे गेल्या. मुलाचा मलूल चेहरा मात्र अजूनही त्यांच्या डोळ्यांसमोर तरळत होता.

प्रयोगशाळेत आल्यावर नियमानुसार त्यांनी *पी.पी.ई. किट* चढवले. निर्वात *कोल्ड स्टोरेजमध्ये* आल्या. एक *स्वॅब* काढला. त्यातले दोन थेंब *सीरिंजमध्ये* घेतले आणि त्यांनी स्वतःच्या दंडाला टोचून घेतलं. डॉ. सेरांनी फार मोठी जोखीम पत्करली होती. त्यांनी विषाणूंचीच लस टोचून घेतली होती, तमाम मानवसृष्टीसाठी.

हळूच त्या त्यांच्या प्रयोगशाळेतील *केबिनमध्ये* आल्या आणि स्वतःला खुर्चीत झोकून दिलं. विज्ञानाच्या दृष्टीने त्यांनी खूप मोठं पाऊल टाकलं होतं. यावेळी त्यांच्या मुलाचा चेहरा त्यांच्या डोळ्यांपुढे तरळून गेला. खऱ्या अर्थानं डॉ. सेरा या 'कोरोनायोद्धा' झाल्या होत्या.

डॉ. सेरा कोरोनाबाधित झाल्याच्या बातमीनं राष्ट्रीय पातळीवर एकच कल्लोळ झाला. त्यांना दवाखान्यात भरती करण्यात आलं.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या बाधित होण्याचे पडसाद मोठ्या प्रमाणात समाज आणि विज्ञान क्षेत्रात उमटले. प्रसारमाध्यमांमध्ये उलट-सुलट चर्चा झडू लागल्या. डॉ. सेरांचं कुटुंब हवालदिल झालं. प्रतीक मात्र, क्षणभर सैरभर झाला; पण प्रसंग पाहून त्यानं स्वतःला सावरलं. *मॅडम* एवढी काळजी घेत होत्या, तर त्या बाधित होणं शक्य नव्हतं; पण त्या रात्रीचे त्यांचे शब्द आठवताच तो शहारला आणि त्यानं मनोमन डॉ. सेरांना सलाम ठोकला होता. मानवसृष्टीसाठी या विभूतीने स्वतःच्या कुटुंबाचाही विचार न करता कोरोना विषाणू टोचून घेतले होते.

आता मात्र प्रतीकपुढे आव्हान उभं राहिलं होतं. *मॅडमचे* शब्द तो खरे ठरवणार होता का?

डॉ. सेरांना कोरोनाचं चौथ्या टप्प्यातील संक्रमण झालेलं आढळताच, *डॉक्टर्सही* हवालदिल झाले होते. त्यांना एका वेगळ्या *वॉर्डमध्ये* ठेऊन *क्वारंटाईन* करण्यात आलं आणि *व्हेंटिलेटरवर* ठेवण्यात आलं. त्यांच्या फुप्फुसांची शक्ती दिवसेंदिवस कमी होत चालली होती. त्यांना भेटण्याची मुभा कुणालाही नव्हती. डॉक्टर्स अहोरात्र देखरेख करीत होते; पण दिवसेंदिवस प्रकृती ढासळतच जात होती.

शेवटच्या ग्लानीत डॉ. सेरांच्या डोळ्यापुढे त्यांच्या मुलाचा निरागस चेहरा येऊन जाताच, त्यांच्या डोळ्यांच्या कडांतून अश्रू ओघळू लागले होते.

इकडे प्रतीकने निश्चय केला. प्रयोगशाळेतून त्याने ती औषधाची बाटली काढली. *सीरिंजमध्ये* भरली. तो स्वतः *पी.पी.ई. किटने* पूर्ण सज्ज होता. संशोधक असल्याने त्याला *हॉस्पिटलमध्ये* वावरण्याची मुभा होती.

तिथं प्रतीकनं डॉ. सेरांना ज्या खोलीमध्ये वेगळं ठेवलं होतं, तेथे प्रवेश केला.

नवयुगाचे शतक मानवा, आता सुरू झाले रे। किती प्रश्न अन् किती समस्या, जाऊ त्यांना सामोरे।।
शुभेच्छुक - • डॉ. रवींद्र सेठिया, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• श्री. विनय गडीकर, पुणे

डॉ. सेरा व्हेंटिलेटरवर होत्या. त्यांची छाती वेगाने वरखाली होत होती. त्यांनीच शोधलेलं औषध प्रतीकला आता त्यांच्यावरच वापरायचं होतं. डॉ. सेरांचे शब्द अजूनही त्याच्या कानात घुमत होते.

तो खोलीत एकटाच होता. त्यानं आजूबाजूला पाहिलं. कुणीही नव्हतं. त्यानं हळूच *इंजेक्शन* काढलं. सुईच्या टोकाकडे त्यानं अखेरचं पाहून घेतलं. सेरांवर त्याचा पूर्ण विश्वास होता; पण परिस्थितीच विचित्र उद्भवली होती. त्यानं स्वतःला सावरलं आणि वेगाने त्यानं डॉ. सेरांच्या दंडातल्या नसेत इंजेक्शन रितं केलं आणि भावनाविवश होत म्हणाला,



''*मॅडमऽऽ*, मी माझा शब्द पाळला. मानवसृष्टीच्या भल्यासाठी उचललेल्या तुमच्या पावलावर माझा छोटासाच ठसा. *मॅडम*, परत या, तुम्ही परत या. घरी तुमचं लेकरू तुमची वाट पाहातंय आणि तमाम मानवसृष्टीही.''

प्रतीक स्वतःच बोलत उन्मळून पडला आणि ढसाढसा रडला. त्याने अश्रू पुसले आणि वेगाने बाहेर पडला. फार मोठी किंमत देऊन डॉ. सेरांनी साऱ्या मानवसृष्टीच्या भल्यासाठी प्रयोग केला होता. स्वतःच्या जिवाची बाजीच त्यांनी लावली होती.

डॉ. सेरा दुसऱ्या दिवशीपासून थोड्या-थोड्या पूर्ववत होऊ लागल्या. डॉ. सेरांना बरं होताना पाहताच *हॉस्पिटलमधील* समस्त *डॉक्टर्स* व *नर्सेस* आश्चर्यचकित झाले होते.

तिसऱ्या दिवशीच डॉ. सेरांना *डिस्चार्ज* देण्यात आला. त्यावेळी प्रतीक सोबत होता. त्या पूर्ण कोरोनामुक्त झाल्या होत्या. संशोधनाची पहिली महत्त्वाची पायरी डॉ. सेरांनी यशस्वीरित्या पार केली होती. आता वेगवेगळ्या गटात चाचण्या घेऊन औषधाची विश्वासार्हता सिद्ध करायची होती. डॉ. सेरांनी दाखवलेली समर्पणाची भावना व्यर्थ जाणार नाही, याची प्रतीकला खात्री होती...

खरंच, एखाद्या संशोधनामागे त्या-त्या शास्त्रज्ञांनी देहभान हरपून, जीवाची बाजी लावून केलेले कष्ट असतात, हे प्रतीकने साक्षात अनुभवलं होतं. डॉ. सेरांविषयीच्या आदराने आणि कृतज्ञतेने डोळ्यांत तरळलेले अश्रू पुसून प्रतीक मोठ्या जोमाने पुन्हा कामाला लागला...

**– डॉ. संजय ढोले**
भौतिकशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे 411007

**चित्रकार : राहुल देशपांडे**

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**ऐका : कथा – गारपीट**
**लेखक – किशोर पाटील**
**वाचनस्वर – अभिजीत जोंधळे**

**पाहा**
**मरीअप्पन या दिव्यांग खेळाडूचा थक्क करणारा संक्षिप्त जीवनप्रवास**

# सार-भात

– विजय जोरी






**शिमग्याच्या होळीचा दिवस होता तो! शाळेला सुट्टी होती. घरात सार-भात करायची लगबग सुरू झाली. ढणढणत्या चुलीवर सार उकळत होतं. साराचा खुमासदार, मसालेदार गंध नाकाला सुखवीत होता. आजचा सार-भात 'स्पेशल' होता... 'स्पेशल' माणसापर्यंत तो पोहोचवायचा होता... प्रसंग साधाच; पण आयुष्यभरासाठी जपून ठेवण्यासारखी एक हृद्य आठवण देणारा...**

नारायणगावला सबनीसांच्या शाळेत मी दहावीत शिकत होतो. १९८० सालची ही गोष्ट. अराणकेसर आमचे वर्गशिक्षक होते. ते गणित शिकवायचे. शिकवण्याची हातोटी तर उत्तमच होती त्यांच्याकडे; पण त्यांच्यात असं काही वेगळेपण होतं की, त्यामुळे ते अत्यंत विद्यार्थिप्रिय होते.

शिस्तप्रिय, करारी असूनही ते अतिशय सात्विक होते. न बोलता त्यांचा वचक वाटायचा. ना कधी त्यांच्या तोंडून अपशब्द यायचे, ना रागाने ते ओरडायचे! पण गणिताचा तास सुरू झाला की, संपेपर्यंत वर्ग अगदी चिडीचूप असायचा. विद्यार्थ्यांच्या मनात सरांविषयी आदरयुक्त भीती होती. त्यांचं वाणीचातुर्य, सहज संयमित बोलणं लाघवी होतं. सरांची प्रखर ज्ञानप्रचुरता, न्यायनिष्ठा, गणिताबरोबरच साहित्याचा अभ्यास यांमुळे आम्ही दिपून जायचो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली छान हस्तलिखित तयार करण्यासारख्या अनेक उपक्रमांत आम्ही रमून जायचो. माझ्यावर तर त्यांचा खूपच प्रभाव होता. त्यांच्या पारदर्शी, भारदस्त, ज्ञानसंपन्न

करूनी पराक्रम तुम्ही दिले, तेज नव्या युगाचे। झेप घेऊन पुढे चालले, संशोधक भारताचे।।
शुभेच्छुक – • सौ. पद्मजा पोटे, डोंबिवली • सौ. नंदिता वझे, पुणे
• श्री. सुशील मसलेकर, पुणे

व्यक्तिमत्त्वाच्या मी प्रेमातच होतो, म्हणा ना!

दहावीचं महत्त्वाचं वर्ष म्हणून त्या वर्षी मी गणितासाठी अराणके सरांकडे शिकवणीला जात होतो. सर शिकवणी घेत नव्हते कधी. मात्र, मुलांच्या आग्रहाखातर त्यांनी शिकवणी सुरू केली होती त्या वर्षी. दोघं पती-पत्नी सेवेत होते, पैशाची कमी नव्हती.

शिकवणीची फी जेमतेम होती, तरी माझी मात्र ऐपत नव्हती. सर म्हणायचे ''तुला जमेल तशी देत जा.'' दादा म्हणायचा, 'सरांचे पैसे ठिवायचे नाय.'

गणित शिकवता-शिकवता सर कधी अन्य संवादही करायचे आमच्याशी. कधी विनोद करून हसवायचे. कधी परिस्थितीची जाणीव करून देऊन अंतर्मुख करायचे. एकदा अशाच आमच्या गप्पा सुरू होत्या. संदर्भ काय होता त्या दिवशी ते नेमकं आठवत नाही; पण बोलता-बोलता सणासुदीचा, रीतीपरंपरांचा अन् पदार्थांचा विषय निघाला...

चर्चा छान रंगली होती. न राहवून सर म्हणाले, ''तुमच्या मराठी कुटुंबात पुरणपोळीसोबत जो सार-भात बनवतात ना; तो फार चवदार, स्वादिष्ट आणि रुचकर असतो. त्या तिखट, चमचमीत, मसालेदार साराचा भुरका काही औरच! खाल्लाय मी चारदोन वेळा; पण अलीकडे योग नाही आला. आमच्याकडे त्याला कटाची आमटी म्हणतात; पण तुमच्या सारासारखी सर नाही त्या आमटीला.''

विषय संपला, शिकवणी सुटली. सारी पोरं आपापल्या वाटेनं निघून गेली. मी दाराबाहेर संभ्रमावस्थेत उभा होतो. मला सरांशी काहीतरी बोलायचं होतं; पण कसं बोलायचं, ते कळत नव्हतं. तेवढ्यात जिन्याचा दरवाजा बंद करण्यासाठी येत असलेल्या सरांच्या हळुवार पावलांची चाहूल लागली आणि माझी तंद्री भंगली.

''काय रे जोरी? गेला का नाहीस अजून? घरी जायचं नाही का?'' सरांनीच संवादाला तोंड फोडलं.

''सर! थोडं बोलायचं होतं तुमच्याशी,'' भीतभीत मी उत्तरलो.

''फीबद्दल बोलायचंय का? मी म्हणालो ना, जमेल तशी दे म्हणून, काही काळजी करू नकोस,'' सर म्हणाले.

''ते नव्हतं बोलायचं सर.''

''मग काय बोलायचं होतं?''

''सर मी आत येऊन बोलू?''

''हं! बोल आता.''

''सर! माझी आई फार छान सार बनवते. तिनं बनवलेल्या साराचं नेहमीच कौतुक होत असतं आमच्या घरात! सर, तुम्हाला नक्की आवडेल माझ्या आईने बनवलेला सार-भात, चालेल ना सर तुम्हाला?''

''असं का विचारतोस?''

''माझी आई गरीब आहे ना! मग आमच्या घरचा सार-भात...''

माझं बोलणं मध्येच थांबवीत सर म्हणाले, ''अरे! चव तर सुगरणीच्या हातात असते, तिच्या पाककौशल्यात असते अन् गरिबीचं म्हणशील तर त्यापेक्षा तुझा भाव पुष्कळ मोठा आहे. एवढी सारी पोरं निघून गेली, तू मात्र थांबलास, त्यातच सारं आलं. आवडेल मला, बघू कधी योग येईल तर.''

अराणके बाईंचाही

श्रद्धांजली : पद्मश्री गोविंद स्वरूप - रेडिओ खगोल शास्त्रज्ञ, मृत्यू : ७ सप्टेंबर २०२०.

शुभेच्छुक - • सौ. अश्विनी दाबक, ठाणे • श्री. अनिल देशमुख, पुणे
• डॉ. बागेश्री देवकर, निगडी-पुणे

जीव होता माझ्यावर! त्याही म्हणाल्या,

''जोरी! मला विसरू नकोस म्हटलं, मलाही आवडेल तुझ्या घरचा सार-भात.''

बाईंच्या मध्यस्थीनं मला हायसं वाटलं.

शिमगा तोंडावर आला होता. ती माझ्यासाठी अनुपम संधी असणार होती. त्या विचारानं मी मनात बहरलो.

मी म्हणालो, ''सर! मी सार आणीन, भात बाईंना बनवायला सांगाल?''

''असं का?''

''आमचा राशनचा तांदूळ असतो ना!''

''बघू तरी कसा असतो राशनचा तांदूळ,'' सर म्हणाले.

''नको-नको सर!''

''बरं! तुला आवडेल तसं, पण इतक्यात घाई नको.''

''येतो सर,'' म्हणत मी सरांचा निरोप घेतला... माझ्या आनंदानं हिमालय सर केला होता. मी धावतच घरी आलो आणि ती सुवार्ता आईला सांगितली.

पुढे लवकरच तो सुयोग जुळून आला. शिमग्याच्या होळीचा दिवस होता तो. मी आईला ती सुवार्ता सांगितल्यापासून कधी एकदा भाऊच्या सरांना सार करून देईन, असं तिला झालं होतं. शाळेला सुट्टी होती त्या दिवशी. सणाचा दिवस असल्यामुळे आईदेखील आज घरीच होती. आईला आक्काची रोजचीच घरकामात मदत असायची. सकाळपासून सारवासारव, आवराआवर झाली होती. तिनं अर्धी-अधिक तयारी करून ठेवलेलीच होती. दुपारनंतर दोघी मायलेकी स्वयंपाकाला जुंपल्या. चूल पेटली, पुरणाचं आधण ठेवलं, मसाल्याची जुळवाजुळव झाली...



सरांना सार कशात द्यायचं, हा मोठा यक्षप्रश्न होता आमच्यासमोर. सरांच्या घराला आणि प्रतिष्ठेला शोभेल असं काहीच भांडं नव्हतं घरात. कुणाकडून एखादं भांडं आणणंही बरं वाटणार नव्हतं.

आईनं मात्र आमची चिंता दूर केली. कमरेची पिशवी काढली. सारी पिशवी झाडली. जी काही रक्कम निघाली,

तुझे मन तरी याहून काय सांगेल तुला। आनंदाचे गाणे गा, आयुष्याचा करून झुला।।

शुभेच्छुक - श्री. विजय निकम, पुणे • श्री. विवेक जोशी, पुणे • श्री. अमोल दांडेकर, सांगली

ती तिनं आक्काच्या हातात ठेवली.

मुलाच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासाठी तिनं सारी पिशवी रिती केली. म्हणाली, ''पितळेचा चांगला डबा आणा कडीचा, येईल कधी कामाला.''

आक्कानं रक्कम मोजली, जेमतेम डबा येईल एवढीच ती रक्कम होती.

आईच्याही आनंदाला पारावार नव्हता. 'उद्या काय परवड होणार,' हे माहीत असूनही पंधरा दिवसाच्या घरखर्चाची अन् बाजारच्या भांडवलाची रक्कम आईनं बिनदिक्कत देऊन टाकली.

पण बिन कल्हईच्या भांड्यात सार कसं द्यायचं असा प्रश्न आक्कानं काढला.

''काय व्हणार नाय एक दिसानं. डबा चांगला घासून काढला की झालं. जा लवकर, तुमी येस्तवर माझं सार व्हईल,'' आईनं वेळ मारून नेली.

मी अन् आक्कानं लक्ष्मण भांडीवाल्या मामाकडून अगदी आईनं सांगितला, तस्सा डबा शोधून आणला.

सांजेच्या दिवेलागणीला विरोबाच्या देवळापुढं लाकडं



अन् गवऱ्यांची ही रास जमली होती. पोरांनी होळी रचली. तेवढ्यात मुक्ताईच्या काळोबाच्या होळीचा विस्तव आला. पारंपरिक होळी पेटली. अवघी गल्ली गोळा झाली. 'होळी रे होळी, पुरणाची पोळी...' पोरांनी हे बोंबा मारल्या. होळीतले नारळ काढण्याच्या उचापती सुरू झाल्या. गरम-गरम खोबऱ्यानं पोरांची तोंडं भाजली.

त्या दिवशी माझं कशातच लक्ष लागत नव्हतं. मी फार अधीर झालो होतो. कधी एकदा मी सरांच्या घरी जातो, असं झालं होतं मला. ढणढणत्या चुलीवर सार उकळत होतं. मी चुलीला जाळ घालीत होतो. साराचा खुमासदार, मस्सालेदार गंध नाकाला सुखवीत होता.

आक्कानं डबा घासून चकाचक केला. पळीच्या मदतीनं आईनं सार डब्यात भरलं, झाकण लावलं अन् डबा माझ्या हाती दिला. कुरडई-पापडीच्या पिशवीसोबत चार सूचनाही दिल्या अन् डबा घेऊन मी निघालो. वाड्याच्या दारापर्यंत आक्का सोडवायला आली.

आमच्या पाटे आळीला लागूनच बामनाची आळी होती. फार अंतर नव्हतं. दोन-चार मिनिटांच्या अंतरावर सरांचं घर होतं. सार थंड होऊ द्यायचं नव्हतं. त्यामुळे किंवा त्या अधीरतेमुळे मी जरा झपाझप पावलं टाकीत होतो. 'सर काय म्हणतील' याचंही काहूर मनात होतं. तिसऱ्या मिनिटाला मी सरांच्या माडीसमोर पोहोचलो.

जिन्याचं दार उघडंच होतं. हातातला डबा सावरत हलक्या पावलांनी जिना चढून मी दाराची कडी वाजवली. सरांनीच दार उघडलं. आकस्मिक मला दारात पाहून सर अवाक झाले. माझ्या हातातला डबा पाहून ते स्तिमित झाले. अनपेक्षित घडत होतं सारं. मी असं अचानक न सांगता काही करीन अशी अपेक्षाही नव्हती सरांना.

''सर! आज होळी आहे ना! आईनं बनवलेला सार आणलंय तुमच्यासाठी.''

दोघा पती-पत्नींच्या

श्रद्धांजली : एस. पी. बालसुब्रमण्यम् - पार्श्वगायक, मृत्यू : २५ सप्टेंबर २०२०.

शुभेच्छुक - • सौ. स्मिता कुलकर्णी, पुणे • सौ. अंजली टेंबे, डोंबिवली • सौ. सुचेता वर्तक, डोंबिवली

चेहऱ्यावर हलकंसं हसू फुटलं. 'काय वेडा मुलगा आहे' म्हणत सरांनी प्रेमाने डोक्यावर हात ठेवला.

''कमालच केली बाई याने तर... काहीही न सांगता असं अचानक...'' म्हणत बाईंनी अलगद माझ्या हातातला डबा घेतला.

''सर, येतो मी'' म्हणून वळणार तर सर म्हणाले, ''अरे! जरा आत तर येशील की नाही.''

''नको सर! सार कसं झालं, तेवढं फक्त सांगा उद्या.''

दुसऱ्या दिवशी खाऊने भरलेला डबा माझ्या हाती ठेवत सरांनी तोंड भरून कौतुक केलं.

''व्वा! झक्कास झाला होता सार-भात...''

सरांच्या त्या कौतुकानं मी भरून पावलो होतो. गुरुंकडून नेहमीच घेतो आपण; पण त्या दिवशी मी गुरुंना काही देण्याचा आनंद माझ्या आईमुळे मला अनुभवता आला.

घटना छोटी आहे. वास्तव आहे. एक हृद्य आठवण आहे. आज सर आणि आई दोघंही नाहीत; पण होळीच्या निमित्ताने सार-भात खाताना नेहमीच त्यांची आठवण दाटून येते. त्या प्रसंगाने, त्या दिवसाने मला काय दिलं हे शब्दांच्या पलीकडचं आहे!

**कृष्णाकुमार ऊर्फ विजय जोरी**
vijaykumarjori@gmail.com
**चित्रकार : चित्रांजली**

**ऐका**
**ललित लेख**
**गरम चहाची कथा!**
**लेखक – मल्हार अरणकल्ले**

## हा.. हा... हा...



आगगाडीत दोन माणसे समोरासमोर बसली होती.
एक माणूस दुसऱ्याला म्हणाला, ''नाही म्हणजे मला ऐकू कमी येतं हे खरं आहे. पण ते इतकं कमी येत असेल याची मला कल्पना नव्हती. मी जवळ जवळ बहिराच झालो असं म्हणायला हरकत नाही. तुम्ही मघापासून माझ्याशी बोलताय पण मला एक शब्द ऐकू येत असेल तर शपथ.''
''नाही, मी बोलत नाहीए!...'' दुसरा पुढे होत म्हणाला, 'मी मघापासून च्युइंगम चघळतोय.'

Happy Diwali
Hydrolinks

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

# जिसके घर हो किर्लोस्कर
# उसके सर हो नो फिकर

किर्लोस्कर पम्पस् १२५ सालों का भरोसा

Kirloskar

Enriching Lives




AQUALIFT

Rising to new heights

Authorised Distributor

**AQUALIFT ENGINEERS & SOLUTIONS PVT. LTD.**

Register Office

Office No. 203-204, 'RENATA' Bldg. N.C. Phadke Chowk,
2145, Sadashiv Peth, Pune - 411030.
Ph.: 7620525245, 8888860754 • E-mail : alepumps2@gmail.com

Godown Address

Sr. No. 43/2/1, Krushnai Warehouses, Mantarwadi,
Urali Devachi, Tal. Haveli, Dist.- Pune - 412308

# रानामधली पोर



निळे-सावळे आभाळ
अन् काळीसावळी माती
काळ्यासावळ्या मातीवरती
हिरवीपिवळी शेती
हिरव्या-पिवळ्या शेतामधून
मंजुळ पाखरगाणी
पाखरगाणी त्यात आणि
झिरमिर पाऊसपाणी
झिरमिर पावसासंगे आले
तांबुस ओले ऊन
टुणटुण उड्या मारत सुटले
नव्या गवतामधून

गवतामध्ये शिरला एक
नाचण भिंगरा मोर
मोरासंगे नाचू लागली
रानामधली पोर!

– डॉ. संगीता बर्वे
९१ ए, स्नेहल बाग,
तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती, पुणे - ९

वाचा : कविता
दिव्यांचा उत्सव
कवी : प्रसाद कुलकर्णी

कविता



चित्रकार : चित्रांजली

वाचा : व्यक्तीपरिचय
शास्त्रज्ञ मेघनाद साहा
ले. नीलिमा करमरकर

# जंगलाचं देणं

मोहफुलांचा उत्सव बघुनी
पाचोळाही गहिवरला
वाऱ्याच्या पाठीवर बसुनी
आनंदाने उंच उडाला ।।१।।

कुठे कुसुंबी पानावरती
सान पाऊले अवतरली
कुठे निशेच्या पदरावरती
चांदणमाला चमचमली ।।२।।

ऊन-ऊन वारा वाही
वेड्या पळसाचे गाणे
दोन करांनी घ्यावे कैसे
हे जंगलाचे देणे ।।३।।

इथे तळ्याच्या काठावरती
पाणपाखरे कशी थबकली
ओढ अनामिक वाटे त्यांना
उगा अंबरी भिरभिरली ।।४।।

रात्र कशीही सरते अन्
सांजसकाळी पळती वेळा
विशाल कासव ठाण मांडते
सूर्य ओकतो ज्वाळा ।।५।।

देवझऱ्याच्या काठावरती
पाखरशाळा अलोट भरली
साळुकबाईने पिसे भिजवता
वनमुनियाची अंघोळ झाली ।।६।।

कोण कशाला कुठे थांबतो
वाट चालती निमूट सारे
मरण आजचे घेऊन येईल
नवजन्माचे गोड धुमारे! ।।७।।

– किरण पुरंदरे,
६२/अ प्रशांत, एरंडवन,
म्हात्रे पुलाजवळ, पुणे - ४

चित्रकार : राहुल देशपांडे



अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

BREAD SMITH

# दिवेकर बेकर्स प्रा. लि., सोलापूर

**श्री. अमोल दिवेकर मोबाईल नं. ९८२२८७०९०४**

**श्री. समीर दिवेकर मोबाईल नं. ९८५०५०३१३१**

**पावांचे प्रकार :** स्पेशल पावभाजीचे पाव, सँडवीच ब्रेड, स्पेशल ब्राऊन आणि मल्टीग्रेन ब्रेड, बर्गर पाव, पिझ्झा बेस, मस्का टोस्ट, मावा टोस्ट, सुजी टोस्ट, घी टोस्ट, जीरा बटर, मस्का बटर, नमकिन बटर, पिळ खारी, मस्का खारी, मेथी खारी, स्पेशल खारी, वाटी केक, स्लाईस केक, गोल केक, व्हेज केक,क्रिम रोल इत्यादी. स्पेशल व्हरायटी मिळेल.

**तसेच बिस्टिकांचे प्रकार :** गोडी बिस्किट, फ्रुट बिस्किट, नानकटाई, पायनापल बिस्किट, सुजबेरी बिस्किट, कणिक बिस्किट, बोर्नव्हिटा बिस्किट, रोट, पिस्तरी इतर बिस्किटांचे प्रकार मिळतील.

**फॅक्टरी – प्लॉट नं. डी १३, चिंचोली,**
**एम.आय.डी.सी., सोलापूर**
**ऑफिस – द्वारा दिवेकर बेकरी, २००/१,**
**दक्षिण सदर बझार, सोलापूर – ४१३ ००३**
email:divekarbaker.pvtltd@gmail.com

दी पा व ली च्या हा र्दि क शु भे च्छा

जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : नागर शैली - उंच एका रेषेत निमुळती होत जाणारी शिखरं - लिंगराज मंदिर, भुवनेश्वर.

'छात्र प्रबोधन'ची वाटचाल गतिमान होण्यासाठी शुभेच्छा!

# आजची ज्ञान प्रबोधिनी

## शके १९४२ (इ. स. २०२०)

**केंद्रे** – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी
**उपकेंद्रे** – शिवापूर, वेल्हे, शिरवळ, साळुंब्रे
**विस्तार केंद्रे** – अंबाजोगाई, डोंबिवली, बोरीवली
**उपक्रम केंद्रे** – आंबवणे, चिखली (जि. पुणे)
**कार्यक्षेत्रे** – शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता

### १. शिक्षण

१. **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**संकेतस्थळ :** prashala.jnanaprabodhini.org

२. **ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल)
**संकेतस्थळ :** jnanaprabodhininigadi.org

३. **ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

४. **शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

५. **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** (माध्यमिक, सहनिवास)

६. **ज्ञान प्रबोधिनी, हराळी** (माध्यमिक, सहनिवास)
**संकेतस्थळ :** jpharali.org

७. **कृषितंत्र पदविका विद्यालय, हराळी**

८. **शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे**
(बुद्धिमत्ता संवर्धन, शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक साधन केंद्र)
**संकेतस्थळ :** jpearc.org

९. **छात्र प्रबोधन, पुणे** (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
**संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org

१०. **पूरक शिक्षण प्रकल्प – पुणे, डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, हराळी**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

### २. संशोधन

१. **प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे**
(संशोधन, प्रशिक्षण, बुद्धीमापन, संवर्धन, समुपदेशन)
**संकेतस्थळ :** jpip.org

२. **संस्कृत संस्कृती संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, व्याख्याने, अभ्यासगट)
**संकेतस्थळ :** santrika.org

प्रबोधिनीची माहिती देणारी संक्षिप्त चित्रफीत

### ३. ग्रामविकसन

१. **नैसर्गिक संसाधने – गुंजवणी खोरे, हराळी**
(पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

२. **स्त्री शक्ती प्रबोधन–शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती-महिला विकास, स्वयंरोजगार)

३. **तांत्रिक प्रशिक्षण केंद्र – शिवापूर, साळुंब्रे**

४. **सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

### ४. आरोग्य

१. **दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**
**संकेतस्थळ :** dmhospital.org

२. **नेत्र रुग्णालय, शिरवळ**

### ५. नेतृत्व संवर्धन

१. **युवक विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**

२. **युवती विभाग – पुणे, निगडी, सोलापूर**

३. **नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे** (प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)

४. **स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

### ६. स्त्री शक्ती प्रबोधन

**संवादिनी – पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर**
(समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम इ.)

### ७. राष्ट्रीय एकात्मता

१. **नागरी वस्ती अभ्यास व सल्ला मार्गदर्शन केंद्र, पुणे**

२. **ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)

३. **ज्ञानसेतू प्रकल्प**
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू आणि काश्मिर)

### ८. सामाजिक उद्योजकता

१. **उद्योजकता विकास कक्ष, पुणे**

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

**मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३० ☎ ०२०-२४२०७००० संकेतस्थळ :** jnanaprabodhini.org

दीपावलीचे स्वागत करूया। भावबंध हे दृढ करूया ॥
शुभेच्छुक – • श्री. भालचंद्र देव, बदलापूर • श्री. शरद गद्रे, डोंबिवली
• एक हितचिंतक, डोंबिवली – कै. विमल विनायक खरे, स्मरणार्थ.

## उगवत्या सूर्याचा प्रदेश

# 'अरुणाचल'

## सायकल दौरा

– तेजस कुलकर्णी

**मा.** कै. पोंक्षेसरांचे लाडके राज्य 'अरुणाचल प्रदेश,' उगवत्या सूर्याचा प्रदेश!! पश्चिमेस भूतान सीमेजवळच्या तवांगपासून ते पूर्वेस म्यानमारजवळच्या वॉलाँगपर्यंत पसरलेले, चीन बरोबर सुमारे १००० किमी लांबीची सीमा असल्यामुळे; सामरिक आणि राजनैतिक दृष्ट्या पूर्वोत्तर राज्यांमधील हे एक महत्त्वाचे राज्य!

तेथील 'विवेकानंद केंद्रा'च्या शाळेत शिकवायला म्हणून सुमारे ३० वर्षांपूर्वी सर पहिल्यांदा तेथे गेले आणि तिकडचेच झाले. अरुणाचलमधून पुण्यात आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना तर, सर हे हक्काचे पालक झाले. शेवटपर्यंत सर अरुणाचलशी जोडलेले राहिले.

या दौऱ्यात तेथील लोक, त्यांचे राहणीमान, त्यांचे जीवन जवळून बघता यावे, तसेच सगळा रम्य प्रदेश रममाण होऊन बघता



यावा; म्हणून हा दौरा सायकलने करू या असा आग्रह धरला.

प्रबोधिनीतील १२ जणांचा गट तयार झाला. आणि नियोजन सुरू झाले. पूर्व अरुणाचलमध्ये रोइंग - तेझु - नामसाई असा ३५० किमीचा प्रवास सायकलने करायचे आम्ही ठरवले. सकाळी ७ ते ११ सायकल प्रवास! मग विश्रांती व नंतर दुपारी ३ ते ५ मध्ये भटकंती, भेटी-गाठी असा दिनक्रम असे. रोज साधारण ६०-७० किमी अंतर आम्ही कापत असू. प्रत्यक्ष दौऱ्यामध्ये रोइंगमधील श्री. विजयजी स्वामी यांचे मार्गदर्शन आम्हाला सतत लाभत होते. त्यांच्यामुळेच आम्हाला अनेक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना भेटता आले. अनेक संस्थांना भेटी देता आल्या.

दौऱ्याची सुरुवात आम्ही केली, दिब्रुगढ पासून सुमारे १०० किमी वर असलेल्या ढोला गावापासून. येथे भारतातील लांबीने सर्वात मोठ्या असणाऱ्या (लांबी ९ किमी) पुलावरून आम्ही महाकाय ब्रह्मपुत्रा नदी ओलांडली. येथे आमचे पूर्व अरुणाचलमधील सदिया या गावात आगमन झाले. सर्वप्रथम, आम्ही सदिया येथील 'विवेकानंद केंद्र' विद्यालयास भेट दिली. 'मनुष्य घडणीतून राष्ट्रउभारणी' या तत्त्वज्ञानाला अनुसरून विवेकानंद केंद्र, अरुणाचल प्रदेशमध्ये ४० शाळा चालवते. त्यातील विद्यार्थ्यांना शाळा मोफत शिक्षण, भोजन देते. देशभरातून तेथे आलेल्या तळमळीच्या अध्यापकांशी बोलणे, हा आमच्यासाठी प्रेरणादायी अनुभव होता.

**ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत शिकत असताना मा. विवेकराव पोंक्षे हे आमचे प्राचार्य! आम्हा सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी अपार जिव्हाळा, आपुलकी, आदर असं खूप काही...! दुर्दैवाने २०१९ मध्ये त्यांचे निधन झाले. अरुणाचल मध्ये त्यांनी खूप सेवाभावी वृत्तीने काम केले होते. त्यांना आदरांजली म्हणून आम्ही अरुणाचल सायकल दौरा आयोजिला होता. त्या दौऱ्याचा हा एक मागोवा!**

*The best preparation for Tomorrow is doing your best Today.*

**IDEAL GAS SPRINGS PVT. LTD.**

Plot No. E-3/3, Old MIDC, Satara, Cotact-02162 244294
Email-igspl@sancharnet.in response@idealgassprings.com

जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : द्राविड शैली - मंदिरांच्या शिखरांचे मूळ वैशिष्ट्य म्हणजे एकावर एक मजले ठेवल्याप्रमाणे उंच असणारे बांधकाम आणि मोठ्या तटबंदीच्या आत असणारे मंदिर (गोपूर) - मीनाक्षी मंदिर, मदुराई

तेथून आम्ही प्रयाण केले ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या दिबांग नदीवरील अत्यंत रमणीय गाव - रोइंगसाठी. रोइंगमध्ये श्री विजय स्वामी हे कर्मयोगी RIW-ATCH नावाची संस्था चालवतात. 'अरुणाचलमधील प्राचीन परंपरा, प्राचीन बौद्ध दस्तऐवज यांचे जतन व्हायला पाहिजे' ह्या ध्यासाने विजयजींनी ही संस्था स्थापन केली. संस्थेच्या आवारातील संग्रहालयात अरुणाचल संस्कृतीची तोंडओळख सुरेख पद्धतीने होते. संस्थेच्या प्रांगणामध्ये, स्थानिक नृत्यप्रकार, जैव विविधता आणि शूर-वीरांची कथा सांगणारे एक कायमस्वरूपी भित्ती प्रदर्शन तयार करण्यात आले आहे. कै. विवेकराव पोंक्षेसरांच्या कार्याला आदरांजली म्हणून त्याचे नामकरण 'विवेक गॅलरी' असे करण्यात आले आहे. तसेच आपल्या सर्वांना कार्याची प्रेरणा देत राहील असा 'विवेक वृक्ष' येथे लावण्यात आला आहे.

स्थानिक औषधी झाडांचे संवर्धन करून त्यांपासून तयार करता येणाऱ्या पारंपरिक औषधांचे संशोधनसुद्धा या आवारात चालते. अरुणाचलातील भाषांना लिपी नाही. त्यामुळे लिखित स्वरूपात, पोथी रूपात भाषा जतन करणे शक्य नाही. 'ध्वनिमुद्रित' स्वरूपात ती जतन करण्याचा स्तुत्य उपक्रम येथे केला जातो. अशा ध्वनिमुद्रणांचा मोठा संग्रह येथे तयार झाला आहे.

कोणत्याही प्रदेशातील संस्कृतीचा मुख्य भाग म्हणजे तेथील 'खान-पान.' श्री स्वामी यांच्या मदतीने, अरुणाचलातील विविध जमातींमधील एक प्रमुख अशा 'इदू' जमातीचे स्थानिक जेवण चाखायची संधी आम्हाला मिळाली. रोइंगमध्ये आमची बऱ्याच इदू लोकांशी गाठभेट झाली. या संस्कृतीमध्ये चोरी-मारी नाही, संपूर्ण भागामध्ये अगदी रात्रीसुद्धा येथील स्त्री निश्चिंतपणे फिरू शकते. वैमनस्यातून गुन्हा घडला, तरी तो मान्य करून, होईल ती शिक्षा घेण्याची - खरेपणाची परंपरा इथे आहे. परंतु वीज, दूरदर्शन, 4G इंटरनेट यांच्या अत्यंत वेगाने झालेल्या आगमनामुळे बाह्य सांस्कृतिक आक्रमणे येथे होत आहेत. यामुळे 'आपली मूळ संस्कृती बिघडेल' अशी येथील थोरामोठ्यांची व्यथा आहे.

अरुणाचलच्या या भागात लाल पांडा, हुलोक गिब्बोन असे अत्यंत दुर्मीळ पशू आढळतात. वृक्षतोड, जंगल नाश यांच्यापासून वेळीच या प्राण्यांचे सरंक्षण करणे तातडीचे झाले आहे; पण चांगली गोष्ट म्हणजे कोणत्याही सरकारी मदती शिवाय, (सरकारी विकास प्रकल्पांचा विरोध सहन करीत,) हे अवघड काम स्थानिक पातळीवर आता चालू झाले आहे. वर उल्लेखिलेल्या हुलोक गिब्बोन वानरांच्या प्रजातीला नामशेष होण्यापासून वाचविणाऱ्या श्री ईपरा मेकोला यांची भेट आम्ही येथे घेतली. 'आंधळ्या विकासाची किंमत काय असते आणि शाश्वत विकास किती गरजेचा आहे,' यावर विचार करायला लावणारी चर्चा त्यांच्याबरोबर झाली.

रोइंगहून पुढे तेझु नावाच्या गावी आम्ही तिबेटी निर्वासित कॅम्पला भेट दिली. इथे या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊ या. १९५९ मध्ये माओच्या चीनने तिबेटवर आक्रमण केले. तेव्हा दलाई लामा व त्यांच्या बौद्ध अनुयायांना तिबेट सोडावा लागला. सुमारे १ लाख तिबेटी बौद्ध अत्यंत खडतर प्रवास करून हिमालय पार करून भारतात आश्रयास आले. असे सुमारे २ वर्ष चालू होते. लडाख, सिक्कीम, हिमाचल प्रदेश आणि अरुणाचल मध्ये हे तिबेटी बौद्ध निर्वासित येऊन राहिले. ते साम्यवादी सत्ता असलेल्या चीनमध्ये परत जाऊ शकले नाहीत; पण भारताने त्यांना त्यांचे स्वातंत्र्य राखत आश्रय दिला. स्थानिक लोकांनी त्यांना सामावून घेतले. या सर्व गोष्टींसाठी ते भारताचे आजन्म उपकृत आहेत, असे ते आवर्जून सांगतात. आज ६० वर्षे झाली, तिसऱ्या पिढीने स्वतंत्र तिबेट मध्ये त्यांना परत जाता येईल, ही आशा सोडून दिली आहे. ते आता पूर्णपणे भारतीय झाले आहेत.

आमच्या या सर्व मार्गावर, पूर्ण वेळ आम्हास साथ होती, ती भारतीय सेनेच्या ताफ्यांची. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमधील सीमावर्ती ठाण्याहून येत जात असणाऱ्या भारतीय जवानांना आम्ही भेटलो.

सीमेवरील गस्त, तेथील

कर्तव्य, ज्ञान, श्रद्धा, ठेवा यशस्वीतेचा। चक्रास जोडला आहे, नित वेग उन्नतीचा।।

शुभेच्छुक - • श्री. प्रभाकर मोडक, नागाव-अलिबाग • श्री. सुहास चौगुले, पुणे • सौ. मीनल वैशंपायन, नागाव, अलिबाग

खडतर प्रदेशरचनेवर मात करणे, पायाभूत सुविधा तयार करण्यात येणारे अडथळे व त्यावर केलेली मात यांचे अनेक अनुभव या निमित्ताने ऐकण्यास मिळाले. ते ऐकताना अभिमानाने आमचा ऊर भरून आला. अरुणाचलला निसर्गाने भरभरून दिले आहे. हिमालयाची हिमशिखरे, रस्त्याच्या एका बाजूला सतत वाहाणारी नदी, स्वच्छ ताजी हवा, नीतळ पाणी जणू काही नंदनवनच!

गेल्या काही वर्षांमध्ये सरकारने धोरणात्मक बदल करून सीमेपर्यंत रस्त्यांचे जाळे तयार केले आहे. एवढ्या गुळगुळीत रस्त्यावर सायकल चालवायचे सुख आपल्याला महाराष्ट्रातही मिळत नाही. ज्या ठिकाणी पूर्वी होडीतून गाडी नदी पलीकडे न्यावी लागे. त्या ठिकाणी आता प्रचंड मोठे आणि टिकाऊ पूल उभे केले आहेत. जे अंतर जायला पूर्वी एक दिवस लागत असे, ती अंतरे आता ४-५ तासात पार होत आहेत. या पायाभूत सुविधांमुळे 'अरुणाचल' आपल्या जवळ आला आहे. पूर्वोत्तर राज्ये त्यांच्या दुर्गम अशा भूगोलामुळे आपल्यापासून दुरावली गेली होती, असे वाटते; पण आता बऱ्याच सुविधा तेथे पोहोचत आहेत. भौगोलिक अंतरे कमी झाली आहेत. पुणे / मुंबई पासून ४-६ तासात विमानाने 'अरुणाचल'मध्ये पोहोचणे आता सहज शक्य आहे.

आता गरज आहे, ती तेथे जाऊन संवाद साधायची, मानसिक दरी दूर करण्याची! सध्याच्या चीनच्या वाढत्या साम्राज्यवादी वर्तनाला तोंड देताना, सीमावर्ती सर्व राज्यांतील आपल्या लोकांशी नाते घट्ट करणे, हे आणखीनच महत्त्वाचे झाले आहे. अनेक सेवाभावी व्यक्ती, संस्था यासाठी झटत आहेत. शक्य झाले तर अशा संस्थांना आपण कार्यरूपी/अर्थरूपी मदत नक्की करूया. आपल्या पूर्वोत्तर राज्यांना, आपणांस योग्य वाटेल, रुचेल, पचेल अशा पद्धतीने परंतु जबाबदारीने भेट देऊ या. पूर्वोत्तर नक्की फिरूया!

**– तेजस कुलकर्णी**
tejas.k24@gmail.com

(लेखाची प्रकाशचित्रे पान क्र. ६१ वर पाहा.)

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

"By failing to prepare, you are preparing to fail."
Benjamin Franklin

**Autotec Industries**

GAT No. 1203, Vadki, Pune-Saswad Rd.,
Pune - 412308, Mob.: 9422003907
email: autotecpune@yahoo.co.in

May you get the gift of wisdom, real wealth and knowledge this Diwali and always!

**Print-O-Tech Engineers**
(ISO 9001 COMPANY)

Survey No. 29, Mantri park,
Shop No 16,17, Near Natraj Gas, Kothrud,
Pune - 411 029, Tel : 25384374
Email : paradkaruday@yahoo.co.in
paneha@gmail.com

जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : भूमिज शैली - शिखरावर वेलीप्रमाणे वर सरळ एका रेषेत जाणारी आणि अनेक छोट्या शिखरांची रांग - सेवाडीचे जैन मंदिर, राजस्थान

'ज्ञान प्रबोधिनी'च्या शैक्षणिक व संघटनात्मक विस्तारकार्यासाठी शुभेच्छा !

(पान क्र. १२ वरून कथा पुढे चालू)

# सारेगम डोरेमिफा



राजपुत्र म्हणाला, ''ती तर सगळ्याच राजपुत्रांना येते; पण मला करायला आवडत नाही.'' सानेईला राग आला. हा तर खोटं बोलणारा राजपुत्र! ती रागाने म्हणाली, ''तू तर राजपुत्र लढाईखोर राज्याचा. तुला लढाई आवडत नाही? आमच्या राज्यावर तुम्ही केल्यात शंभरदा स्वाऱ्या! तरी म्हणतोस, लढाई आवडत नाही?''

राजपुत्र बघतच राहिला. सानेई म्हणाली रागाने, ''मी राजकन्या सानेई. सुवर्णद्वीपाची राजकन्या!'' राजपुत्र एकदम थबकला. एक मोठ्ठा श्वास घेत म्हणाला सानेईकडे बघत, ''तुला खरं वाटणार नाही; पण मला लढाई आवडत नाही. ती तर एक मोठ्ठी गोष्ट. गोष्ट; पण आनंदाची नाही! खूप दिवस मनातल्या–मनात खोल लपवून ठेवलेली. खूप–खूप सांगावीशी वाटली; पण कुणाला सांगायची, ते कळलंच नाही. खरंतर, कुणाला समजेल असं मला वाटलंच नाही. ऐकल्यावर तुला येईल माझा खूप राग; पण तुला सांगितल्याशिवाय मला आता राहावणार नाही.''

राजपुत्रानं गोष्ट सांगायला सुरुवात केली.

''एका राज्यात होता एक राजपुत्र. एकुलता एक. आई–बाबांचा लाडका. पुढे तोच राज्याचा राजा होणार. एकुलता एक वारस; पण वारस होणं सोपं नसतं. त्यासाठी दाखवावं लागतं खूप साहस. मग या राजपुत्राला 'धाडसी राजा' बनवायचं शिक्षण आणि तयारी झाली सुरू. मग झालं हेरगिरीचं प्रशिक्षण सुरू. राजपुत्राच्या बाबांची कल्पना अशी की, राजा व्हायचं, तर आधी जाणून घ्यायला लागतात आजूबाजूच्या राजांचे डावपेच. त्यांची खास *सिक्रेट्स* आणि त्यांची विचार करायची पद्धत.

मग सुरू झालं मैत्रीचं खोटं नाटक! एका सुट्टीत राजपुत्र गेला त्यांच्या कट्टर शत्रू–राज्यात. दोन राज्यात मैत्री–करार होण्याची चालली होती बोलणी. त्या राजाचा मुलगा या राजपुत्राएवढाच! बोलायला, वागायला एकदम छान. तो झाला राजपुत्राचा एकदम दोस्त. दोन राज्यात मैत्री होणार. याची चिन्हं दिसू लागली.

'संपणार, दोन राज्यातलं वैर संपणार! सुखशांतीनं जगता येणार.' दोन्ही राज्यातले लोक खूप खूष झाले; पण राजपुत्राच्या बाबांचा खरा *प्लॅन* वेगळाच होता. त्यांना लागली होती कुणकुण की, या शेजारीराज्यात दाट जंगलात सुरू झाला होता गुपचूप *बॉम्ब* बनवायचा कारखाना. 'राजपुत्रानं त्याविषयी माहिती काढून आणावी,' ही बाबांची आज्ञा! गोड बोलून राजपुत्रानं मित्राला

शब्द, सूर, ताल, लय भवती अवघे गाणे आहे। मनोमनी उत्कट आशा, हे जीवन सुंदर आहे।।
शुभेच्छुक – • सौ. नीलिमा करमरकर, पुणे • सौ. संध्या काळे, सातारा
• सौ. नीलाक्षी फाटक, रत्नागिरी

Happy Diwali

RUDRA
REALTORS

**RUDRA REALTORS**

**Plot No. 170, Sector - 3, Karanjade Panvel 410 206,**
**EMail : rudrarealtors77@gmail.com**

Light a lamp of love!
Blast a chain of sorrow!
Shoot a rocket of prosperity!
Fire a flowerpot of happiness!

Neelkanth
group

**Neelkanth Group.**

***Office Address : Plot No. 68 B, Sector - 22, Kamothe,***
***Navi Mumbai 410 206***
***Email -Neelkanthgroup.kamothe@gmail.com***

जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : वेसर शैली - द्राविड आणि नागर मंदिर स्थापत्य यांचे एकत्रित मिश्रण असणारी शैली - चेन्नकेशव मंदिर, बेल्लूर

*बॉम्बच्या* कारखान्याशी नेलं. जंगलातल्या गुप्त दारानं आत प्रवेश मिळवला.

समोर चाललेली लढाईची तयारी पाहून राजपुत्र चक्रावला. आणि तेवढ्यात फार मोठा अपघात घडला. जोरदार स्फोट झाला. राजपुत्र बेशुद्ध पडला. दोन्ही देशांच्या हद्दीतल्या जंगलातून, राजपुत्राच्या सुरक्षेसाठी लपले होते गुप्तहेर. त्यांनी बेशुद्ध राजपुत्राला परत आपल्या राज्यात नेलं. राजपुत्राच्या डोक्याला जखम झाली. खूप दिवस तो बेशुद्धीत होता. उठला, तेव्हा कळलं की, आपल्या बाबांनी या सगळ्याचा दोष लपूनछपून शस्त्र बनवणाऱ्या शेजारच्या राज्याला दिला आणि याचा बदला घेण्यासाठी, त्या राज्यावर स्वारी केली.

शंभर वर्षात झालं नाही असं घनघोर युद्ध झालं. खूप जण जखमी झाले. कितीतरी जण परतही नाही आले. खरंतर, कुणीच जिंकलं नाही. पैसे संपले, माणसं गेली... तह झाला.

दोघंही जण पराभूत झाले. दोन्ही राजांनी रागापोटी एकमेकांच्या सीमेवरचं नदीचं पाणी बांध घालून तोडून टाकलं. गाई-गुरं, मुले-माणसं व्याकूळ झाली. पीकं वाळली. झाडं सुकली. हिरवंगार रान ओसाड झालं. द्वेषाच्या काळ्या सुरवंटांनी वेढलं. राजपुत्र जेव्हा शुद्धीवर आला; तेव्हा त्याला त्याच्या मित्राची आठवण झाली. कोणी काही बोलेचना. बऱ्याच दिवसांनी कुणीतरी हळूच सांगितलं, बॉम्बच्या स्फोटात फक्त राजपुत्र वाचला. त्याचा मित्र वाचलाच नाही.''

राजपुत्राचा आवाज दाटून आला. त्याच्या ओठात शब्द अडखळले. डोळ्यामध्ये पाणी भरून आलं. सानेई थरथरली. आपल्या भावाच्या आठवणीनं व्याकूळली. ती त्यावेळी होती फार चिमुकली. ही खरी गोष्ट तिला कुणीच नव्हती सांगितली. तिने राजपुत्राकडे पाहिलं. दुःखी चेहऱ्यानं, अपराधी भावानं मान खाली घालून, तो उभा होता.

''हे ओझं मी कितीतरी वर्षं मनावर बाळगलं. *'सॉरी'* कोणाला म्हणावं ते मला नाही कळलं. मी तुझ्यासमोर उभा आहे. तुला हवी ती शिक्षा कर. मला माझ्या ओझ्यातून मोकळं कर.''

सानेईला शब्द सुचलेच नाहीत. राजपुत्र बोलला श्वास घेत, ''काल माझ्या वाढदिवशी मला समजलं, माझे बाबा तुमच्या राज्यावर हल्ला करायची तयारी करतायत, सूड घेण्यासाठी! पण मला युद्ध करायचं नाही. रातोरात मी आलो इथे सोडून राजवाडा आणि राज्य... माझ्या मित्राची आठवण काढत, जिथे त्याच्याबरोबर आनंदाचे क्षण वेचले त्या वनात. आणि आता तुझ्या-माझ्या बाबांनी नदीचं पाणी तोडून द्वेषाच्या आगीत सुकवून टाकलेल्या याच सुरवंटांच्या रानात.''

राजपुत्र दुःखानं व्याकूळलेला. पश्चात्तापानं पोळलेला. सानेईनी राजपुत्राकडे पाहिलं. त्याचा हात हातात घेतला. दोघं काहीच बोलले नाहीत. काटेरी झाडाखाली बसून दोघांनी वाहू दिले आपले डोळे. मित्र हरवल्याच्या दुःखात राजपुत्राने! भाऊ हरवल्याच्या दुःखाने सानेईने! आणि द्वेषानं आपलं माणूसपण हरवल्याच्या दुःखानं दोन भल्या माणसांनी!!

राजपुत्राने त्याची लांबुळकी पेटी उघडली.

मनामधले न सांगताच कळते जणू। मनकवड्या मित्राला, या काय म्हणू।।

शुभेच्छुक - • डॉ. स्नेहल तोडरवाल, नाशिक रोड, नाशिक • सौ. परिणिता रेळेकर, पुणे
• सौ. अस्मिता सतीश सहस्रबुद्धे, सांगली

दिव्यांचा सण प्रकाशाची उधळण
सुखसमृद्धीने बहरू दे जीवन ...

# Deshmukh Udyog Pvt. Ltd.

**Mfg. Of Automotive Cold Forgings, High Tensile Nuts, Beryllium Copper, PTFE, Stamping, Pressings, Machining & Assembly Works RoHs Plating , Metal finishings**

**AN ISO 9001:2015 QMS, ISO 14001:2015 EMS Certified**

**CII GREENCO PLATINUM RATED , COMPANY - 2020-2023**

❊ ❊ ❊

Works : M-19, Addl. M.I.D.C. Satara-415004,
Tel. Phone No. - 02162- 240100/200/300.
WhatsApp No-9423976687
Email Id - deshmukh@deshmukhudyog.com
Website - www.deshmukhudyog.com

❊ ❊ ❊

**Best Wishes from**

**Mr. Gajanan Deshmukh**
**Mrs. Shailaja Deshmukh**
**Mr. Uday Deshmukh**


जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : कलिंग शैली - लंबगोलाकार असणारी आणि फक्त वरच्या बाजूस निमुळती होणारी उंचच उंच शिखरं - सूर्यमंदिर, कोणार्क

काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन 'छात्र प्रबोधन'चे मिळतो हा विश्वास.

आपली गिटार बाहेर काढली. गिटारचे सूर भवताली पसरले. सानेईच्या कंठातूनही दु:खाचे सूर उमटले. सानेईच्या केसात अडकलेल्या सुरवंटांना सुंदर जांभळे पंख फुटले. दोघांचं दु:ख गाण्यातून वाहिलं, ते काटेरी रानात पसरलं... ते आटून गेलेल्या झऱ्यात मिसळलं... झऱ्यानं ते दूर वाहून नेलं. द्वेषानं, रागानं, वैरानं वर्षावर्षांच्या बांधलेल्या बांधाला फोडत, ते दूर वाहू लागलं.

बांध फुटला. झऱ्याची नदी झाली. झुळझुळ झुळझुळ वाहू लागली. दोघांचं गाणं पाण्यातून वाहिलं... तिचं स्वत:चं गाणं, दु:खानं भिजलेलं; पण क्षमेनं सजलेलं.

सानेईला मनोमन कळलं, 'गाणं येण्यासाठी छान रंग-रूप लागत नाही. गाणं मनातलं असतं; पण नुसतं तिथं असून भागत नाही. मनातलं गाणं जनात पोचवावं लागतं.

स्वत:चा चेहरा सापडायला दुसऱ्याचा आरसा लागत नाही. आपल्याच मनात आपल्याला त्याला शोधावं लागतं.'

सानेई तिथे डोकावली. तिथे ती तिला स्वत:ची स्वत: सापडली! स्वत:ची खूण पटून सानेई खुलली. राजपुत्राला म्हणाली, ''थँक्यू! तुझ्यामुळे मी मला सापडले!''

राजपुत्र म्हणाला, ''*थँक्यू!* खरंतर, तुझ्यामुळे मी मला सापडलो.''

सानेई म्हणाली, ''सापडलो खरे. 'पण' पुरा करण्यासाठी आपल्याला लग्न करायलाच हवं का?'' राजपुत्र म्हणाला, ''मुळीच नाही.''

सानेई म्हणाली, ''आपण छान मित्र राहू.''

राजपुत्र म्हणाला, ''एकमेकांना छान समजून घेऊ!''

सानेई म्हणाली, ''राज्यातल्या लोकांना सुखी ठेवू!''

राजपुत्र म्हणाला, ''यात काही शंकाच नाही!''

''*बेस्ट ऑफ लक*'' दोघं एकमेकांना म्हणाले. फांद्याफांद्यांवरच्या सुरवंटाच्या काट्यांवर जांभुळल्या प्रकाशाचे सुंदर थेंब उगवले. त्यांच्या उजेडात वाट काढत, दोघं आपापल्या घरी पोहोचले. आपापल्या बाबांशी बोलले. पुढे राजपुत्र त्याच्या राज्याचा राजा झाला आणि सानेई तिच्या राज्याची राणी झाली. राजपुत्र आणि सानेईनी दोन्ही राज्यांच्या मधल्या सुरवंटांच्या रानात गाण्याची एक शाळा काढली. नाव काय ठेवायचं, याची मग चर्चा झाली.

सानेई म्हणाली, ''सारेगम संगीत शाळा''

राजपुत्र म्हणाला, ''*डो रे मि फा म्युझिक स्टुडिओ!*''

दोघांनी मग विचार केला. न भांडण्याचा करार केला.

*'सारेगम डोरेमिफा' म्युझिक शाळा : 'ईस्ट अँन्ड वेस्ट ऑलवेज द बेस्ट'* शाळा वाहत्या नदीकिनारी सुरू झाली.

कोणासाठी? त्यांनी अवतीभवतीच्या सगळ्या राजपुत्रांना बोलावलं. आतापर्यंत झालेल्या वेगवेगळ्या लढायात कुणी जिंकलेले कुणी हरलेले; पण सगळेच अस्वस्थ! काहींच्या तलवारीला होती धार, काहींच्या तुटलेल्या, कुण्या दुसऱ्यावर करून वार. काहींचे अंगरखे उसवलेले, पुन्हा पुन्हा शिवलेले, तरी खोट्या जरीआड लपवलेले. कुणाचे जोडे झिजलेले. बहुतेकांचे मुकुट तुटलेले.

बहुतेक सगळेच

सप्तसुरांना प्राप्त करावा, करू आज आराधना। जीवन होई सफल, करून संगीत साधना।।

शुभेच्छुक - • श्री. प्रमोद कुलकर्णी, पुणे • श्री. सचिन सहस्रबुद्धे, पुणे • मे. अमेय फ्लुईड कंट्रोल सिस्टीम्स् प्रा. लि., पुणे

# ग्रंथसंपदा
## एका जिज्ञासू फिरस्त्याची



**पेशाने डॉक्टर, जिज्ञासू फिरस्ता असणारे डॉ. संदीप श्रोत्री यांनी पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या कार्याबरोबरच पाहिलेल्या, ऐकलेल्या, भावलेल्या असंख्य गोष्टी शब्दबद्ध आणि कॅमेराबद्ध केल्या. त्यातूनच आकाराला आली त्यांची मौलिक ग्रंथसंपदा.**

### पुष्पपठार कास



पुष्पपठार कासची पर्यटनस्थळ म्हणून नव्हे तर पर्यावरणीय लेणे म्हणून सार्थ ओळख. खास लोकाग्रहास्तव पुष्पपठार कास हे पुस्तक इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध.

प्रकाशक-डॉ. स्वाती श्रोत्री

किंमत- ₹ २५०

### मनूचे अरण्य



(ॲमेझॉन जंगलातील भटकंती)

प्रकाशक- राजहंस, पुणे

किंमत ₹ २५०/-

### मार्क इंग्लिस



मार्क इंग्लिस या बिनपायांच्या माणसाने एव्हरेस्ट सर केले त्याची गोष्ट (आवृत्ती ६)

प्रकाशक- राजहंस, पुणे

किंमत ₹ २००/-

### साद अन्नपूर्णेची



हिमालयातील अन्नपूर्णा शिखर रांगेला परिक्रमा आणि पायथ्याचा ट्रेक आणि नैसर्गिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये सांगणारा सचित्र वृत्तांत!

प्रकाशक- मैत्रेय, मुंबई

किंमत -₹ ३२५

### एव्हरेस्टच्या पायथ्याशी



माउंट एव्हरेस्ट पायथ्याच्या ट्रेकचे केलेले सचित्र आणि थरारक वर्णन.

प्रकाशक - कॉन्टिनेंटल, पुणे

किंमत - ₹ २५०

### काटेरी केनियाची मुलायम सफर



केनियाचे भौगोलिक, पर्यावरणीय महत्व तेथील विविध परिसंस्था, स्थानिक मसाई संस्कृतीचे डोळस व शास्त्रीय चित्रण

प्रकाशक- मैत्रेय, मुंबई

किंमत ₹.१६०/-

**कासवाचे बेट या पुस्तकाला एका वर्षात पाच पुरस्कार जाहीर आणि राज्यशासनाचा यशवंतराव चव्हाण पर्यावरण गटातील सर्वोत्कृष्ट पुस्तक पुरस्कार**

### कासवाचे बेट



उत्क्रांती सिद्धांताचा जनक सर चार्ल्स डार्विन यांच्यामुळे प्रसिद्ध झालेल्या गालापगोस बेटांची अद्‌भुत सफर (आवृत्ती २)

प्रकाशक - राजहंस प्रकाशन

किंमत ₹ १८०/-

### आगामी पुस्तके

१) इंकांची देवदरी
(दक्षिण अमेरिकेतील इंका या रहस्यमय संस्कृती आणि माचुपिच्चू या गुप्त शहराची माहिती असणारे पुस्तक)

प्रकाशक राजहंस, पुणे

२) रहस्यमय पेरू देश आणि नाझ्काच्या अगम्य रेखाकृती

प्रकाशक राजहंस, पुणे

३) कांचनगंगेच्या कुशीत
- जगातील तिसऱ्या सर्वोच्च शिखराच्या आणि सुंदर जैवविविधतेने नटलेल्या जंगलात केलेली भ्रमंती

४) जी–वन त्यांना कळले हो
जगातील निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रामध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींची ओळख.

**उपलब्धता : दत्तकाशी हॉस्पिटल, देवी चौक, सातारा ०२१६२-२३४९२२, २२६५२२**
**कॉल/एसएमएस : ९८२२०५८५८३. ई-मेल - ss1028@gmail.com**

जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : शिखर शेखरी - नागर शैलीतील एक उपप्रकार
- विश्वनाथ मंदिर, वाराणसी



शिणलेले. लढून लढून थकलेले, सुखाचा रस्ता शोधणारे, बहुतेकसे वाटच चुकलेले.

सानेईनी सगळ्यांना आपली गोष्ट सांगितली. तिची आणि राजपुत्राची. हरवलेल्या चेहऱ्याची, चुकलेल्या वाटेची, काटेरी सुरवंटी रानाची, अडवलेल्या पाण्याची, सुकलेल्या बनाची, नको असलेल्या युद्धाच्या वणव्याची आणि त्याला विझवणाऱ्या, रानावनात पसरलेल्या गाण्याची!

राजपुत्र म्हणाला, ''मी गिटार वाजवतो.''

सानेई म्हणाली, ''मी गाणं म्हणते.''

सगळे म्हणाले, 'गाणं? खूप दिवसांत मोकळं गाणं गायलंच नाही. वाऱ्याची झुळूक खूप दिवसात अंगावरून वाहिलीच नाही. खूप दिवसात आकाशातलं थंड चांदणं ल्यायलंच नाही.'

सगळे म्हणाले, 'गाणं गाऊ! हसू, नाचू, गाणं गाऊ!' सगळ्यांनी गाणं गायलं. एक! मग दुसरं! आणि तिसरं गाणं गाता-गाता कुणाला भांडायला सुचलंच नाही. आत्ता नाही. उद्या पण नाही. गाण्याची जादू अशी की, कोणी शस्त्र उचललं नाही. कोणी युद्ध केलं नाही. कोणाला त्याची आठवण राहिलीच नाही. सगळेच गाणी गात राहिले...

नद्या मग वाहात राहिल्या... झाडं मग डोलत राहिली आणि फुलं फुलत राहिली... काळ्या काटेरी सुरवंटांची रंगीत-रंगीत फुलपाखरं अवती भवती नाचत राहिली...!

आणि आकाशातून, बर्फातून, डोंगर- दऱ्या- खोऱ्यांतून समुद्राच्या लाटांवरून, धुमसणाऱ्या रणांतून चोचीत हिरवं पान घेऊन शुभ्र कबुतरं उडत राहिली...!!!


– स्वाती राजे
swatijraje@gmail.com


चित्रकार : गिरीश सहस्त्रबुद्धे


अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.



वाचा
रहस्यकथा
अद्भुत साहसयात्रा
लेखक – भारत सासणे

Best Compliments from...

Shree
Multi Sticks & Labels Pvt. Ltd.

**MANUFACTURERS OF**
***Product Labels, Barcode Labels, Pharma Labels, Food Labels, Personal Care Lables***

**DEALERS IN**
***Barcode Printer, Scanner, Thermal Transfer Ribbons***
***M 9890273970 / 9822468634***
***Email -shreemultiservices@yahoo.com***
***pramoddongre@shreemultiservices.com***

Rohit Gadre
Best Compliments from...

चक्षु
OPTICIANS

Chakshu Opticians, Shop No. 3-4,
Opposite Bhosale Garden, Near Sanmitra Bank,
Pune Solapur Road, Hadapsar Gaon, Pune 411 028

मोरु तात्या
खाऊ । स्नॅक्स । बेकरी

अधिकृत वितरक

संपदा बेकरी

जयसिंगपुरचे (कोल्हापूर) प्रसिद्ध
अंबा भडंग

अदिती फुड्स

काजू वडी

श्रीकृष्ण दुग्धालय
बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, फ्रुटखंड, सिताफळ रबडी

स्नॅक्स (पूर्व नोंदणी)
पॅटीस, सामोसा, पट्टी सामोसा, बटाटे वडे, गुजराती ढोकळा, सुरळी वडी, बालुशाही आणि बरचं काही...

आमचे उपक्रम

श्री सिझनल्स
देवगड हापूस आंबा, पेणच्या सुबक मुर्ती

क्षुधा-शांती
तयार पीठे, दिवाळी फराळ

आपटे सुगंधी
अतर, मसाला उदबत्ती, धूप

फिरस्ता पर्यटन

संपर्क :

| श्री. बडवे | श्री. पहाडे | श्री. पुरोहीत |
| --- | --- | --- |
| 9423395181 | 9423395181 | 9423395181 |


जाणून घ्या - मंदिर स्थापत्यशैली : वलभी शैली - महिरपी शिखरे
- दशावतार विष्णू मंदिर, देवगड

या गीताची चाल ऐका
आणि ते गीत म्हणा!

# नव्या युगाचे...

नव्या युगाचे पाइक आम्ही तारे नवक्षितिजावरचे
निजरुधिराची आण वाहुनी रूप पालटू देशाचे ।।ध्रु.।।

आद्यकवींनी चित्रियलेली भूमी ही सुजला सुफला
रूप तियेचे आज पाहुनी चीड चेतवी चित्ताला
सुजल-सुफलता पुन्हा निर्मिण्या कोटि कोटि व्यापू गगने
भागिरथीला प्रसन्न करण्या वाहू यत्नांची सुमने
घराघरातून मनामनातुन दीप चेतवू स्फूर्तीचे ।।१।।


यंत्रदेव तो पूज्य अम्हाला पूज्य अम्हाला वेदऋचा
विज्ञानावर भक्ति असुनही गंध मोहवी काव्याचा
पूजनीय तो उंच हिमालय पूज्य अम्हाला सागर हा
भव्यत्वाची साक्ष ज्यामध्ये पूजा त्याची करू महा
या सर्वांच्या पूजांमधुनी पूजन करू या शक्तीचे ।।२।।

समोर मूर्ती मातृभूमिची आज न काही प्रिय दुसरे
शुद्ध मनाचे कोंदण करुनी तिच्या रुपाचे जडवू हिरे
स्वयंप्रकाशित अम्ही काजवे दुष्ट ग्रहांवर मात करू
आकांक्षांच्या पूर्तीसाठी मृत्यूशीही होड धरू
त्यागपत्र हे आजच लिहिले अवघ्या जीवनपुष्पाचे ।।३।।

– विनय हर्डीकर


अनुक्रमणिकेत
जाण्यासाठी येथे
क्लिक करा.

## दिवाळी अंकांतील भेट - आकर्षक आकाशकंदील



आकृती क्र.२

**कृती :** भेटीचे दोन्ही कागद अंकाच्या शेवटी दिले आहेत, ते प्रथम अंकातून काढून घ्या. तुटक रेषांपासून कागद वेगळे करून घ्या. कागदाच्या वर व खाली पांढरा भाग (चिकटपट्टी सोडून) कापून घ्या. या प्रत्येक कागदावर (आकृती क्र.१ नुसार) तीन आयत आहेत. प्रत्येक आयताच्या मध्यभागी असलेल्या तुटक रेषेवर बाहेरच्या बाजूला घडी करा व दोन आयतांच्या मध्ये असलेल्या तुटक रेषेवर आतील बाजूस दुमडा. आयतामधील पट्ट्यांपैकी पहिली पट्टी आतील बाजूस दुमडा व त्यानंतर एक आड एक पट्टी आतील व बाहेरील बाजूस दुमडा. प्रत्येक कागदावर एक चिकटपट्टी दिली आहे. त्याच्या साहाय्याने दोन्ही कागद एकमेकांना चिकटवून घ्या. वरून पाहिल्यावर चांदणीचा आकार दिसेल.



आकृती क्र.१

या आकाशकंदीलाच्या झिरमिळ्या करण्यासाठी एक पतंगी/ पताक्यांचा रंगीत कागद लागेल. या कागदातून सुमारे ३० ते ४० सें. मी. लांबीच्या व ६ ते ७ मिमी. रुंदीच्या सुमारे ७५ पट्ट्या (झिरमिळ्या) कापून त्या तयार झालेल्या आकाशकंदीलाच्या खालच्या बाजूला आतील बाजूने चिकटवा. तुमचा आकर्षक आकाशकंदील (आकृती क्र.२ प्रमाणे) तयार होईल. दोरीच्या साहाय्याने आकाशकंदील टांगण्यासाठी वरील बाजूस दिलेल्या छिद्रांचा वापर करा व घराच्या दर्शनी भागात आतमध्ये दिवा लावून अडकवा.

## सफर दिवाळी विशेषांकाची - 'छात्र प्रबोधन'तर्फे वैयक्तिक स्पर्धा

**(इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी, प्रवेश नि:शुल्क)**

**या अंकावर आधारित प्रश्न खाली देत आहोत. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी!**
**त्या प्रश्नांची उत्तरे लिहून 'छात्र प्रबोधन'कडे ३१ डिसेंबर २०२० पर्यंत पाठवा.**
**बक्षिसे : विशेष गुणवत्ताप्राप्त पहिल्या २० जणांना प्रत्येकी एक वर्षाची वर्गणी!**
**त्यानंतरच्या २० जणांना प्रत्येकी ६ महिन्यांची वर्गणी!** उत्तरे पाठवताना नाव, पत्ता, मोबाईल संपर्क, शाळा, इयत्ता लिहिणे आवश्यक.

१) 'माणुसकीचा गणवेश' या कथेत लेखकाचा गणवेश इतर मुलांपेक्षा कसा वेगळा आहे?
२) खवल्या माजरांच्या जीभेचं कोणतं वैशिष्ट्य 'उचलली जीभ...' या लेखात सांगितलं आहे?
३) 'समर्पण' या कथेच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.
४) होळीच्या निमित्ताने सार-भात खाताना लेखकाला आईची व सरांची आठवण का दाटून येते?
५) 'सारेगम-डोरेमिफा'मधल्या राजकन्या सानेईची कोणती स्वभाववैशिष्ट्ये कथेत दिसून येतात?
६) या अंकात दिलेल्या कोणत्याही ऐका/वाचा यांपैकी २ क्यू-आर कोड स्कॅन करून त्याबाबत ४-५ ओळींची प्रतिक्रिया लिहा.
७) तुम्ही 'पाऊस गाणे' केव्हा गाऊ शकाल, असं कवयित्रीला वाटते?
८) कोरोनासह जगताना स्वत:मध्ये कोणत्या पद्धतीचे बदल केले पाहिजेत? (संदर्भ लेख : प्रवाही आणि प्रभावी वृत्ती)
९) 'राष्ट्रीय वारसा स्थळ' म्हणून घोषित झालेली खजुराहो लेणी कोणत्या राज्यात आहेत?
१०) दीपावली अंकाबाबतची तुमची प्रतिक्रिया व पुढील वर्षीच्या दिवाळी अंकाबाबतच्या अपेक्षा कळवण्यासाठी संपादकांना पत्र लिहा.

अनुक्रमणिकेत जाण्यासाठी येथे क्लिक करा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० कार्तिक, शके १९४२, १ नोव्हेंबर २०२० या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२ पर्वती टॉवर्स, पुणे ४११००९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.



विको®
— विश्वसनीय आयुर्वेद —
१९५२ पासून
दुर्गंधीची भीती?
आता नाही!
नव्या ताजेपणासह
विको वज्रदंतीची शक्ती
आता सौंफ फ्लेवर मध्ये
NEW
VICCO VAJRADANTI
सादर आहे नवीन विको वज्रदंती बडीशोपच्या ताजेपणासह. आता हिरड्यांची सूज, हिरड्यांमधून रक्त, पायोरिया आणि कमकुवत दातांच्या समस्यांवर हमखास उपायासह मिळवा ताजेपणाही. तैव्हा आजच आणा १८ जडी-बुटींपासून बनविलेली **सौंफ फ्लेवरवाली** विको वज्रदंती आणि प्रत्येक दिवसाची सुरुवात करा ताजेपणासह.
दात गुणगुणतील
संपूर्ण स्वदेशी
सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध
www.viccolabs.com • Like us on /ViccoLabs • Shop online at www.viccoestore.com • Customer Care Cell No. 0712-2420890

सौर कार्तिक शके १९४२/नोव्हेंबर २०२० पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक: (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month

# 'कोरोना'... ज्ञान प्रबोधिनीचे वैशिष्ट्यपूर्ण मदतकार्य

❖ वेल्हे, साळुंब्रे जि. पुणे ❖ हराळी जि. उस्मानाबाद ❖ अंबाजोगाई जि. बीड ❖ सोलापूर ❖ पुणे ❖ निगडी

• स्थलांतरित वाड्या-वस्त्यांवर व दुर्गम गावांमध्ये किराणा-अन्नधान्याचे वाटप • वृद्ध, निराधार व्यक्तींना सर्वतोपरी मदत • विडी कामगार महिलांसाठी पर्यायी रोजगार निर्मिती • ग्रामीण भागात कोरोना जनजागृती व आरोग्य सुविधा • शेतीमालाची शहरांमध्ये विक्री व्यवस्था • युवक-युवतींद्वारा रक्तदान मोहीम • विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला अनुभवांची आणि घरोघरी ग्रंथालय व प्रयोग साहित्याची जोड • कोरोनाग्रस्त पोलिसांसाठी समुपदेशन • दूरस्थ पद्धतीने संस्कारविधी

(संक्षिप्त व सविस्तर वृत्त पान क्र. ५६ वर)



25 GLORIOUS YEARS

AN ISO 9001:2015 COMPANY

SHIVSHAKTI PAINTS

*Industrial paints and coatings specialists*

3, Apurva Apartments,
S. No. 8, Tapodham Road, Warje,
Pune - 411058. Maharashtra. India.
• **Phone: +91-20-25230890/ 0250**
• Fax: +91-20-25230890
• e-mail: info@shivshaktipaints.com
shivshaktipaints@gmail.com
• website : www.shivshaktipaints.com

सर्व देणगीदार, जाहिरातदार, प्रायोजक यांना मनापासून धन्यवाद! त्यांच्या अर्थसाहाय्यामुळे छात्र प्रबोधन दिवाळी–छापील अंक, इ–अंक, ऐपावा ऑनलाइन अंक, मोफत बोलका अंक प्रकाशित करता आले व सवलतीच्या दरात हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आले.

मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
दूरभाष : ०२०–२४२०७१७४/१७५, संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १० कार्तिक शके १९४२, (१ नोव्हेंबर २०२०)
वार्षिक वर्गणी ₹ २००, या अंकाची किंमत ₹ ८०